सहामाही ३ " ३ "
सालअखेर " ७ " १॥८

किरकोळ अंकास.......................॥४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ॥१॥६
दुसरें खेपेस .......॥१

Per annum in arrears 7 Rs. 8 as
Six monthly..........3 " 8 as
Single copy..............................3as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOLXXIV AKOLA MONDAY SEPTEMBER I 1890 NO 34

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १ माहे सप्टेंबर सन १८९० इ० अंक ३४



डा. वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

## सार्सापारिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शारिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, तसें सर्व शरीरास कंडे सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापसून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकारितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गोतमराव केशव, मुंबई.



नोटीस.

रतनचंद पेमराज रहाणार रामपुरा ता० दर्यापूर जिल्हें इलिचपूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मा तुम्हास तामसवाडी येथील आमची सरवई नंबर २९ एकर १८ गुंठे ८ जमीन आकार रु. २९ देऊन त्याचे ऐवजी तुह्मी खाली लिहिले प्रमाणें जमीन देऊन २० रु. द्यावे असें तुमचे आमचे ठरलें मौजे रामगांव येथील जमिनीचा बदला केला.

सरवई नंबर ९२ पैकीं ५ एकर ११ गुंठे आकार रु. ७. सरवई नंबर ६८ ९ एकर ३४ गुंठे आकार रु. १३. सरवई नंबर ५२ पैकीं १० एकर ३६ गुंठे आकार रु० १४ यांतील निमे हिस्सा मिळून आम्हास आपल्या इकडून एकंदर जमीन १९ एकर व ६३ गुंठे आकार रु. २७ याचे खातें आमचे नांवे करून द्यावें.

वर लिहिले प्रमाणें तुमचा आमचा ठराव झाला असून आम्ही आमचे शेत तुमचे ताब्यांत दिलें व आपण ही आपली जमीन आमचे ताब्यांत दिली व रु० २० दिले ते ही पावले. आतां ठरल्याप्रमाणें आमचे जमिनीचें खातें आपलें नांवें करून देण्यास आम्ही तयार आहो. ते करून घ्यावे. व आपल्या जमिनीचे खाते आमचे नांवें नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत करून द्यावें तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून योग्य बंदोबस्त करून घेतला जाईल व या कामास लागणारा खर्च या नोटीशीच्या खर्चासुद्धां आपणापासून भरून घेतला जाईल कळावे तारीख २५ माहे आगष्ट सन १८९०

( सही )

रामप्रताप गणेशदास दुकान रामगांव गणेशदास दस्तुरखुद्द.

नोटीस

रा. रा. कीसन गनाजी गंधीवाले राहणार पातुरशेखबाबू यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतेकीं तारीख २३ माहे आगष्ट रोजी तुमचा आमचा जुना खुर्दा दर एक रुपयांस अठराआणे प्रमाणें असे एकून तीनसें ३०० रुपयाचा ठरला व तुम्ही करारा प्रमाणें न देऊन त्या खुर्द्यात तुम्ही ठकबाजी केली असें दिसल्यांवरून आम्ही तुम्हांस दुसरे सराफ यांचे समक्ष पकडून दिले व याबद्दल आमचे नुकसान दर शेकडा सवासाहा ६। रुपये प्रमाणें एकूण तीनशे रुपयास १८ रुपये १२ बाराआणें जाले तर नुकसानीचे रुपये नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत दुकानावर आणून द्यावे असें न केल्यांस कोर्टांत फिर्याद करूं व फिर्यादीचा खर्च नोटीशीच्या खर्चा सह घेतला जाईल कळावें तारीख २५ माहे आगष्ट सन १८९० इसवी.

( सही ) देवराव भगवंत गु. नां. पोपटलाल परशराम दस्तुर खुद्द.


## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकुर पत्र कर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

उमरावती ता०२७।८।९०

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस सा० नमस्कार विनंती विषेशः—

एका स्मारका विषयी सूचना

लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, येथील प्रसिद्ध मराठी वकील रा० रा० एकनाथ लक्ष्मण हे आज बरेच दिवसा पासून आजारी पडून ता० २२ रोजी त्यास जळगांव मुक्कामीं देवाज्ञा झाली. ईश्वरी कोप कांहीं चमत्कारिक आहे. तो कोणावर व केव्हां होईल ह्याचा कांहीं नेम नाहीं. जनन मरण हें प्रत्येक मनुष्याला लागू आहेच परंतु तें हिशोबानें झालें म्हणजे त्याचा फारसा खेद होत नाहीं आणि ते जर कां हिशोबाच्या आंत येऊन गुदरलें तर मग त्या दुःखास पारावार नाहींसा होतो. सदरहु प्रमाणें आमच्या तात्या साहेबांची स्थिति झाली त्यांनीं म्हणजे आजच हें जग सोडून जावें इतकें त्यांचें वय झालेलें नव्हतें परंतु करणार काय परमेश्वराचें बोलावणें आल्यावर तेथें कोणत्याही प्रकारची सबब न सांगतां मुकाट्यानें जाणें भाग आहे त्या प्रमाणें तात्या साहेबानीं सर्व एकीकडे ठेवून यमपदाची वाट धरली. हरः हरः त्या पुरुषावर अज असा प्रसंग यावाना! "आलें देवाजीच्या मना तेथें कोणाचें चालेना" यावाक्याचें स्मरण करून स्वस्थ बसावें या पेक्षां दुसरा मार्ग तो कोणता. असो.

वरील प्रसिद्ध पुरुषाचे उमरावती येथे कांहीं तरी स्मारक असावें अशी इच्छा उत्पन्न झाल्या वरून ही सूचना करण्याचें योजिलें आहे. तें स्मारक कसें व कोणतें तर येथें सार्वजनिक कामा पैकीं "टाऊनहॉल" चे काम बरेंच मागें पडलें आहे व ही एक उणीव ह्या शहराला मोठी आहे तर ती हा भरून जाईल व स्मारकही होईल. माझें ऐकण्यांत असें आलें आहे कीं, येथील म्यु० कमेटी टाऊनहालच्या इमारतीला आर्धी रकम देणार आहे मग तरकाय ठिकच झालें. निमी रकम कमेटिची व निमीरकम स्मारक फंडाची मिळून एक टौनहॉल हाल तयार होण्यास कायहरकत आहे? या करितां आमचे येथील सर्व सावकारलोक व वकीललोक या स्मारक फंडाकडे आपलें पूर्ण लक्ष देतील तर तात्यासाहेबांचा स्नेह संपादन केला किंवा नाहीं हें समजण्याची वेळ हीच आहे. तर तिला बाध कोणत्याही तऱ्हेनें येणार नाहीं अशा विषयीं आमच्या येथील शेट सावकार व वकील मंडळींनीं मनापासून हें स्मारकफंडाचें काम तडीस न्यावें एवढी विनाति करून हा छोटासा लेख आज येथें संपविलों.

पत्रकर्तेगव, वरील छोटासा लेख आपल्या कडे पाठविला आहे त्याला आपणही आपल्या लेखणीच्या रुपानें हात भार लावाल अशी आशा आहे. कळावें

आपला

एक "न"

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक वद्य ३ शके १८१२

रानटी जनावरें व सर्प जाती ह्यांच्या पासून मागील तीन वर्षांत वऱ्हाडांत किती प्राणहानी झाली ह्या विषयीं एक तक्ता प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें कळतें कीं, मागील सालीं ( १८९० ) २१६ मनुष्यें व १७७ जनावरें सर्प दंशानें प्राणास मुकलीं आणि २९ मनुष्यें व १६३८ जनावरें रानटी जनावरांच्या भक्षस्थानीं पडलीं त्याच प्रमाणें वरील सालीं ३५० रानटी जनावरें मारण्यांत आली व त्याबद्दल बक्षिसादाखल सुमारें ३४४८ रुपये सरकारास खर्च करावे लागले. मागीलसालीं किती सर्प मारण्यांत आले ह्याचा अंदाज लागत नाहीं व पुढेंही लागणें कठीणच कारण सरकारनें सर्प मारण्याबद्दल बक्षिसें देण्याचें बंद केलें आहे. आमच्या सरकारास जरि सर्प मारण्याबद्दल बक्षास देण्यांत कांहीं फायदा दिसत नाहीं तरी दरवर्षी निदान सातशें किंवा आठशे तरी सर्प मारले जात असत त्याच्या निम्मे हो बक्षिसें बंद केल्यापासून मारले जातील किंवा नाहीं ह्याचा संशयच आहे. दोनचार आण्याच्या बक्षिसाच्या आशेनें रानांतून जंगलांतून व रस्त्यावरून दृष्टीस पडणाऱ्या सर्पांस मारण्याचा प्रयत्न पुष्कळ लोकांच्या हातून होत असे परंतु बक्षिसाची आशा सुटल्यापासून आपणा स्वतःस उपद्रव न करणाऱ्या जनावरास मारण्याचें धाडस कोणीही करणार नाहीं, व गावाशेजारी अपलेल्या झाडाझुडपांतून हे प्राणी बिनधोक संचार करूं लागतील व त्या योगानें जाणाऱ्या येणाऱ्या लोकांस बराच त्रास सोसावा लागेल. ह्या गोष्टीचा मे. रेसिडेंट साहेबांनीं बक्षिसें बंद करण्याच्या अगोदर विचार केला पाहिजे होता. शिवाय दरवर्षी पन्नास किंवा पाऊणशें रुपयाची रकम प्रत्येक जिल्ह्यास सर्पसत्राकडे खर्च वालण्यास जड जाईलसें दिसत नाहीं. घराचीं अवारें, मोडक्या तोडक्या घरांच्या पडक्यां भिंती, व गांवांच्या अथवा शहरांच्या आसपासची जंगल रानें इ० सर्व ठेवल्या पासून सर्पांची वसतीस्थानें लोक वस्ती पासून दूर रहाती-

ल परंतु ह्यासही खर्च लागणारच आहे. व ह्या उपायानें त्यांची उत्पत्ति कमी करितां येणार नाहीं. दोन्ही उपायांची योजना होणें योग्य आहे.

वरील साली हत्यारें वापरण्याचे २४७१ परवाने सर्व वऱ्हाडांत दिलेले होते. हत्यारें वापरण्याचे परवाने देण्यांत बरीच अव्यवस्था दिसून येते. सर्व वऱ्हाडांत इलिचपूर व वणी जिल्हा आणि मेळघाट हा मुलूख डोंगराळ व जंगली असून इलचिपूर करितां ५९ व मेळघाटा करितां २४ परवाने दिलेले आहेत व अकोला जिल्हात त्याच परवान्यांची संख्या ६९३ पर्यंत गेली आहे. प्रत्येक डेपुटी कमिशनरच्याच खुशीवर परवाने देण्याचे अवलंबून असल्या कारणानें असा फरक दृष्टोत्पत्तीस येतो. सरासरी अकोला अथवा इलीचपूर जिल्हांच्या बरोबरीनें सर्व जिल्हांनीं सारखे परवाने मिळण्यास सुमारें १७०० तरी अधिक परवाने दिले पाहिजेत व मे. कमिशनरसाहेब ह्याचा विचार लवकरच करतील. तर बरें. पंजाबात कित्येक लोकांस हत्यारांचे परवाने फुकट दिलेले असतात व परवान्याच्या मुदतीच्या बाहेर पुन्हा परवाना न घेतां हत्यारें वापरलीं असतां दंडा खातर कांहीं रानटी व क्रूर जनावरें मारून आणण्याचा हुकूम करितात; तीच रीत वऱ्हाडांत चालूं करण्या बद्दल मे. रेसिडेंट साहेबांची शिफारस आहे. व आम्हीही असें सूचवितों कीं, ज्या गरीब लोकांस फी भरण्याचे सामर्थ्य नाहीं व हत्यारें बाळगिल्या वाचून प्राणरक्षण होत नाहीं अशा लोकांशीं कांहीं रानटी जनावरें मारून आणण्याचा करार करून हत्यारें वापरण्यास द्यावीत.

रानटी जनावरें मारण्याकडे खर्च होत असलेल्या रकमेचा विनियोग हिंदुस्थानांत उद्भवणाऱ्या रोगांच्या साथींच्या शोधांकडे होईल तर फारबरें असें मे. रेसिडेंट साहेबांचे मत आहे. परंतु ही रकम जर तिकडे खर्चीं पडत जाईल तर हत्यारांचे परवाने देण्यांत विशेष उदारता ठेविली पाहिजे.

शेटजींचा मयत्न नको आहे.

आजपर्यंतचा पुष्कळ दिवसांचा इतिहास चाळून पाहिला ह्मणजे असें आढळून येईल कीं सर्व लोकांचा डोळा ह्या आपल्या हिंदुस्थानावर आहे. हें कां ह्मणाल, तर उघडच आहे कीं हिंदुस्थान हा देश पूर्वींपासून फार सधन आहे. तेव्हां ह्या देशांतील संपत्ति आपणास कशी साधेल ह्या खटपटीत सर्व लोक होते मुसलमान लोकांनीं उत्तरे कडून ज्या कांहीं स्वाऱ्याकेल्या त्या एवढ्यांच करितां. तसेंच युरोप खंडातून इंग्लिश, फ्रेंच, पोर्टुगीज वगैरे जी मंडळी इकडे आली ती तरी ह्याच उद्देशानें आली. ती मंडळी वर कांहीं परोपकार बुद्धीनें इकडे आली नाहीं हें खास आहे इकडे येण्याचा उद्देश द्रव्य मिळवावें या व्यतिरिक्त निःसंशय दुसरा कोणताही न व्हता. इकडे आल्यावर त्यांनीं द्रव्य व राज्य कसें संपादन केलें हें सांगण्याची विशेष गरज आहेसें वाटत नाहीं. बहुतेक प्रसंगीं दावां खवा चोर मांजरांशीं त्या लबाड माकडाची जी वर्तणूक तीच त्यांची आह्मांपाशी होती. यांनीं इकडे आल्यावर आमचे इकडील कांहीं मूर्ख व द्रव्य लोभी लोक हातांशीं धरून त्यांचे सहायानें इतर लोकांस मूर्ख ठरविलें हें काम त्यांच्या पैकीं पाद्री लोकांनीं अद्याप हातीं घेतले आहे, व माकड म्हणतें माझेंच शरीर लाल, त्या प्रमाणें आपलें कांहीं असेंतें चांगलें व दुसऱ्याचें तेवढें वाईट असें म्हणण्याचा त्यांनीं अविचारानें विडाच उचलिला आहे. आतां म्हणजे युरोपियन लोक आपणास मूर्ख म्हणतात म्हणून ते शहाणे नाहींत असें आमचें बिलकूल मत नाहीं. आम्हांस हें निर्विवाद कबूल केलें पाहिजे कीं इंग्लिश वगैरे दुसरें कांहीं युरोपियन लोक आम्हां पेक्षां सध्यां जास्त हुशार कुशल व शूर आहेत. परंतु विचार केला तर हुशारी ह्या गुणाचा कल लुच्चे गिरीकडे बराच वळतो. अमुक एक मनुष्य हुशार आहे असें लोक म्हणतात ह्मणजे काय तर तो मनुष्य वेडा किंवा साधा भोळा नव्हेतर चांगला कावेबाज व डाव पेंच जाणारा आहे, असेंच लोक समजतात. असो. वर सांगितल्याप्रमाणें हे युरोपियन लोक हिंदुस्थानांतील लोकांस मूर्ख ह्मणूंलागले व अशा व दुसरे कांहीं कसबानीं त्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांवर दिवसें दिवस शह बसविला आतां युरोपियन लोक ह्मणजे हुशार नाहीं. असें आह्मी मुळीच म्हणत नाहीं. परंतु मोठ्यांचें सर्वच मोठें ह्या न्यायानें ते सत्ता धीश असल्या मुळें त्यांची प्रशंसा वाजवीपेक्षां जास्त होऊं लागली व त्यांचे उलट हिंदुलोक आहेत त्यापेक्षां कमी आहेत असें लोकांस वाटूं लागलें- आणि अशा प्रकारांनीं युरोपियन व हिंदु यांच्यामध्यें जो थोडा कांहीं फरक होता तो आतां इतका वाढला आहेकीं युरोपियन व हिंदु लोकेत्तर मंडळी हिंदुलोकांस कसपटा समान मानुंलागले आहेत. हिंदु लोकांचे तेवढें सर्वच वाईट हें जणूकाय ब्रम्ह वाक्य त्यांचे मनांत भिनून राहिलें आहे.

आतां आमचे शेटजी तरी अशाच मंडळी पैकीं आहेत. खात्या वरचि वासें मेजणारी जी कांहीं मंडळी आज मित्तीस या भूतलावर हयात असेल त्यांचा शेटजी हा एक उत्कृष्ट मासलाच आहे असें म्हटलें तरी वावगें होणार नाहीं. ह्यांचे पूर्वज सुमारें बाराशें वर्षांमागें कोठे आश्रय मिळेना म्हणून हिंदुस्थानांत आले. आल्या बरोबर ते अग्नि व गो यांचे कडक उपासक बनले. फारतर काय सुरती वाण्याची टोपी ही मस्तकावर धारण करण्यास त्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. यावरून आपल्या फायद्या करितां दुसऱ्याचें अनुकरण करण्याची शैली यांना पूर्वींपासूनच उत्कृष्ट सधून गेली आहे असें वाटतें. असो. त्या वेळीं हिंदुलोकांची विशेष गरज असल्या मुळें ते अशा प्रकारें हिंदुची मर्जी संपादूं लागले होते. आतां ईश्वर कृपेनें दयाळू इंग्लिश सरकारचें राज्य झाल्या मुळें तर त्यांना हिंदु लोकांची मुळीच गरज नाहीं आहे हें सर्वांस माहित आहेच म्हणून ते आतां युरोपियन लोकांचें अनुकरण करून त्यांची मर्जी संपादून करीत आहेत. जसें युरोपियन लोक हिंदुस्थानांत आले कीं लागले बोलायला कीं हिंदूच्या धर्मामध्यें अमूक वाईट आहे तमूक वाईट आहे अमूक गोष्टीमुळें हिंदूंचें स्वातंत्र्य गेलें अमूक एक गोष्ट त्यांनीं केली नाहीं म्हणून त्यांजला ही दशा प्राप्त झाली आहे वगैरे. ह्या प्रमाणें या पारशी लोकांपैकीं आमचे मलबारी शेट आज तीनचार वर्षें बहकूं लागले आहेत. कार्य साधू लोक असतात त्यांजला वाटत असतेंच कीं आपल्या जोडीदार लोकांचा अपजय तोंच आपला जय. त्या प्रमाणें ह्या आमचे शेटजींची वर्तणूक आहे हिंदूलोकांस अगदीं कवडी मोल ठरवलें म्हणजे झाला आपला उत्कर्ष असें त्यांजला वाटतें हिंदुलोकांमध्यें कांहीं घातक चाली आहेत असें म्हणून त्यांचे समाजाची सुधारणा करण्याचा जो त्यांनीं आवघातला आहे तो तरी एवढ्या करितांच आहे. ते करीत आहेत हें सर्व ढोंग आहे व असें करण्याचा त्यांचा दुसरा कांहीं तरी हेतू तर असलाच पाहिजे. नाहींतर हिंदुसमाजाची सुधारणा करूं इच्छिणारे एक पारशी गृहस्थ या नांवावरच हें विकत आहेत ना. नाहींतर एरवी इंग्लंडांत अशा मनुष्यास कोण विचारणार होता ह्या ढोंगा मुळें मोठमोठ्या लोकांच्या भेटी तरी झाल्या हा काय लहान फायदा?

दुसरें एक कारण असें कीं स्वतांची सुधारणा केल्या शिवाय दुसऱ्याची उठाठेव करणें हे कांहीं चांगलें नाहीं. तर मलबारी शेटानीं स्वजाति मध्यें सुधारणा करण्या सारखे कांहीं शिल्लक राहिले नाहीं कीं काय हा एक प्रश्न येऊन उभा राहतो. परंतु नाहीं, असें कधीं ही होणार नाहीं, कारण ते लोक म्हणजे सुधारणेच्या शिखरासास जाऊन पोहोचले आहेत असें कांहीं नाहीं. युरोपियन लोक हिंदूस जसे हलकट व नीच समजतात तसेंच त्यांना ही समजतात. क्राफर्ड प्रकरणासंबंधे ओमानी साहेबानीं आपल्या टिपणांत असें म्हटलें आहे कीं सरजेम शेटजी जिजीभाई पासून मेरवानजी वकिला पर्यंत पारशी लोक हिंदुपेक्षां नीच पणांत कमी आहेत असें नाहीं. तेव्हा उघड दिसतें कीं मलबारी शेटजींना स्वजातियां मध्यें सुधारण्या जोगें अजून बरेंच राहिलें आहे. तेव्हां आपल्या सभोवतीं अंबार तसाच ठेवून दुसऱ्याची उठाठेव हे करूं लागले आहेत म्हणून असें करण्यांत त्याचा कांहीं तरी गुप्त हेतु असलाच पाहिजे. नाहींतर हे पारशी भाई हिंदुलोकां करितां इतकी घस सोसणार; आणि ती तरी म्हणाले त्यांचे सामाजिक सुधारणे करितां असें व्हावेंतरी कसें? परंतु हिंदुलोक कांहीं आताशां बोळ्यानें पीत नाहीं आहेत. त्याना स्वतांची अक्कल म्हणून कांहीं तरी आहेच. त्यांना जरूर वाटल्यास ते आपली सुधारणा करण्यास कधींही मागेंपुढें पाहणार नाहींत. व जशी जशी त्यांना जरुरी पडली तशा तशा यांनीं सुधारणा ही आज पर्यंत केल्या आहेत.

तेव्हां तात्पर्य एवढेंच कीं शेटजी सारख्या परकी मनुष्यास या कामांत उठाठेव करण्याची कांहींच गरज दिसत नाहीं. शिवाय हें ही आम्हीं खात्रीनें सांगतों कीं शेटजींनीं जरी आपलें सर्व आयुष्य खर्चिलें तरी हिंदुधर्मशास्त्रांचे हेतु त्यांना समजणार नाहींत शेटजींनीं हेंही खूप लक्षांत ठेवावें कीं सध्यां ईश्वराचे दयेनें इतर लोकां प्रमाणें हिंदुलोक ही बगळ्याचे ढोंगाला जसें मासे फसतात तसें फसले जाणार नाहींत. म्हणून आम्हीं पुन्हां एकदा मलबारी शेटजींचा हा प्रयत्न नको आहे असें म्हणून हा लेख पुरा करितों.

'नागपूर आणि वऱ्हाड टाइम्स' चा बातमीदार त्या पत्रास असें कळवितो कीं हैद्राबादचे हल्लीचे रेसिडेंट सर फिटसपॅट्रीक ह्यांची नेमणूक सहा महिनें पावेतों बंगालचे दुय्यम गव्हरनर सरस्टुअर्ट बेली याचे जागीं होणार आहे व ते आपल्या कन्येच्या विवाह समारंभास इंग्लंडात सहा महिन्याच्या रजेवर जाणार आहेत, प्रसिद्ध ग्लाडस्टन साहेबांचे चिरंजीव मि. हरबर्ट ग्लाडस्टन ह्यांच्याशीं हा विवाहयोग घडून येणार आहे हे दुय्यम गव्हरनर साहेब रजेवरून परत आल्यावर आमचे रेसिडेंन्टसाहेब सहामहिन्यांच्या रजेवर जाणार व हे परत आल्यावर सरस्टुअर्ट बेलीसाहेब हिंदुस्थानास शेवटचा सलाम ठोकणार व त्यांच्याजागीं हैद्राबादच्या रेसिडेंन्ट साहेबांची कायमची नेमणूक होणार व त्यांच्या जागेवर आमचे लोकप्रियकमिशनर मि. ऊडन साहेब याना नेमून आमचे हायकोर्ट जज्ज मि. स्पेनस्की हे वऱ्हाडचे कमिशनर होणार अशी हैद्राबादेस दाट वदंता आहे; परंतु ह्या आह्मा वऱ्हाडातील लोकांस आनंद दायक बातमींत कितपत तथ्य आहे ह्याचा अंदाज करितां येत नाहीं कारण मध्य प्रांतचे मुख्य कमिशनर मि. मेकंजी यांचीच नेमणूक बंगालचे दुय्यम प्रतिनिधींच्या जागेवर होणार अशी ही बातमी आहे.

रेसिडेन्सी आरडर्स जाहिरात

वऱ्हाड कमिशनांतील कामगाराचे परीक्षे करितां रेसिडेन्सी जाहिरात नंबर १४९ तारीख १ अगष्ट सन १८८७ यांत प्रसिद्ध केलेले नियम १७ व १८ या ऐवजीं पुढील नियम दाखल करण्याबद्दल रेसिडेंट साहेबांनीं खुष होऊन हूकूम दिला आहे.

नियम १७—प्रत्येक उमेदवारानें एखादे विषयास दिलेले एकंदर मार्कीपैकीं त्या विषयांत पसार होण्यास योग्य होण्याकरितां निमे मार्क मिळविले पाहिजेत. आणि ( with credit ) म्हणजे उत्तम रीतीनें पास होण्यास सर्व मार्कांपैकीं ३/४ मार्क मिळविले पाहिजेत.

नियम १८—कोणतेही उमेदवारास पहिल्या परिक्षेंत कोणतेही विषयांत निमेपेक्षां कमी नाहीं इतके मार्क मिळाले असतील तेव्हां त्याच विषयांत परिक्षा दुसऱ्यानें देण्याचे जरूरी नाहीं. परंतु कोणतेही उमेदवाराचे नांव जोपर्यंत त्यानें प्रत्येक विषयांत निमे मार्क मिळविले नाहीं तोपर्यंत कोणत्याही स्व्यांडर्डांत पूर्ण पास झाल्याबद्दल ग्याझिटांत छापलें जाणार नाहीं एखादा कामगार मराठींत लोअर किंवा हायर स्व्यांडर्ड प्रमाणें पास झाला या विषयीं नियम १४ अन्वये कमिटीचे निकालाप्रमाणें ठरविले जाईल.

The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 1, 1890.

THE INDIAN CIVIL SERVICE.

After a great deal of discussion and agitation for several years past, after commissions so common and a thousand hopeful anticipations at length come out regulations for the open competition of the Indian Civil Service.

This examination will be held in August 1892. Regulations for that of 1891 will be issued if we informed right in a few days. We are only sorry that the change has given no advantage to the Hindus who are still to labour under those very disadvantages. The limit of age however has been indiscriminately raised to all alike. This is the only vital change.

The examination will commence on 1st August 1892, instead of the beginning of June. The candidates must be over twenty one and under twenty three years of age on April 1st 1892. The old limits were seventeen and nineteen on the previous January 1st. An order for admission to the examination will be sent to each candidate on July 18 two months later than hitherto. The open competitive examination will take place only in the following branches of knowledge.

Five hundred marks are reserved for each of the following languages and literatures. The French, The German, The English, the sanskrit, and the Arabic. For English composition there are also 500. For each of the Greek and Latin literatures there are 750. for mathematics (pure and applied) 900 and the same number of marks for advanced mathematical subject (pure and applied). The candidates are to try only three of the following sciences viz Elementary Chemistry and Elementary physics, Higher Chemistry, higher physics, Geology, Botany, Zoology, Physiology, and English History. Of 600 marks each carrying an aggregate of 1800. Five hundred for Greek history and four hundred for each of the ancient histories; five hundred for each of the following namely Political economy and economic history, General modern History, Roman Law. English law, including Contract, and Constitution. Five hundred and thirty for Political science. Four hundred for moral Philosophy and the same for Logic and mental philosophy.

Candidates are at liberty to name any or all of these branches of knowledge. No subjects are obligatory. A syllabus, defining in general terms the character of the examination in the various subjects, will be issued and notice of its appearance given in the London Gazette.

The Civil Service Commissioners will as hither to continue to make such deductions from the marks assigned to candidates in each subject ( with the exception of English and mathematics) as may be deemed necessary in order to secure that a candidate be allowed no credit at all for taking up as subject in which he is a mere smatterer.

It is evidently intended to make the examination far stiffer than before. The subjects are more numerous and the maxium obtainable are 12,700 in place of 71,00. Candidates will no longer be at liberty to select a particular period in English History in which to be examined, and the following in the old prospectus are not in the new:—

A considerable portion of the marks for English History and Literature will be allotted to the work selected by the candidate. In awarding marks for this regard will be had partly to the extent & importance of the period or books selected but chiefly to the thoroughness with which they have been studied. The examination in mathematics will range from arithmetic, algebra and elementary geometry, upto the elements of the deferential and integral calculus including the lower portions of applied mathematics. The standard of marking in Sankrit and Arabic will be determined with reference to a high degree of proficiency such as may be expected to be reached by a native of good education.

In stead two years' probation in England and periodical examinations, the new prospectus reads thus:—

*Selected candidates before proceeding to India will be on probation for one year at the end of which time, they will be examined with a view of testing their progress in the following subjects. Four hundred marks are reserved for each of the following subjects. The principle vernacular language of the province to which the candidate is assigned, Sanskrit, Arabic Persian, Political economy Five hundred marks for Indian Penal code and Criminal Procedure code 1882.300 marks for History of India 450 marks for the code of Civil Procedure Code 1882 and the Indian Law of Contract 1872 and 350 marks for Indian and Mahomedan law.*

These subjects may not be offered by any candidate who has offered them at the previous examination. A syllabus, showing the extent of examination, will be issued to the successful candidates as soon as possible after the the result of the open competition is declared.

The marks in the final examination will be subject to deductions as in the open competition. Persons desirous to be admitted as candidates must apply on forms which may be obtained from the secretary, Civil service Commission London S. W. at any time after Decr. 1, 1891 The forms must be returned so as to be received at the office of the civil service Commissioners on or before may 31 st 1892. Evidence of health and character must bear date not earliar than May 1, of 1892 Applications to alter the list subjects named must be received not later than July 5.

Seniority in the service will be determined by the candidate's position in the list resulting from the combined marks of the open and Final examinations. Hitherto the Final examination alone has fixed the seniority. An allowance of £ 100 (instead of £ 300) will be given to all candidates who pass their probation at one of the universities or colleges approved by the secretary of state. Candidates selected under these regulations 1892, will, in view of the alteration in the limits of age have seniority over the candidates selected under the previous regulations in 1891

We are informed that the regulations for 1891 examination will be issued in a few days.

## THE INDUSTRIAL ASSOCIATION OF WESTERN INDIA.

This fortnight we acknowledged with thanks the receipt of a copy of a prospectus of the Industrial association of Western India. Some months ago there was an industrial conference held at Poona. It was resolved at its sitting to establish an association for watching the industrial progress of the country and for encouraging it. We passed in our columns then a few remarks on the advisability and desirability of such a worthy project. Therefore what we are going to write this time can not be new. We only say that the prospectus before us is a project of a long cherished scheme in entire confirmity with our views. The association is of course in keeping with the resolutions passed at the Conference. The rays of light from the several newspapers have penetrated into this project no doubt with some reflections and refractions.

The alarming condition of the country no one will deny renders such an association a matter of absolute necessity. It is therefore with great pleasure that we see our Poona friends undertaking a lead in the matter. The association proposes to investigate as fully as possible the causes that lie at the root of the present deplorable condition of the working classes of the country. So far the work is of a charitable nature. The association respectfully urges upon Government that in the rehabilitation of an industrial system based as of old on diverse employments and suited to the genius of the people lies the sole safe guard of the poorer classes against famine and therefore the key stone of Indian Finance. Herein lies it thinks the only lasting and effective means of developing the resources of the empire. The association will stand quite free of all preconceived ideas as to how its advice should be given. In all open economic questions it will by the mere fact of the members that must compose it be quite free from prejudice. It will bring an open mind to the discussion of a subject that is of vital interest to every one. We quite agree with the promoters of the association in all this.

The association is to consist of patrons, vice patrons, life members, associates and fellows. It will endeavour to carry out its objects of encouraging and promoting native arts and industries by means of holding exhibitions, establishing trade museums and art gallaries by helping the formation of trades and technical schools and libraries subscribing to scientific books periodical, and newspapers by arranging to hold public lectures on subjects of economic and industrial importance for the benefit of the public generally and of the industrial classes in particular by collecting and sifting information regarding industries and arts as practised in the country and by arranging it in such a form as to be useful to those engaged in their pursuits or seeking information concerning them and by taking such other steps and using such other means generally as are calculated to promote the objects of the association.

We heartily approve the line the association proposes to work upon. There can be little doubt that the scheme will be received with great enthusiasm and in a very hearty manner. No doubt in the present form only the general lines upon which it will be established and it might be worked have been indicated. Since the movement is yet only in its embrys we are not prepared like our contempcraries to pass ungenerous remarks. The pormoters of the movement or rather the originators of the movement have signed the prospectus. It is an uncharitable judgment and gross error to suppose that those who have signed will be the only members. The names of Hari Raoji Chiplonkar The Hon. Raobahadur Ranadye, Nulkar, and dorabji Padum ji must work like a spell upon the minds of the people. The association can never be a sectarian nor can it be confined only to men of letters. These are strong men and though Raobahadur Ranade is a man of theory only men like the Municipal President and Mr. H. R. Chiplonkar are men of great practical experience. To say therefore that among these not one of any practical experience is to be found is an error. Moreover we ask these people to bear in mind that these people are not the only men to constitute the association to which we wish a heart felt success.

## वऱ्हाड.

डा. लिटल सोहब सानिटरी कमिशनर साहेब शहर सफाई पाहून फार खुष झाले व आहे त्याच्यापेक्षां अधिक सुधारणा होण्याचे उपाय करण्याबद्दल कमेटीच्या मेंबर लोकांस कांहीं सुचना केल्या. डा. रेली साहेबांनीं नापसत ठरविलेले मुनासिपल इन्स्पेक्टर रा. रा. शिताराम सखाराम यांच्या वाऱ्यांसच शहराच्या हल्लींच्या सफाईचें श्रय दिलें पाहिजे व ही गोष्ट डा. लिटल साहेबासही कबूल आहे. डा. रेली व म्यु. क. चे इतर मेंबर यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें कीं ह्या गृहस्थासारखा मेहनती मनुष्य कमेटीस मिळणें फार कठीण पडेल. झटून मेहनत केल्याबद्दल उत्तेजनार्द।

खल बढती देण्याचें एकाकंदेच राहून उलटें वाईट शेरें देणें हें कधींही योग्य होणार नाहीं. रा० रा० शितारामपंत उर्फ बापुसाहेब यांच्या सारखा एवाच अकोल्यातील हद्दी व चौकस लोकांवर दुसऱ्या गृहस्थाचा राहील किंवा नाहीं याचा संशयच आहे.

मागील गुरुवारी येथील ट्रेनींग कालेज मधील विद्यार्थी कृष्णा पांडु सर्प दंश होऊन मरण पावला. ह्यास आदल्या दिवशी रात्रीं ११ वाजतां दंश झाला होता परंतु सकाळ पर्यंत त्याच्याच समजण्यांत न आल्या मुळें औषधोपचार करण्यास सवड झाली नाहीं.

लवकरच होणाऱ्या खानेसुमारीचें काम जारीनें सुरू आहे.

वऱ्हाडसाठीं १८०० रु० दरमहा पगाराची एक डायरेक्टर आफ ल्यांड रेकार्डस व अग्रिकलचरची जागा मंजूर झाली आहे. या कामावर मि० हेअर सा० यांची योजना होणार आहे असें ह्मणतात यानां एक आसिस्टंट मिळणार आहे. या अफिसासाठीं किती अमला मिळणार आहे हें अद्यापि पक्कें कळलें नाहीं. या व्यवस्थेचे योगानें कमिशनर आफिसचे कांहीं काम कमी होईल असें वाटतें.

आजपासून उमरावतीस आफिसर लोकांची हायर व लोअर स्ट्यांडर्डची परीक्षा सुरू होणार आहे. त्यामुळें आमचे येथील मि. रुस्तमजी व मि. अजीमुद्दीन यांची कोर्टें ता. ४ सप्टेंबर पर्यंत बंद राहतील.

मि. कृष्णाजी मल्हार पैठणकर यांची बदली झाल्यामुळें एका मुनासिपल कमिशनरची जागा खाली झाली होती त्या बद्दल निवडणूक ता. २९ रोजी झाली मि. अजीमुद्दीन हिंदुस्थानी शाळांचे इनस्पेटर व मि. सुरजमल शेट असें दोन उमेदवार होतें पैकीं सुरजमल शेट मेंबर निवडले गेलें या निवडणूकीच्या वेळेस मतें मिळविण्या कारितां जी खटपट झाली व उमेदवार लोकांचा व त्यांचे पक्षाचा जो उत्साह दिसून आला अशी खटपट व उत्साह जर नेहमी कायम राहिल तर हिंदुस्थानचे लवकर कल्याण होईल असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. मि. सुरजमल यांनां १८३ मते मिळाली व मि. अजिमुद्दीन याना १२७ मतें मिळाली. मि. सुरजमल यांची निवडणूक झाली हें पाहून आम्हाला फार आनंद वाटतो. कारण या वेळेस त्यांच्या सारख्या कडून च आमच्या पाण्याच्या स्कीमला यश येणार आहे. व जसा त्यानीं मत जमा करण्यांत उत्साह दाखविला तसाच कामात ही दाखवितील अशी आह्मीं उमेद बाळगतो. या वेळेस जरी मि. अजिमुद्दीन साहेब निवडले गेलें नाहीं तरी पुन्हा कधी तरी ते निवडले जातील व त्या बद्दल त्यांचे पक्षाचे लोक खटपट करतील अशी आह्मी आशा बाळगतो.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येत कीं अकोले म्यु० कमिटीचे हद्दींतील कंदील लावण्याचा मक्ता १८९०-९१ ता० २० सप्टेंबर सन १८९० इसवी रोजीं हरास होणार आहे ज्या लोकांस घेण्याची इच्छा असेल त्यांना सदरहु तारखेस टौनहालांत सकाळीं ७॥ वाजतां हजर व्हावे कळावें. ता० ३०-८-९० इ०

V. K. Desai
Secretary A. M. C.

## वर्तमानसार

निजाम सरकारचा एक दांत दुखत होता तर त्या बदल त्यांनां ८ हजार रुपयांचा खर्च आला! थोरांचे सर्वच थोर.

गुरांस सरकीचें खाणें दिल्यानें किती फायदे होतात ही गोष्ट पुष्कळांस अद्याप चांगलीशी समजली नाहीं. या कामांतील बहुतेक सर्व निष्णात गृहस्थांचें हल्लीं असे मतैक्य झालें आहे कीं, सरकी सारखें स्वस्तें व उत्तम खाणें गुरांस व मेंढरांस दुसरें कोणतेच नाहीं. याच्या पेंडींत सुमारें शेंकडा ४१ भाग मांस वृद्धी करणारे व सुमारे ३८ भाग चरबी वृद्धी करणारे पदार्थ असतात. गव्हांच्या भुस्यांत ह्या दोन्ही गुणांचें प्रमाण फक्त शेंकडा १४ व ५० असेंच असतें. या वरून पाहतां भुस्स्या पेक्षा ही सरकीची ढेप ( पेंड ) ही जास्त पौष्टिक आहे असें जरी आहे तरी अद्याप सरकीचा किती दुरुपयोग होत आहे ही गोष्ट सर्वांनीं विचार करण्या सारखी आहे.

बायांचा सन्मान—पंदाच्या राष्ट्रीय सभेंत ज्या बाया डेलीगेट्स येतील त्यांचे यथोचित आगत स्वागत करण्यासाठी विद्वान बंगाली बायांनीं एक मंडळी स्थापन केली आहे.

भाजलेल्या वर पहिल्या प्रतीचा उपाय:—भाजलेल्या जागेवर गव्हांची कणीक बांधावी, या सारखा सोपा व जलद दुसरा उपायच नाहीं. गोड्या तेलांत थोडा चुना कालवून तो लेप भाजलेल्या जागीं करावा, म्हणजे तात्काळ तोब कमी होत जातो.

रशियन— लोक आपला फैलाव हिंदुस्थानच्या चारी बाजूवर अंतस्थ इलाजानें चालू करण्यांत निमग्न असावेत. त्यांनीं कांहीं धाडशी स्त्रिया या कामासाठीं पसंत करून हिंदुस्थानांत पाठवून लोकांचीं मनें आपल्या विचारांत ओढून घेण्याच्या खटपटींत गुंतविल्याचें समजतें. ह्या स्त्रिया शूर लोकांचीं मनें वेधून त्या आंगानें सर्व हेतु सिद्धीस नेणार कीं काय? धा० वृ०

आमच्या इकडे युरोपियन गार्ड नेटीव स्त्रियांची इज्जत घेतात पण हैद्राबाद रेल्वेवर युरोपियन लोक युरोपियन बायांचीच इज्जत घेतात हें आश्चर्य नव्हे काय? म्याकडोनल्ड नावच्या एका मनुष्यास नुकतेंच कैद करण्यांत आलें असून तसें करण्याचें कारण असें सांगतात कीं सदर्हू इसमानें शिकंदराबादेहून गाडी निघाली त्यावेळीं एका युरोपियन तरुण पोरीवर डब्यांत शिरून तिच्यावर जुलूम करूं लागला. पुढें स्टेशन आल्याबरोबर त्यास पकडण्यांत आलें. धन्य झाली या पशूंची!

विलायतेस चैनीमध्यें कसा पैसा खर्च होतो हें एका पत्रानें सुरेख रीतीनें सिद्ध केलें आहे त्यांत तो एक ठिकाणीं ह्मणतो कीं फक्त फुलाकडे १०,००० रुपये खर्च होतात! पैसा असल्यावर मग काय कमी! !

अलाहाबाद येथील युरोपियन लोकांत पटकी उठली आहे असें सांगतात.

मद्रासेस बरीच पटकी उठली आहे असें ह्मणतात.

मि. ग्लाडस्टन यांचीं स्त्रीशिक्षणासंबंधाचीं मतें आमच्या उतावळ्या सुधारकाहून फार आकुंचित आहेत! हें कसें?

विलायतेंत बजेट वाचण्यांत आलें त्यावेळीं सर गार्स्ट, हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी ह्मणाले कीं, मिठावरील कर यंदा कमी करतां येत नाहीं कारण दुष्काळाचा फंड पुरा करावयाचा आहे. कारण मोठें सुरेख व न्यायाला धरून यांत कांहीं संशय नाहीं! थोरें इंग्रजी राज्यपद्धती!

मि. डाल्टन नावाच्या अमेरिकनानें इंग्लंडची खाडी पोहून ओलांडली! हा २३ १/२ तास पोहत होता!

जडा व मेक्का येथील पटकी आतां कमी होत आहे. अजून रोज ३० माणसें मरतच आहेत.

हिंदुस्थानांतील आपल्या प्रवासाचें एक पुस्तक ड्यूक आफ कनाट लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. या बुकांत जी चित्रें यावयाचा आहेत तीं डचेस आफ कनाट या स्वतः काढणार आहेत या बाई उत्तम चितारी आहेत असें ह्मणतात.

काळ्या समुद्रांत रशियन सरकार चार लढाऊ गलबतें बांधणार आहे असें ह्मणतात.

गरम चहाच्या पेल्याची लालूच—जर्डी येथील एका कापसाच्या गिरणींतील बाया व मजूर सकाळीं सहा वाजतां बरोबर कामावर येत नसत; यामुळें मालकाचा फार तोटा होई तेव्हां त्यांनीं असा ठराव केला कीं जो मनुष्य बरोबर सहा वाजतां कामावर येईल त्यास एक गरम चाहाचा पेला प्यावयास मिळेल. ह्यामुळें असें झालें कीं, ऐन थंडीचे दिवसांत सुद्धां सर्व मजूर त्या एका चहाच्या पेल्यासाठीं धरपडत सहाच्या ठोक्यास हजर होत. हे पाहून इतर गिरण्यांतील मजुरांनीं ही आपल्यास चहा मिळेल तर आपण लवकर कामावर येऊं नाहीं तर येणार नाहीं असा निश्चय केला आहे. ठा० अ०

एकाच समयास तीन कन्या प्रसवणारी माता – जुन्या धुळ्यांत – एका शिंपी जातीच्या औरतेचें, गेल्याचे मागील आठवड्यांत एक उदाहरण घडून आलें आहे. तीन कन्यां पैकीं दोन अद्याप जिवंत असून एक जन्मून बरेंच दिवस वाचून हल्लीं मेल्याचें ऐकत आहों.

येवलें येथें पोळ्याचे दिवशीं बैल मिरवून घरीं परत आले तेव्हां एका तेलणीनें नाकांतील नथ काढून ताटांत ठेवून बैलास ओवाळलें, व नथेची आठवण न झाल्यामुळें ती ताटांतच राहिली. ती पोळी बरोबर बैलाच्या पोटांत गेली. द्वि. बं.

रोम शहरांत एक मनुष्य विमानांत बसून वर गेला, तो त्यांचे वर तेथून पन्नास मैलावर होतें तेथें उतरला.

एका फ्रेंच गृहस्थानें एक विजेचा सापळा तयार केला आहे. त्याला उंदराचा वगैरे स्पर्श होताच ते मरतात.

कलकत्या कडील कोणी एका नामांकित स्वदेश वैद्यानें देवींवर आपल्या वैद्यकांत चांगलें औषध सांगितलें आहे, असें शोधून काढिलें आहे. त्याचे ह्मणणें आहे कीं, सद्याच्या देवीखात्यापेक्षां या औषधानें सरकारचा व लोकांचा अधिक फायदा होईल.

धरमावरम – येथें एक चांचणी रात्रीचे आठवाजण्याचे सुमारास आकाशांत दिसूं लागते तिचा प्रकाश चंद्रप्रकाश प्रमाणें पडतो व ती चांदणी विस्तवा सारखी लाल दिसते ती सुमारें एक तासभर दिसत असते. अशा अर्थाचें तिकडील एका गृहस्थानें आम्हांस पत्र पाठविलें आहे.

लंडनची ता. २२ चो तार सांगते कीं, आपल्या कुटुंबांच्या विनंती वरून महाराज धुलिपसिंगानीं महाराणी सरकारची मोठ्या नम्रतेनें माफी मागितली आहे; व ही माफी महाराणी सरकारानें एका अटीवर त्यास दिली आहे व ती अट हीच कीं धुलीपसिंगानें लाहोरावरील किंवा पंजाबावरील आपला सर्व हक्क सोडावा. धुलीपसिंग हल्लीं इतर ठिकाणी आहेत. या तारेवरून व याच्या पूर्वीं जी एक तार प्रसिद्ध झाली आहे त्यावरून महाराज धुलीपसिंग पुन्हां विलायतेस जाऊन पडणार असें दिसतें. महाराणी सरकारानें जी एक अट घातली आहे ती महाराणी सरकारानें बरोबर घातली आहे पण ती महाराजांनीं कबूल केली किंवा नाहीं हें अजून बाहेर आलें नाहीं तरी पण महाराज ती अट कबूल करून पुन्हां विलायतेस येतील तर पंजाबांतील कित्येक लोकांस व त्यांचा अभिमान बाळगणाऱ्या सर्व लोकांस फार वाईट वाटेल यांत संशय नाहीं. अफगाणचा अमीर होण्यापेक्षां इंग्रजांचा गवत कापणारा होणें बरें हें जे याकूबखानाचें म्हणणें त्याच मालिकेंत धुलीपसिंग येणार! ठा. अ.

मि० ए० अ० ह्यूम हे अक्टोबर अखेरीस येथें यावयाचे आहेत.

मांचेस्टर येथील एक गिरणी जळाल्या मुळें सुमारें १२ लक्ष रुपयांचें नुकसान झालें.

---

## जाहिरात.

विक्रीस तयार असलेलीं पुस्तकें.

किंमतीशिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

स्त्री शिक्षण व इतिहास वगैरे पुस्तकांस मोठमोठ्या विद्वानांनीं उत्तम असे आपले पुष्कळ अभिप्राय दिलेले आहेत त्या पैकीं खालचा हा एक आहे.

Mr. G. M. Sathe, Registar of native publications in his report to Govt. for the year 1888 says:— "Among the Historical works of the year, History of the native states, chapter I, by Mr. Limaye, gives much useful information."

## १ सौभाग्य मंदीर.

[ भाग पहिला. ] किंमत ०१२ आणे.

या पुस्तकांत असलेले विषय .

१ स्त्रियांची योग्यता , २ स्त्रियांचें कर्तव्यकर्म , ३ स्त्रियांचें भूषण , ४ स्त्रियांचे दूषण ५ स्त्रियांच्या आवडत्या गोष्टी , ६ स्त्रियां बरील कांहींविशेष प्रसंग , ( पुराण प्रसिद्ध स्त्रियांच्या गोष्टी ) ७ शांडिली आणि सुमना, ८ द्रौपदी आणि सत्यभामा, ९ सावित्री, १० सुकन्या, ११ चुडाला, १२ विदुलेचा पुत्रांस उपदेश, १३ शकुंतलेचें राज सभेंत भाषण, १४ सत्यभामेचें पतिदानव्रत, १५ लक्ष्मी गर्व परिहार, १६ रुक्मिणीची पत्रिका, १७ सिता आणि लोपामुद्रा, १८ लक्ष्मी आणि पार्वती, १९ द्रौपदीचें मनाचा मोठेपणा, २० तारा, २१ मंदोदरी, २२ सुलोचना, २३ श्रीकृष्ण व गोपी यांचा मनोरंजक संवाद २४ स्त्रियांचें परावलंबन

२ स्त्री शिक्षण ग्रंथमाला.... .... ....०१२

या पुस्तकांत निरनिराळ्या प्रकारचे स्त्रियांस वाचण्यास योग्य असे पुष्कळ विषय निबंधरूपानें दिले आहेत.

३ संसार दर्पण.... .... .... ....०१०

याही पुस्तकांत स्त्रियांच्या संबंधानें बोधपर असे पुष्कळ प्रकारचे उपयुक्त विषय आहेत.

४ मुलींची सासरीं वागणूक.... .... ....०६

५ सासुरवास चंद्रिका. ( पूर्वभाग ) ०७

६ सदरचा ( उत्तर भाग. ) .... .... ०५

इतिहास विषयक पुस्तकें.

१ कुर्ग प्रांताचा खरा इतिहास........०६

२ श्री सेतुबंध रामेश्वर वर्णन........०२

नेटिव राजांचा इतिहास

( भाग पहिला. ) किं. ०१४ आणे.

खालीं लिहिलेल्या संस्थानांचा इतिहास यांत आहे.

१ बांसवाडा, २ प्रतापगड, ३ डोंगरपूर ४ किसनगड, ५ धालपूर, ६ अलवार, ७ बुंदी, ८ कोटा, ९ टोंक, १० केरवली, ११ शिरोही, १२ जेसलमिर, १३ रेवा १४ उर्वा किंवा तेहरी, १५ दतिया, १६ सावन्तुर, १७ कच्छ, १८ भोपाळ, १९ धार, २० देवास २१ जावरा.

नेटिव राजांचा इतिहास.

( भाग दुसरा ) किंमत १२ आणे.

यांत ६ संस्थानांचा इतिहास आहे.

१ उदेपूर. २ जयपूर, ३ जोधपूर, ४ भरतपूर ५ बिकानेर, ६ जव्हार.

मनोरंजक विषयांचीं पुस्तकें.

१ संगीत गोपीचंद नाटक.... .... ... ०९

२ गारुडी लोकांचा खेळ.... .... .... ०६

३ स्त्रियांची मंगल कार्यें अथवा डोहाळे जेवण आणि हळदी कुंकू. .... .... ....०६

४ स्त्रियांचें नेत्र कटाक्ष.... .... .... ०३

५ न्हाणवली आणि ऋतुशांती.... .... ०५

६ स्वतंत्र विधवा व त्यांच्या तरुण मुली ०५

७ तरुण बायको अथवा स्त्रियांची स्वतंत्रता .... .... ........०५

८ तरुण स्त्रियांची मौज ..................०५

९ सावित्री आणि पुरुषोत्तम अथवा अनाचाराचा परिणाम .......०५

१० बकावली.................................१०४

शाळांतील लहान मुलांस उपयोगी पडणारीं पुस्तकें.

१ अंकगणितसार ( भाग पहिला. ) ०३

२ तोंडचे हिशेब ( भाग दुसरा. ) ०१०२

३ हिंदुस्थानचा भूगोल....................०१

४ महाराष्ट्र देशाचा इतिहास..............०१

५ सदरची जंत्री ..............................०१

६ अंकलिपी. ( सचित्र. )..............०१०६

या शिवाय आह्माकडे आणखी दुसऱ्या तऱ्हेचीं पुस्तकें मिळतील व्यापारी लोकांस चांगलें कमिशन देऊं

हीं सर्व पुस्तकें उमरावती येथें "प्रमोदसिंधु" छापखान्यांत व खालीं सही करणार यांचे कडे रोख किंमतीनें अगर व्ह्याल्युपेबलनें मागविलीं असतां पाठविलीं जातील.

व्हि० जी० लिमये.

पत्ता:— कांदेवाडी मुंबई गिरगांव पोष्ट.

---

हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

conversational entertainments. The various proposals with their different amendments are a sufficient proof of the intricate points and suggestions the Conference had to deal with. We can hardly spare space enough to reproduce all the details of the proceedings. After having given a summay in Marathi we are only required to remark that the subjects before the Conference though of vital interest in the main argument are mostly departmental.

On Wednesday the Conference commenced its sittings which lasted till Saturday evening. After the welcome-address from the Director the Conference divided itself into two sections. One was the meeting of the teachers and the other was that of the Inspecting officers. In the afternoon on 29th of November Rao Bahadur Jathar presided at a meeting when both the reports of the work done by the teachers and Inspecting officers were separately read. Rao Bahadur then completed the proceedings of the Conference with a farewell speech. The lecture from the chair was full of sound and solid remarks, It summarized the chief points in the reports of the teachers and Inspecting officers. The concluding portion was a short advice on the maxim: 'Honesty is the best policy.'

Drill on the military style was a novel feature of this year. The gymnasium teacher Mr. Bulwant Ganesh had a nice tact in disciplining young students in some dozen tactics. If the natives honestly aspire after the right of enlisting themselves as volunteers they are urgently expacted to encourage drill-exercises in schools and Colleges.

---

Some influential gentlemen of Akola were wise enough to make the most of the Educational Conference. They were able with their help to institute the 'Berar Association of social reform.' Thus we begin a new sort of communication with the whole province. We have opened up a different channel for social improvement. We heartily thank Rao Bahadur Shriram Bhicaji Jathar for taking a prominent part in the matter. We are aware that he will be the last man that will cross the purposes and intentions of the government resolution of non-interference on the part of government servants. But we may make it distinct that the non-interference is ordered not in social but in political subjects. Every man has his rights allowed in his own household and he must have his privileges and burdens in the society of which he forms an integral component. In the matter of social reforms some rules regarding the forms and conditions of the marriage system and the prohibition of drinking are at present circulated for general acceptance. Those who bind themselves at least by one of these rules are entitled to be members of the Association. Mr. Vishnu Moreshwar Mahajani will be the president of the Association and Meesrs Chiplunkar and Bhagwat will act as Secretaries.

---

## वऱ्हाड

वऱ्हाडचे मानी रेसिडेंट नामदार सर स्टयूअर्ट बेली के. सी. एस्. आय. सी. आय. इ. यांस दिसेंबर १७ वे तारखे पासून बंगालच्या लेफ्टनेन्ट गव्हरनरच्या कामावरून स्वगृही जाण्याची परवानगी मिळाली.



'ज्ञानसंग्रह' हें मासिक पुस्तक कांहीं वर्षा पूर्वीं वऱ्हाडांत निघत असे आतां पुन्हां रा. रा. येशवंत गोविंद केसकर यांनीं तें प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. त्याचा पहिला अंक आम्हाकडे आला आहे त्याचा आम्ही आभार पूर्वक स्वीकार करितो. विशे माहिती पुढें देतां येईल.

'अकोला बालसमाजा' चा सातवा वाढदिवस परवां शनिवार रात्रीं मोठ्या आनंदांत गेला. मुलांचीं भाषणें चांगलीं वठलीं. गायन, हातचलाखीचे खेळ वगैरे गम्मती पाहण्यांत आल्या. करमणुकीच्या व अती उपयोगाच्या असल्या गोष्टी मुलांना शिकविणें ही राजमान्य मार्ग होय. या समाजाच्या व्यवस्थापकांचे व मुख्यत्वेंकरून रा. रा. यज्ञेश्वर अनंत वैद्य यांचे आह्मी आभार मानतो.

---

## जाहिरात.

सर्व लोकांस व शेख चांद वलद शेख तालेब रहाणार अकोले यांस खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख १२-११-९० ची 'शुद्धवऱ्हाडी' वर्तमान पत्रांतून जाहिरात दिली त्यामुळें माझे नेकीला व हकाला धक्का पोंचतो आहे त्याबद्दल तुमचा कोडतांत वेळ आल्यास जबाब घेतला जाईल. तुह्मी आपले बहिणीचे वतीनें ही व्यर्थ तक्रार करीत आहां व ज्या जिंदगी बर तिचा कोणत्याही प्रकारें मालकीचा वारस हक्क लागू होत नाहीं अशा जिंदगी संबंधानें खोटी जाहिरात छापवून मला खर्चाच्या पेचांत आणित आहां व माझ्या कायदेशीर हकाविषयीं चारचौघा गांवकऱ्याच्या मनांत संशय उत्पन्न करीत आहा. ही सर्व हकीकत समजून घेऊन चूक कबूल करावी व नोटिशीचा खर्च परत आणून द्यावा तुह्मास योग्य माहिती नाहीं ह्मणून सुचवितो कीं शेत माझे मावसभाऊ कबीर अहंमद जमादार यांनीं मला उदरपोषणार्थ इनामादाखल माझे नांवानें लेखी करून दिले आहे आणि माझे अकोल्याचें घर वडिलोपार्जित आहे त्याचा ताबा माझ्याकडे असल्याचे सर्वांस महशूर आहे. इतर जिंदगीच्या बाबतींत तुम्हीं जाहिराती पर्यंत मजला पोंचविली त्या अर्थीं मी तुंम्हांस कळवितो कीं माझी भावजय अमीर बिबी बंधुच्या पश्चात दहा महिने घरीं माझ्या जवळ होती आणि कांहीं जणाच्या गैर मसलतीनें दागदागिनें व नगदी पैसा घेऊन न कळत निघून गेली तेव्हां मला त्या बद्दल हा ऐवज तुमच्या मार्फत पंधरा दिवसा पूर्वीं न मिळाल्यास कोर्टामध्यें तुम्हा उभयतां बहिण भावावर फिर्याद करावी लागेल आणि त्याचा खर्चवेंच मी न देतां उलट मला लागणारा कोर्ट खर्च तुमच्या शिरावर पडेल. कळावे. तारीख ३० माहे नोवेंबर सन १८९० इसवी.

सही शेख दावल वलद शेख बक्ष निशाणी कट्यार.

conversational entertainments. The various proposals with their different amendments are a sufficient proof of the intricate points and suggestions the Conference had to deal with. We can hardly spare space enough to reproduce all the details of the proceedings. After having given a summary in Marathi, we are only required to remark that the subjects before the Conference though of vital interest in the main argument are mostly departmental.

On Wednesday the Conference commenced its sittings which lasted till Saturday evening. After the welcome-address from the Director the Conference divided itself into two sections. One was the meeting of the teachers and the other was that of the Inspecting officers. In the afternoon on 29th of November Rao Bahadur Jathar presided at a meeting when both the reports of the work done by the teachers and Inspecting officers were separately read. Rao Bahadur then completed the proceedings of the Conference with a farewell speech. The lecture from the chair was full of sound and solid remarks. It summarized the chief points in the reports of the teachers and Inspecting officers. The concluding portion was a short advice on the maxim: 'Honesty is the best policy.'

Drill on the military style was a novel feature of this year. The gymnasium teacher Mr. Bulwant Ganesh had a nice tact in disciplining young students in some dozen tactics. If the natives honestly aspire after the right of enlisting themselves as volunteers they are urgently expacted to encourage drill-exercises in schools and Colleges.

---

Some influential gentlemen of Akola were wise enough to make the most of the Educational Conference. They were able with their help to institute the 'Berar Association of social reform.' Thus we begin a new sort of communication with the whole province. We have opened up a different channel for social improvement. We heartily thank Rao Bahadur Shriram Bhicaji Jathar for taking a prominent part in the matter. We are aware that he will be the last man that will cross the purposes and intentions of the government resolution of non-interference on the part of government servants. But we may make it distinct that the non-interference is ordered not in social but in political subjects. Every man has his rights allowed in his own household and he must have his privileges and burdens in the society of which he forms an integral component. In the matter of social reforms some rules regarding the forms and conditions of the marriage system and the prohibition of drinking are at present circulated for general acceptance. Those who bind themselves at least by one of these rules are entitled to be members of the Association. Mr. Vishnu Moreshwar Mahajani will be the president of the Association and Messrs Chiplunkar and Bhagwat will act as Secretaries.

---

## वऱ्हाड

वऱ्हाडचे माजी रेसिडेंट नामदार सर स्टयूअर्ट बेली के. सी. एस्. आय. सी. आय. इ. यांस दिसेंबर १७ वे तारखे पासून बंगालच्या लेफ्टनेन्ट गव्हरनरच्या कामावरून स्वगृही जाण्याची परवानगी मिळाली.



'ज्ञानसंग्रह' हें मासिक पुस्तक कांहीं वर्षां पूर्वीं वऱ्हाडांत निघत असे आतां पुन्हां रा. रा. येशवंत गोविंद केसकर यांनीं तें प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. त्याचा पहिला अंक आम्हाकडे आला आहे त्याचा आम्ही आभार पूर्वक स्वीकार करितो. विशेष हकिगत पुढें देतां येईल.

'अकोला बालसमाजा'चा सातवा वार्षिक दिवस परवां शनिवार रात्रीं मोठ्या आनंदांत गेला. मुलांचीं भाषणें चांगलीं वठलीं. गायन, हातचलाखीचे खेळ वगैरे गम्मती पाहण्यांत आल्या. करमणुकीच्या व अती उपयोगाच्या असल्या गोष्टी मुलांना शिकविणें हा राजमान्य मार्ग होय. या समाजाच्या व्यवस्थापकांचे व मुख्यत्वेंकरून रा. रा. यज्ञेश्वर अनंत वैद्य यांचे आह्मी आभार मानतो.

---

## जाहिरात.

सर्व लोकांस व शेख चांद वलद शेख तोलन रहाणार अकोले यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख १२-११-९० ची 'शुद्धवऱ्हाडी' वर्तमान पत्रांतून जाहिरात दिली त्यामुळें माझे नेकीला व हकाला धक्का पोंचतो आहे त्याबद्दल तुमचा कोडतांत वेळ आल्यास जबाब घेतला जाईल. तुह्मी आपले बहिणीचे वतीनें ही व्यर्थ तक्रार करित आहां व ज्या जिंदगीवर तिचा कोणत्याही प्रकारे मालकीचा वारसहक्क लागु होत नाहीं अशा जिंदगी संबंधानें खोटी जाहिरात छापवून मला खर्चाच्या पेचांत आणित आहां व माझ्या कायदेशीर हक्काविषयीं चारचौघा गांवकऱ्याच्या मनांत संशय उत्पन्न करीत आहा. ही सर्व हकीकत समजून घेऊन चूक कबूल करावी व नोटिशीचा खर्च परत आणून द्यावा तुह्मास योग्य माहिती नाहीं ह्मणून सुचवितो कीं शेख माझे मावसभाऊ कबीर अहंमद जमादार यानीं मला उदरपोषणार्थ इनामादाखल माझे नांवानें लेखी करून दिले आहे आणि माझे अकोल्याचें घर वडिलोपार्जित आहे त्याचा ताबा माझ्याकडे असल्याचे सर्वांस महशूर आहे. इतर जिंदगीच्या बाबतींत तुम्हीं जाहिराती पर्यंत मजल पोंचविली त्याअर्थीं मी तुम्हांस कळवितो कीं माझी भावजय अमीर बिबी बंधुच्या पश्चात दहा महिने घरीं माझ्या जवळ होती आणि कांहीं जणाच्या गैर मसलतीनें दागदागिनें व नगदी पैसा घेऊन न कळत निघून गेली तेव्हां मला त्या बद्दल हा ऐवज तुमच्या मार्फत पंधरा दिवसा पूर्वीं न मिळाल्यास कोर्टामध्यें तुम्हा उभयतां बहिण भावावर फिर्याद करावी लागेल आणि त्याचा खर्चवेंच मी न देतां उलट मला लागणारा कोर्ट खर्च तुमच्या शिरावर पडेल. कळावे. तारीख २० माहे नोवेंबर सन १८९० इसवी.

सही शेख दावल वलद शेख
बक्षु निशाणी कट्यार.

सहामाही ३ " ३ "
साळअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास............................८४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस ..........०१

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.................................4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10 4as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

V: LXXIV AKOLA MONDAY SEPTEMBER 8 1890 NO 35

वर्ष २८ अकोला सोमवार तारीख ८ माहे सप्टेंबर सन १८९० इ० अंक ३५

डा. वामन गोपाळ यांचा अ क औषधें मिश्रित

### सार्सापारिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें व. सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंडे सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

### गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदू ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्यांचे एक बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा


### कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरिता डा एन वहें. छत्रे यांचे दवाखान्यात वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गोतमराव केशव, मुंबई.

### साचित्रक्याटलाग



आर डा. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांजा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें टिकिट पाठविल्यास मिळेल.

### जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येत कीं अकोले म्यु० कमिटीचे हद्दींतील कंदील लावण्याचा मक्ता १८९०-९१ ता० २० सप्टेंबर सन १८९० इसवी रोजीं हराश होणार आहे ज्या लोकांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु तरखेस टौनहालांत सकाळीं ७॥ वाजतां हजर व्हावें कळावें ता० ३०-८-९० इ०

V. K. Desai
Secretary A. M. C.

### पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये

वणी प्र. कुरणखेड तारीख ३१ माहे आगष्ट सन १८९० इसवी.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः– गम राम वि वि आपल्या पेत्या मार्फी खालील च्यार ओळीस आश्रय द्याल अशी आशा बाळगून खालील मजकूर छापण्यास पाठवीला आहे त्यास केर पुंज्यात न टाकितां आपल्या स अंक कान्या कोपऱ्यात थोडीशीं जागा पाहून आश्रय द्यावा–

तारीख २९, ८, ९० इ रोजीं अकोली निजोपूर ता० आकोला येथें दोनप्रहरा नंतर शतात एक गाय व्याली तिजला कालवड जली. कालवड होतांच गाईनें तिजला जिभानें चाटवें असा मायेचा पचार आहे परंतु तसें न होता त्या गाईनें आपलें बालक ( कालवड ) इचे तीनपाय व शेंपुड असें भक्षण केलें. इतक्यांत शतातील मनुष्य धाऊन त्या गाईस हांकू लागले, नाहीं पेक्षां सर्वच शरीर खाऊन टाकले असतें. कालवड मेयत झाला. मर्दैव गप तें पच्यां देखावळास कोणी देवगाय ह्मणू सोडली आहे. बरें असो दिवसाचामान. आमचे येथें एका शेतांत गायगोऱ्या फार आहेत त्या शेतांत बैल जपण्यास हाकू नलें असतां शेतातील गायगोऱ्या एक दा बैल खातात तव्हां हा काय आमचा अ.द व त्यामधून त्या विशेष काय गोडी वाटत असेल ती तव जाणोत

वणी हा गांव जहागीरी असान ज स १०० घराचें खेडगाव आहे येथें धाग्याचें व नसून नवीवर छपरे आहेत. येथील श्री मारुतीचें देवालय वगैरे सुन्दर खुलें होतें यास आमचे येथील रा. रा. रामजी कारभारी पाटील व मनाजी इंगळे ह्या दोन इसमानीं खटपट करून व पुढारी होऊन श्री मारुतीचें माळवद बांधलें फारच फार चांगलें केलें त्यामुळें खेडे गांवास फारच शोभा आली तसेंच गांवात एक विहिर होती ती शिकस्त जाली होती तिचे काम चांगल तयार केलें. वरील दोनगोष्टी पासून गांवास चांगली शोभा येऊन गावांतील लोकांस चांगलें सुख झालें त्या पासून आह्मीं त्यांचे फारच आभारी आहों. मात्र गांवात एक दुसरी विहीर आहे ती फारच सिकस्त जाली व जमी दोस्त होऊन गेली त्या विहिरिवर गांवातील सर्व लोकांचा पाणी भरण्याचा परिपाठ आहे. तरी ह्या विहिरीत एखादे वेळेस कोणी मनुष्य अगर जनावर पडण्याची भीति आहे तव्हां वरील दोन इसमानीं ज्या प्रमाणें वरील दोन कामास पुढारी होऊन काम तयार केलें त्याच प्रमाणें ह्या विहिरीचें काम हातीं धरून तयार केल्यास आह्मी लोक त्यांचें फारच फार आभारी होऊं कळावें ही विंनती.

आपला
एक ( क्ष )

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक वद्य १० शके १८१२

आपल्या हिंदुस्थान देशाला हल्लींच्या निकृष्ट दशेस आणण्यास जी जी कारणें झालीं त्या कारणापैकींच आमली पदार्थांचे सेवन हे होय. ब्रिटिश सरकारच्या दयाळू राज्य सत्ते खालीं ह्या पदार्थांचें सेवन व प्राशन अव्याहत सुरू आहे इतकेंच नाहीं तर त्यास सरकार कडून कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नसून उलट अपरोक्ष रीतीनें उत्तेजनच मिळत आहे हा मोठी दुःखाची गोष्ट होय.

आमच्या ह्या वऱ्हाड प्रांतांत उपयोगांत येत असलेल्या कैफी व मादक पदार्थांच्या हकीकतीचा मागील ( १८८९-९० ) सालचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील सार आमच्या मराठी वाचकांकरितां खालीं देतो.

वऱ्हाडांत मुख्यत्वें पांच आमली पदार्थांचा उपयोग होतो ते– अफू, गांजा, ताडी, देशीदारू व विलायती दारू. ह्या सर्वांवर सरकारनें कर बसविला आहे त्याकरांचे उत्पन्न गतवर्षी १९२२५१४ रु० झालें व तें ( १८८८-८९ ) पेक्षां ११४९२ रुपयांनीं अधिक आहे आणि १८८७-८८ पेक्षां दोन लाखाहून अधिक रुपयांनीं वाढलें आहे. दरवर्षीं उत्पन्न वाढत्या प्रमाणावर आहे असा पुष्कळ वर्षांचा अनुभव आहे. व त्या मानानें ह्या पदार्थांचा खप ही वाढत चालला आहे हें उघड दिसून येतें. ( चालू सालीं तर फक्त देशी दारूचे मक्ते १२८८९०० रुपयांस हराश झाले व मागील सालीं ११७३४३५ रुपयांस हराश झाले होते ह्मणजे निव्वळ ११५०६५ रुपये देशीं दारू बद्दल सरकारास गुदस्तांपेक्षां यंदा अधिक मिळाले. ) ह्यावरून दारूचा खप किती झपाट्यानें वाढत आहे ह्याचें अनुमान सहज करितां येतें, व ह्या बाईवरच आमची भक्ति अशीच जर वाढावत चालली तर आमची काय दशा होणार व अह्मीं कोणत्या स्थितीस जाऊन पोंहोचणार हा एक मोठा प्रश्नच आमच्या पुढें उभा रहातो.

तिगस्तां ( १८८८-८९ ) पेक्षां सुमारें वीस हजार रुपयांची देशी दारू व चारशें रुपयांची परदेशी दारू ह्या प्रांतांत गत वर्षी जास्त खपली. विलायती दारूच्या चार नवीन दुकानाची स्थापना झाली ह्मणजे १४ ची १८ केलीं व देशी दारूची १८ बंद केलीं ह्मणजे १४४३ होती तीं १४२५ केलीं. खप जास्त ह्मणून विलायती दारूची चार दुकानें अधिक ठेवण्याचें भाग पडलें असावें परंतु ती दारू महाग असतां तिचा विशेष खप कां व्हावा? ह्याचें उत्तर आमचे विलायती तिकडे चांगलें समजणारे व अधुनिक श्रीमान कदाचित देऊं शकतील.

पश्चिम व पूर्व वऱ्हाडांतील दारूच्या दुकानांच्या संख्येंत चमत्कारिक अंतर दिसून येतें पूर्ववऱ्हाडांत ( उमरावती इलिचपूर व वणी जिल्हे ) एकंदर ९४३ दुकानें आहेत व पश्चिम वऱ्हाडांत ९०० आहेत व विशेष चमत्कार हा आहे कीं, जेथें दुकानें अधिक तेथील लोकसंख्या कमी आहे. पश्चिम वऱ्हाडची लोकसंख्या २१२९०३ नें पूर्व वऱ्हाड पेक्षां अधिक आहे. ही दुकानें सारखी करण्यास ह्मणजे पूर्व वऱ्हाडांत ४३ फाजिल असलेलीं दुकानें कमी करण्यास मे. रेसिडेंट साहेबांनीं मे. कमिशनर साहेबांस सुचविलें आहे.

मदिरा पानाचा झपाटा जारी सुरूं असल्या कारणानें अफू ताडी वगैरे आमली पदार्थांच्या उत्पन्नात सरकारास मागील सालीं बरीच ठोकर बसली कारण गुदस्तां ( १८८८-८९ ) ताडी पासून सुमारें तीन हजार व आफूपासून चार हजार रुपये तिगस्तांपेक्षां कमी उत्पन्न झालें. तरी पण यंदा ( १८९०-९१ ) आठ हजारांचा नफाच आहे.

मागील सालीं १६८ मनुष्यें अमली पदार्थ वापरण्याच्या कायद्यांत सांपडून पकडलीं गेलीं व १०३ लोकांस दंड झाले आणि १६ मनुष्यें कैदेंत पडलीं. दंडाचे उत्पन्न २४,२८० झाले आहे. व बातमी कळविणार व गुन्हे पकडून देणारांस बक्षीस दाखल ५९२ रु खर्च झाले. तिमस्तापेक्षां ३२३ ह्या ( १८८९-९० ) सालीं ह्याबद्दल जास्त खर्च केले तरी मे. रेसिडेन्ट साहेबांची ह्याच्याहून बरेच अधिक रुपये बक्षिसादाखल

खर्ची घालण्याबद्दल शिफारस आहे व डे० कमिशनर साहेबांचा हे पदार्थ विना परवाना किंवा अधिक उणे विकिले जाण्याचे बंद करण्याकरितां एखादें छोटेखानी खातें ठेवण्याचा विचार आहे. वऱ्हाडांत न्याय करण्याचे प्रकार कसे असतात याचें एक उदाहरण याच रपोटांत दिले आहे. इलिचपुरमध्यें एकाजवळ १९० तोळे अफू व कांहीं गांज्या होता त्याबद्दल त्यास ४० रुपये दंड झाला व अंजनगावांत एक इसमानें एका पैशाची अफू विकिल्याबद्दल त्यास ही ४० रुपये दंड झाला व तिसऱ्या एकानें ३ तोळें विकिल्याबद्दल त्यास तितकाच दंड झाला. तसेंच आणखी एकानें १ पैशाची विकिली त्यास १० रुपये दंडाबद्दल द्यावे लागले. ही घरसोडपणाची न्याय पद्धत पाहून मे. रेसिडेंट साहेब बरेंच चकित झाले आहेत व न्यायाधीश न्याय निवडतांना न्यायदेवतेस एकीकडे गुंडाळून ठेवीत असावेत असें त्यांचें मत झालें आहेसें दिसतें. आमचे नवाबी न्यायाधिकारी इकडे लक्ष देतील तर बरें.

## राष्ट्रीय सभेसंबंधीं सरकारचा ठराव.

हिंदुस्थान सरकारनें नुकताच ठराव प्रसिद्ध केला आहे त्यांत सरकारी नोकरांनीं राजकीय विषयांच्या संबंधानें सभा झाल्यास त्यांत हजर राहूं नये असें आहे. हा ठराव म्हणजे नवा आहे असें नाहीं. हा ठराव पुर्वी पासून सरकारी नोकरास लागु आहेच परंतु अलिकडे राष्ट्रीय सभे सारख्या सभा होऊं लागल्या व त्यांत सरकारी नोकरांनीं जावें कीं नाहीं अशा बद्दल बराच संशय उत्पन्न झाला होता म्हणून हा ठराव पुन्हा प्रसिद्ध केला आहे. या ठरावाचा वास्तविक उद्देश असा आहे कीं ज्या सभांत सरकारचे व्यवस्थे संबंधीं अथवा राजकीय विषया संबंधीं चर्चा होत असेल त्यांत सरकारी नोकरांनीं जाऊं नये. याचें कारण एवढेंच कीं सरकारी नोकर सभेंत गेल्यामुळे लोकांचे मनावर खोटाग्रह होण्याचा संभव आहे म्हणजे खुद्द सरकारी नोकर सभेंत जाऊं लागले तर लोकांचा असा समज होईल कीं या सभेस सरकारचें अंग आहे व म्हणून रयतेचे धर्मा प्रमाणें त्या सभांस जाणें व त्यांस मदत करणें हें प्रत्येक इसमाचें कर्तव्य आहे वास्तविक पाहातां राष्ट्रीय सभे सारख्या सभांस सरकारची मदत नाहीं व सरकारचें अंग त्या सभांत कोणत्याही तऱ्हेनें आहे असें म्हणता येणार नाहीं अशी स्थिति असल्यामुळें लोकांचा खोटा समज होऊं नये म्हणून सरकारनें हा ठराव प्रसिद्ध केला आहे. दुसरें कारण असें आहे कीं सरकारी नोकर सभेस जाऊं लागले तर त्यांचे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें लोकांवर वजन पडून ते सभेस मदत करतील व हें वजन पडणें तर इष्ट नाहीं या वरून सरकारचा उद्देश लोकांनीं अशा सभा भरवूं नयेत अगर अशा सभा सरकारचे विरुद्ध आहेत असा मुळींच नाहीं या सभांस लोकांनीं इच्छा असल्यास व त्यांजपासून आपले खरें हीत व आपले देशाचें खरें हित आहे असें पक्केपणी वाटत असल्यास हरएक प्रकारांनी मदत करावी त्याजबद्दल सरकारचा कोणत्याही तऱ्हेचा दुराग्रह अगर मनाई नाहीं. परंतु सरकारी नोकरांनीं मात्र लोकांचा खोटा समज होऊं नये म्हणून या सभांस जाऊं नये ठरावांत असेंही लिहिलें आहे कीं ज्या सभेस सरकारी नोकर गेला असतां त्यांचे सभेत हजर राहण्यामुळें लोकाचा वर प्रमाणें खोटा समज होण्याचा संभव असेल तर अशा सभास सरकारी नोकरांनीं जाऊं नये या वरून तर सरकारचा उद्देश केवळ लोकांचा गैरसमज होऊं नये व खोट्या समजुतीनें लोकांनीं या सभेस जाऊं नये एवढाच आहे राष्ट्रीय सभेसारख्या सभांचा वास्तविक उद्देश समजून त्यांत कोणी गेल्यास त्यास मुळींच मनाई नाहीं सरकारी नोकरांचे संबंधानें अशा प्रकारचे नियम पूर्वीपासून येथें आहेतच असें वर सांगितलें आहे. व त्याचप्रमाणें नियम बहुतक सर्व देशांत आहेत व या नियमाचा उद्देश एवढाच असतो कीं सरकारी नोकरांनीं असल्या राजकीय विषयाच्या संबंधानें वादविवाद करित बसणें. व ज्या सरकारची ते नोकरी करतात त्यांचीच वेळ पडल्यास नक्की करण्यास तयार होणें हें सरकारास इष्ट वाटत नाहीं व अशा नियमाबद्दल सरकारास कोणीही समंजस मनुष्य जास्ता दोष देईल असें नाहीं या ठरावाचा उद्देश केवळ वर प्रमाणेंच असून सुद्धां आमच्या या वऱ्हाड प्रांतांत विशेष करून अकोले जिल्ह्यांत काय गैरसमज झाल्याचें आम्हांस समजतें आहे. पाटील पटवारी देशमुख देशपांडे यांस सुद्धां वरील ठराव लागू झाल्याचा समजत आहे व त्याजपासून ठराव आपणास समजला त्यांच्या सह्या हे तहशिल्दार मार्फत घेण्यांत आल्या असें कळत आहे त्यामुळें पुष्कळ जमीदार लोकांनीं सर्वजनिक सभेचे सेक्रेटरी यांजकडे अर्ज पाठविला आहे असें कळतें त्यांत आशय हा कीं डेपुटी कमिशनर मार्फत सरक्युलर ठरावावर लोकांच्या सह्या घेतल्यामुळें यापुढें सार्वजनिक सभेचे मेंबर आपणास राहण्यास हरकत आहे कीं काय? अशा प्रकारचा अर्ज राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी यांजकडे ही पाठविल्याचे कळतें. व या बद्दल खुलासा सरकारातून झाल्या खेरीज आपणास सभेचे मेंबर राहतां येईल कीं नाहीं असा संशय जमीदार वगैरे बरेंच मंडळीस आला आहे. आतां सरकारचा ठराव व उद्देश ही वर प्रदर्शीत केलाच आहे. यानंतर देखील लोकांस संशय येण्यास कारण येवढेंच कीं लोकांच्या सह्या घेतल्या गेल्या व त्यामुळें त्यांस भीती वाटत आहे. पाटीलपटवारी सरकारी नोकर आहेत कीं नाहीं याबद्दल बराच संशय आहे. निदान सरकारी नोकर हे पुर्णपणें तरी नाहींत असें वाटतें. कारण सरकारी नोकरास जमिनी विकत घेतां येत नाहींत व व्यापार वगैरेही करता येत नाहीं या दोन्ही ही गोष्टी पाटीलपटवारी यांस लागूं नाहींत यामुळें सरकारी नोकर या शब्दाची पूर्ण व्याख्या तरी निदान या लोकांस लागू पडत नाहींसें वाटतें. तरी तरी पण अर्धवट तरी हे लोक सरकारी नोकर आहेत असें मानले जाण्याचा संभव आहे. परंतु देशमुख देशपांडे यांस तर हा शब्द मुळीच लागूं होणार नाहीं. कारण ते सरकारी नोकरी मुळींच करीत नसून त्यांस जो तनखा मिळतो ते केवळ पेनशन दाखल आहे व असा ठराव ही आहे कीं यांचें उत्पन्न केवळ पेनशन समजण्याचें आहे. यासंबंधानें सरकारांतून शहानिशा करून घेतली पाहिजे व ती करण्याचे तजवीजींत आमची पुढारी मंडळी आहेच परंतु सध्यांतरी आमचे जमीदार मंडळीस असें सांगणें आहे कीं त्यांनीं सह्या करून दिल्या तरी त्याजवर सरकारचा ठराव कोणत्याही प्रकारें लागू होत नाहीं कारण ते सरकारी नोकर मुळींच नाहींत व ठराव केवळ सरकारी नोकरासच लागु आहे. आमचे जमीदार लोक हे राष्ट्रीय सभा सार्वजनीक सभा वगैरे सभांचे केवळ स्तंभ आहेत यांचे शिवाय तर आमच्या सगळ्या गोष्टी आहेत ह्मणून यांचे संबंधानें तरी सरकार मार्फत खुलासा करवणें जरूर आहे व तो जितका जल्द होईल तितका बरा.

---

'देशी हुन्नर' अथवा हिंदुस्थानदेशांतील कारागिरीचें वर्णन. या नावाचें एक पुस्तक आह्माकडे आज बरेंच दिवस अभिप्रायाकरितां आलें आहे त्याचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करितों. रा. सा बाळकृष्णपंत गुप्त विलायतेंतील प्रदर्शनास हिंदुस्थानच्या वतीनें सरकार कडून गेलेले व तिगस्ता पुण्यातील जी प्रदर्श त्यांच्या देखरेखीखालीं पार पडलें त्यांनीं हें पुस्तक तयार केलें आहे व रा. सा. माधवराव जोशी यांनी छापुन प्रसिद्ध केलें आहे एवढें सांगितलें असता या पुस्तकाच्या उपयुक्ततेची कल्पना सहज करितां येते.

कला कौशल्याच्या शिक्षणाची चळवळ जिकडे तिकडे जारीनें सुरू आहे. सरकारचें व लोकांचें मन या विषयांत अगदीं गढून गेलें आहे अशा वेळेस आपल्या हिंदुस्थानांत आहे काय कलाकुशलतेंत आपल्या देशाची कितपत निपुणता आहे, हें समजणें फार दुरापस्त होतें, ही एक मोठी उणीवच भासत होती परंतु रावसाहेब द्वयांनीं ही उणीव दूर केल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच. आजपर्यंत मराठी भाषेंत जी उपयुक्त ग्रंथ माला ओंवली गेली आहे तिचा मेरूमणी हें पुस्तक होण्यास कांहीं हरकत येईल असें दिसत नाहीं. बारीक टाईपांत छापलेल्या दोनशेंवर पानाच्या सर्व हिंदुस्थानांतील कारागिरांच्या कारागिरीचे वर्णनानें भरलेल्या पुस्तकांत वऱ्हाड प्रांतासंबंधानें कोठें उल्लेख नसावा ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे तरी पण अकोटची सतरंजी इलिचपूरचे रंगीबेरंगी कापड व पटके या वस्तुस 'हुन्नरांत' जागा मिळावयास पाहिजे होती ज्या प्रांतांतून आज लाखों रुपयांचा कापूस परदेशी जात आहे त्याप्रांतांत कापड तयार करण्याचा गिरणी आहे काय? असा प्रश्न निघाला असतां वऱ्हाडांतील छोटेखानी गिरणीकडेच फक्त बोट नेता येते अशा मागासलेल्या व आळस्यांत पूर्ण गढून गेलेल्या प्रांताचें नांव आमच्या पुढें असलेल्या पुस्तकांत न निघणें हें कांहीं मोठें आश्चर्य नव्हे असो.

आमच्या वऱ्हाडी श्रीमंत ह्मणवून घेणाऱ्या परंतु आळशी मंडळीस हें पुस्तक खरेदी करून तरी वांचू संग्रहीं ठेवण्याबद्दल आमची शिफारस आहे. पूर्वीच्या अत्युत्तम कलांचा, पुरस्कर्ता नसल्या कारणानें, कसा ऱ्हास होत चालला आहे, अस्सल जाऊन नकलेची छाप कशी उमटत चालली आहे, ज्यावस्तुविषयीं आपण कधीं कानांनी ऐकिलें नाहीं, ज्या बिलकुल आपण डोळ्यांनीं पाहिल्या ही नाहींत त्या वस्तु या आपल्या हिंदुस्थान देशांत होतात किंवा नाहींत याचा संशय अशा वस्तुंचें सविस्तर वर्णन या पुस्तकांत जागजागीं दिलें आहे. पूर्वीच्या लोकांचे कल्पक बुद्धीबद्दल अभिमान व आश्चर्य व त्यांनीं जे कांहीं करून ठेविलें आहे त्यांत भरपायाडाची तर राहीच परंतु जे आहे ते सांभाळण्याची सुद्धां हयगय पाहून खेद व निराशा उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. आपल्या लोकांनीं काय करून ठेविलें आहे हें जाणून घेण्यास व त्यांत भर घालण्यास काय काय उपाय केले पाहिजेत हे समजून घेण्यास या पुस्तकाचा वाचकांच्या कित्येकांस चौकस मनुष्यास थोडा तरी उपयोग होईल असें वाटतें. पुस्तकाची छपाई सुरेख असून किंमत अवघी दोनच रुपये आहे. उपयुक्ततेच्या मानानें किंमत फारच कमी आहे असें ह्मटलें पाहिजे.

---

ता. ३ बुधवारीं सकाळीं येथील मराठी व हिंदुस्थानी म्यु. मुलींच्या शाळेचा बक्षीस समारंभ मिसेस निकोलिटच्या अध्यक्षतेखालीं झाला. या गावांत अशा प्रकारचा समारंभ पहिलाच झाला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. समारंभास युरोपियन व नेटीव मिळून बरीच मंडळी आली होती. प्रथम मि. तुळशीपंत भागवत यांनीं समारंभाचा उद्देश सांगून युरोपिअन लोकांच्या स्त्रिया या कामांत किती खटपट करितात व मदत देतात व त्याना अशा कृत्या पासून किती आनंद होतो हें थोडक्यांतच चांगल्या रीतीनें सांगितलें. व या गावांत सुद्धां मि. निकोलेट सारख्या स्त्रिया स्त्रीशिक्षणाला उत्तेजन देण्यास व मदत करण्यास तयार आहेत अशा बद्दल आपणास अभिमान मानण्यास बरीच जागा आहे असें ह्मणून त्यांनीं मिसेस निकोलेटला अध्यक्षस्थान देण्या बद्दल विनंती केली व त्यास मि. मौलवी हकीमोद्दीन वकील यांनीं अनुमोदन दिलें त्या नंतर त्याप्रमाणें अमल होऊन कांहीं मुलींनीं उत्तम कविता ह्मणून दाखविल्या नंतर प्रेसिडेन्ट कडून मुलींस खाऊ खण व पुस्तकें वाटण्यांत आलीं व सर्वांस हार व पानसुपारी दिली गेली. पानसुपारी वाटल्या नंतर आमच्या येथील डेपुटी कमिशनर साहेब मि. निकोलेट यांनीं प्रेसिडेंटच्या वतीनें भाषण करून स्त्रीशिक्षण अवश्य आहे असें सांगितलें ते म्हणाले कीं प्रथम स्त्रीशिक्षणा बद्दल या देशांत फार अनास्था होती व कायते श्रेष्ठ वर्णांतील लोक थोडे बहुत खटपट करीत असत परंतु आज सर्व जातींच्या लोकांच्या मुली शिकताहेत हें पाहून मला फार आनंद वाटतो खरोखर आहे कीं मनुष्यानीं आपल्या कुटुंब पोषणार्थ पैसा मिळवावा व घरांत बायकोला त्याची सर्व व्यवस्था लावून हिशोब वगैरे ठेवितां यावा. व हें काम तिला येण्या करितां तिला शिक्षण मिळणें अवश्य आहे. व याचा जियें आभाव आहे तयें मनुष्यालाच दोन्ही कामें करावी लागतात व आपला अमोलिक वेळ निरर्थक घालवावा लागतो. येणें प्रमाणें यांनें बोलणें झाल्यावर मि. देसाई यांनीं प्रेसिडेंटचे व सर्वांचे आभार प्रदर्शित केले व

समारंभ खलास झाला स्त्रीशिक्षणा बद्दल बहुतेक खटपट चालू आहे व त्याला विद्वान मंडळी उत्तेजन देत आहेत हा तर आनंद मानण्याची गोष्ट आहेच परंतु त्यांत मुसलमान ज्ञातीचे लोक आपल्या मुलीस शिक्षण देऊन अशा समारंभांत पाठवितात ही फारच आनंद मानण्यासारखी गोष्ट आहे.

The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 8, 1890.

## EVILS WHICH WE CAN REMOVE OURSELVES.

It is indeed a good sign of the times that our political improvement is taken up with an almost sure chance of ultimate success by our worthy leaders. Several associations have been formed and a number of agencies has been set up to advance and achieve our political improvement; and it requires no prophet to tell that sooner or later success will attain the noble endeavours of our men in the cause of political reform. But it will be a serious blunder to suppose that political reform will prove a panacea for all nation's evils. No doubt the political improvement, for which the nation cries with so much feverish anxiety, will remove many an evil. But by far a larger number of evils *must* continue in our midst, even if we rise politically. And the reason of this apparent anomaly would not be for to seek. Every body, of course free from prejudice and passion, will admit that with the removal of a particular cause, the evils arising from that cause will disappear, leaving other evils in full and free force. It cannot be said that all our political degeneracy if we would but view our present position calmly and carefully, it would at once become apparent that only a small portion of our evils would fall under the head of political evils startling as this may appear to several of our readers, the fact is never theless true. What shuts our eyes to this fact and justifies the ignorant attitude of the common people, is the immense disproportion between the agitation for other Reforms. Daily observing the wonderfully enthusiastic agitation for political improvement in the country and also noticing the apathetic and even ridiculous attitude even on the part of most of our leaders towards other reforms, superficial observers infer that political degeneracy is the root of all our evils and that consequently political improvement would advance our nation beyond the dream of an ordinary being. Such a state of things is mischievous enough. Outside the political agitation circle we obstinately remain indifferent, and some of us even ridicule the notion of other reforms with an air of authority. Of course this state can not continue for ever. When people will see that dispute the political improvement the nation is almost in the same predicament, they will reluctantly and with a sense of neglected duty take to other reforms. But we ardently ask our people to realize the above fact *just now* instead of long afterwards because we know that other reforms can go hand in hand with the political reform; nay, more, the success of other reforms depends on our own enlightenment whereas the success in political matters considerably rests on the enlightenment of other people far removed in manners and views. We hope we give no cause for misunderstanding. We by no means decry political activities. We have hailed them from the beginning, and we have admired with grateful feelings the uncommon disinterestedness of our political leaders. What we chiefly and mainly wish to bring to our reader's attention for serious consideration is that political reform alone will not and cannot remove all our evils, as can be well seen from the existence of immense poverty side by side with immense progress in England the mother land of political Reform. We wish our readers can vividly see that most of our national evils have practically to do nothing with our political rise, and that for the removal of these evils we should not wait for any party's decline. Frankline, an American statesman, observed: "The taxes are indeed very heavy; and if those laid on by the government were the only ones we had to pay, we might more easily discharge them: but we have many others, and much more grievous to some of us. We are taxed quite as much by our idleness, three times as much by our pride, and four times as much by our folly; and from these taxes the Commissioners cannot ease or deliver us by allowing an abatement." Lord John Russell once made a similar statement to a body of working men who waited upon him for the purpose of asking relief from taxation. "You complain of the taxes," he said; "but think of how you tax yourselves. You consume about fifty millions yearly in drink. Is there any Government that would dare to tax you to that extent? You have it in your power greatly to educe the taxes, and that without in any way appealing to us." With what force the above remarks of Franklin and Lord John Russell apply to our country and countrymen, we leave for our readers to judge and realize. Political improvement will effect something— this we hold and therefore we admire and appreciate the noble efforts of our political leaders; but certainly political reform will not effect everything, and therefore we insist that other reforms should be taken up with equal earnestness and persistence. As most of our miseries are voluntary and self imposed in consequence of vicious and pernicious habits and customs, for the removal of which we can depend on ourselves, we once more say that we should apply the principle of Reform to ourselves. Have we done so? Are we seeking after these reforms? The answer to such questions is sadly in the negative. We are of opinion that if our leaders would devote some of their energies *with a sense of duty* to remove some of the bad social customs, to improve the educational system, and to advance the industrial sphere of our country, their labours will bring blessings to the people.

## ANSWER TO CHARGES AGAINST THE FACULTIES OF LAW AND MEDICINE.

The probability that any particular person shall ever be qualified for the employment to which he is educated is very different in different employments. In the greater part of mechanic trades success is almost certain, but very uncertain in the liberal professions. Put your son an apprentice to a Buniathere, is little doubt of his learning how to make purchases and the sales. But send him to study the law, it is at least twenty to one if he ever makes such a proficiency as will enable him to live by the business. In a perfectly fair lottery all who gain the prizes all who gain must make up the loss of those who draw the blanks. In a profession where twenty fail for the one that succeeds, that one ought to gain all that is lost by the unsuccessful twenty. The Counsellor at law, who perhaps at near forty years of age, begins to make something by his profession, ought to receive the retribution, not only of his own so tedious and expensive education but of that of more than twenty others who are never likely to make anything by it. How extravagant soever then the fees of a counsellor at law may sometimes appear that real retribution is never equal to this. Compute in any particular plan what is likely to be annually gained and what is likely to be annually spent, by all the different workmen in any common trade such as that of weavers and you will find that the former sum will generally exceed the latter. Make the same computation with regard to the earnings of all the counsellors and students at law, in all the different law courts and you will find that their annual gains but a very small proportion to their annual expense, even though you rate the former as high and the latter as low as you can. The lottery of the law therefore is very far from being a perfectly fair lottery and that as well as many other liberal and honorable professions, in point of pecuniary gain is evidently under recompensed. These two professions keep their level, however, with other occupations and in spite of these discouragements all the most generous and eager spirits are eager to crowd into them only because two different causes contribute to recommend them. Had it not been for the desire of the reputation which attends upon superior excellence in any of them and for the natural confidence which any man has more or less in his own abilities and good fortune. To excel in any profession in which but few arrive at mediocrity is the most decisive mark of what is called genius or superior talents. The public admiration which attends upon such distinguished abilities always makes a part of their reward. It makes a considerable part of that reward in the profession of physic. In poetry and philosophy it makes almost the whole.

There are some very agreeable and beautiful talents of which the possession commands a certain sort of admiration but of which the exercise for the sake of gain is considered as a sort of prostitution. The pecuniary recompense, therefore of those who exercise them in this manner must be sufficient not only to pay for the time, labour, and expense of acquiring the talents but for the discredit which attends the employment of them as the means of subsistence. The exhorbitant rewards of a public Tanjore dancing girl &c are founded upon these principles.

To revert to the main thread— If the outcry against the exhorbitant charges of lawyers and phisicians were suffered to continue for a long time, we suffer the professions would afford no encouragement to men of talents and our lives and properties would be deprived of their stays when most needed. Of late complaints are made against a certain old phicisian the ornament of the society. It is most disheartning that people should freely give out their opinions without reflection. We would only ask people not to be guided by a reptile set of writers now trying to grow into importance by the settled principle of abusing men better than they can be themselves.

## वऱ्हाड

मि. मानिकशा साहेब येथील स्माल्कान कोर्टाचे काम पाहण्यास येणार व पंडित सुरनारायण येथील स्पेशल अ० क० च्या जागेचे काम मि. यासिनखान रजेवर आहेत तोपावेतो पाहणार.

हाअर व लोअर स्टँडर्डची परिक्षा संपली व आज पासून वकिलीची परिक्षा सुरु होणार.

मे महिन्या प्रमाणें या आठवड्यांत ही येथुन कांग्रेस मंडळी ३।४ दिवस बाळपुर तालुक्यांत फिरण्यास गेली होती एकंदर तालुक्यांतील काम आटोपलं आहे व पुढील रवीवारी बाळापूरास तालुक्याची सभा भरणार आहे व त्याकरिता येथून वरीष्ठ मंडळी जाणार आहे.

रा. राघो हणमंत यांस अंजनगांव सुरजी येथे स्पेशल माजिस्ट्रेट नेमून त्यांस थर्ड क्लास म्याजिस्ट्रेट अधिकार दिले.

रा. बंबुजी जनार्दन एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस फर्स्ट क्लास म्याजिस्ट्रेटचे व फर्स्टक्लास असिस्टंट कमिशनरचे (दिवाणी- ५००० रुपया पर्यंतचे) अधिकार दिले.

रा. विठूजी नारायण आक्टिंग तहशिलदार अकोले यांस थर्ड क्लास म्याजिस्ट्रेटचे व सेकंड क्लास तहशिलदारचे अधिकार दिले.

### नोटीस.

रा. रा. बाळाजी लक्ष्मण गुजराथी मुक्काम अकोले यांस

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते की, तुह्मी ज्या घरांत राहतां त्या घरावर माझी मालकी असून तें घर खाली करून देण्याबद्दल एक दोन वेळा सांगितलें असतां खाली करून देत नाहीं व तारिख २१ मार्च सन १८९० इ० पासून ता. ३१ आगष्ट सन १८९० इ० पर्यंत भाडें दर माहा २ रुपये प्रमाणें मागितलें असतां तेही तुह्मी देत नाहीं. सबब नोटिशानें कळवीत आहे कीं, नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आत घर खालीं करून द्यावें तसें न कराल तर घराचे भाडें दरमाहा ५ रुपये प्रमाणें व नोटिशीचा खर्च व कोर्टांत लागेल तो खर्च हा तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारिख ६ माहे सप्टेंबर सन १८९० इसवी.

सही

नारायण बजाजी दस्तुर खुद.

## वर्तमानसार

आस्ट्रेलिया बेटांत इल्लिनाय यंग नांवाचा १०१ वर्षांचा स्त्री आहे. हिला हद्दपार करण्याची शिक्षा मिळाली होती त्यास आज सुमारें ५० वर्षे झालीं.

गोवध प्रतिबंधक हुकूम—पंजाब सरकारनें सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध केलें आहे कीं, डेपुटी कमिशनर पासून लेखी परवानगी घेतल्या शिवाय, कोणी ही मनुष्यानें गोवध करतां कामा नये. गोमांस विक्रयाच्या अथवा गोवधाच्या ज्या ठरलेल्या जागा आहेत, तेथेंच तो प्रकार करण्याविषयीं परवानगी मिळेल. अन्य ठिकाणीं मिळणार नाहीं. परवानगी शिवाय जो हा धंदा करील, त्याला २०० रुपये दंड, अथवा ६ महिने कैद, अथवा दोन्ही शिक्षा होतील.

जपानांत एका वनस्पतीपासून रेशीम काढण्यास सुरुवात केली आहे. व हें वनस्पतीजन्य रेशीम क्रिमिजन्य रेशमाप्रमाणें चकचकीत व सखत असतें. व याचा परीक्षानुभतिकडच्या वनस्पति शास्त्रज्ञांनीं पूर्णपणें घेतला आहे.

म्याट्रिकुलेशनची परीक्षा सन १८७७ सालापासून ९ ठिकाणीं घेण्यांत येत होती, आता फक्त मुंबई, पुणें, अमदाबाद आणि कराची या ४ ठिकाणीं घेण्यांत येईल; बेळगांव येथें घेण्यांत येणार नाहीं.

खून मुंबईः-गेल्या आठवड्यांत येथें २ खून झाले. एक फाकलंन्ड रोड येथील एका भट्याचा व परेल येथें एका गुजराथी सुतारणीचा या उभय खुन्याच्या संबंधानें पोलिसचा तपास जारी आहे. सुतारणीचा खून झाला नसावा असें पंचा पुढें पडलेल्या साक्षी वरून दिसून येतें अकस्मातानें तो प्रकार झाला असावा असें आटतें. दी० बं०

धुलिपासिंगास राहण्याकरतां विलायतेतील एका समुद्रकिनाऱ्याच्या खेड्यांत जागा देण्यांत येणार असून त्यास कांहीं वेतनही करून देण्यांत येणार आहे अतां धुलिपसिंगाचें नांव बहुधा ऐकूं यावयाचें नाहीं!

लिव्हरपुर येथून बोस्टन येथें जाणारें एक अगबोट आग लागून जळून गेली आंतील सर्व मालाचा नाश झाला. मनुष्य हानी मात्र झाली नाहीं.

बाईच्या एका मुसलमानाच्या बायकांस एक मुलगा झाला. त्यांस दोन तोंडें होतीं. व तीं एकास एक चिकटलेलीं होतीं तें, मुलगा जन्मल्यावर एक प्रहर पर्यंत जिवंत होता.

पारिस प्रांतांत एका श्रीमंत बाईचें लग्न झालें त्यावेळीं तिनें आपल्या एका मैत्रिणीस आगगाडीचा डबा नजर पाठविला आहे या डब्यांत सर्व प्रकारच्या सोई केल्या आहेत पैसे ठेवण्यासाठीं सेफ बाक्सही आहे व नानातऱ्हेचे आरसेही आहेत.

फक्त पोत जडली ह्मणून लग्न केलें अशा रीतिचे विलायतेस फारच थोडे विवाह होतात. कित्येक पैशावर भुलतात, कित्येक किताबावर भुलतात व कित्येक मित्रत्वाच्या योगानें फशीं पडतात. त्या संबंधानें एक बाई ह्मणते कीं नवऱ्याबायकोंत शेवट पर्यंत प्रीत राहणें फार मुष्कीलचें आहे. ही बाई मुर्ख आहे वाटतें? आमच्या सुधारकांच्या आड येणारी ही कोण? एक पुती रडते व सात पुतींही रडते.

छाकटेपणा हा एक वेडेपणा आहे असें एका डाक्तरानें ठरविलें आहे. छाकटेपणासारखा दुसरा मोठा दुर्गुण नाहीं. बुद्धी व शक्ती याचा ह दुर्गुण इतका पक्का अंमल करतो प्रत्येक खेड्यांत किंवा गावांत याच्या मारखा दुसऱ्या कोणताही रोगाचा फैलाव नाहीं हा एकच दुर्गुण सर्वांस लागतो मग ती स्त्री असो, पुरुष असो अथवा पोर असो! दारू पिणें हा एक प्रकारचा वेडेपणा आहे. आणि दारूच्या धुंदीत तो मनुष्य ठिकाणावर नसतो. या व्यसनामुळें त्याची सदसद्विवेक बुद्धि हळू हळू नाहिशी होत जाते आणि एखादा रागीट मनुष्य तर दारूच्या भरांत वेळेस पाहिजे तो गुन्हा करू शकेल. जो नेहमी दारू पितो तो नेहमींच वेड्यासारखा असतो व त्याचा आपल्या मनावर मुळींच दाब नसतो म्हणून मधून पिणारास कांहीं थोडी अक्कल असण्याचा संभव आहे. अशा मनुष्यास त्याची धुंदी उतरल्यावर खूप मार द्यावा असें एका डाक्तरांचें मत आहे.

पुण्याच्या हिंदु क्रिकेट क्लबानें तेथील जिमखाना क्रिकेट क्लबावर जय मिळविला व यांच्या शौर्याबद्दल हिंदुक्लबास गव्हरनर साहेब समोर भेटविण्याकरितां नेलें होतें त्या वेळीं गव्हरनरांनीं त्यास शाबासकी दिली. हिंदुच्या क्लबानें वेडूं फकण्याचा मोठें कौशल्य दाखविलें असेंही ह्मणतात खेळांत सुद्धां हिंदूंचीं सरशी.

अक्कलकोटचे माजि. दिवाण रा. रा. विठ्ठल ठिकाजी यास काफर्ड प्रकरणांत बडतर्फी मिळाली असून त्यास संस्थानांतून १७३ रुपये पेन्शन मिळालें असें ह्मणतात हा न्याय कोठला? ज्या मामलेदारास बडतर्फी मिळाली होती त्यापैकीं सदरहू इसम नाहीं तर असें असता व सरकारांतून त्यास बडतर्फी मिळाली असतां संस्थानांतु पेन्शन मिळतें हें मोठें आश्चर्य आहे! अक्कलकोटची चैकशी करण्याकरितां ज्या वेळीं मि. लीबॉनर गेले होते त्या वेळीं त्यांस रा. विठ्ठल ठिकाजीनी योग्य मदत दिली नाहीं ह्मणूनच त्यास बडतर्फी मिळाली होती असें त्यावेळीं बाहेर आलें होतें व पुन्हा त्याच इसमास पेन्शन मिळतें तेव्हां हा काय प्रकार आहे तें बाहेर येणें जरूरीचें आहे कीं हलवावच्या घरावर ब्रह्मार्पण!!

विलायतेहून परत आलेले मद्रासचे मि. नॉर्टन यांस ता. २९ रोजी मद्रासच्या सभेनें मोठा मान दिला आहे; त्यावेळीं मि. नार्टन हे म्हणाले कीं मुर्ख कानसरवेटिव पक्षाला राष्ट्रीयसभेच्या मुखत्यारीं न देऊन मिळणें चांगलें नाहीं रॅडीकल पक्षाला मिळालें असतां कांहीं हित होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांतील इंग्रजी अमलदार अताबाइट रातीनें अमल गाजवितात आणि राष्ट्रीय सभेचे जे मुखत्यार विलायतेस गेले त्यांस एक दमडीही राष्ट्रीय फंडांतुन देण्यांत आली नाहीं यां इंग्रजांचे हे विचार आमच्या लोकाना ध्यानांत ठेवण्यासारखे आहे.

सोलापुरः—७ तालुक्यांत पाऊस. माळशीरस तालुक्यांत मुळींच नाहीं मेढें तालुक्यांत नेहमीं लागवडीस येणाऱ्या जमिनी पैकीं ४० हजार जमिनीची यंदा लागवड झाली नाहीं. चारा दुर्मीळ असून महाग सर्व तालुक्यांत पावसाची फार जरूर.

धारवाडः—हुबळी, बंकापूर, हनगल आणि करजगी या शिवाय सर्व ठिकाणीं पाऊस सर्व ठिकाणी पावसाची जरूरी. करजगी नवगुंद आणि रोण तालुक्यांत चारा महाग. बंकापूर तालुक्यांत गुराढोरांचा रोगांचा नाश.

कानडाः—पाऊस फारच थोड

हुसंगाबादेस डेप्युटी कमिशनरच्या आफिसांत नुकताच एक गमतीचा प्रकार घडला कोणी एक मनुष्य माजिस्ट्रेटसाहेब कज्जा चालवीत असता पटकन वर आला आणि त्यानें माजिस्ट्रेटाच्या हातांत पिंपळाच्या पानांत गुंडाळलेलें कांहीं माजिस्ट्रेटाच्या स्वाधीन केलें नंतर तें माजिस्ट्रेटानें उघडून पाहिलें तों त्यांत कोणी स्त्रीचें नाक कापलेलें दृष्टीस पडलें. त्यास विचारतां त्यानें सांगितलें कीं. मी आपल्या बायकोचें नाक कापलें आहे व तें आपल्या पुढें हजर केलें आहे. यानंतर या प्रकरणाचा काय निकाल झाला हें सांगावयास नकोच.

नार्थवेस्टर्न रेल्वे वरील कित्येक खात्यांत काटकसर केल्यामुळें कित्येक गोरे लोक भटक्या मारीत आहेत असें इंग्रजी पत्रें ह्मणतात या वरूनच हिंदुचीं काय स्थिती होते याचा विचार करा. ठा० अ०

कांगो संस्थानांतील पुष्कळ शिद्दीलोक नरमांस भक्षक आहेत. ते ते यास मिरपूड व मीठ यांच्याशीं खातात.

सर्व स्त्रियानीं असें नेहमीं ध्यानांत ठेवावें कीं साधारणपणें काम धंदा करणाऱ्या पतीला घरीं दुर्मुखलेली बायको असणें हें जितकें दुःखदायक आहे तितकें दुसरें कांहीं सुद्धां नाहीं आनंदी असण्यांत आपलें कांहीं खर्च होत नाहीं व त्यापासून आपला पुष्कळ फायदा मात्र होतो.

यंदा नव्हनर जनरल सहित आपल्या प्रवासांत एतद्देशीय संस्थानिकांचीं सैन्यें पाहणार आहत ही एक नवीन टूम आहे.

पॉर्नेल कमिशनमध्यें लंडन टाइम्सला एकंदर १,९०,००० पौंड खर्च आला

कानपुरास गंगेचें पाणी पुष्कळ वाढलें आहे. सु० प०

जन्मठेपेपेक्षां कमी मुदतीची काळेपाण्याची शिक्षा झालेल्या लोकाना तूर्त तिकडे पाठऊं नये. डिस्ट्रिक्ट तुरूंगांतच ठेवावे असा हुकूम आल्याचें समजतें.

लार्ड रे साहेबाचा एक पुतळा तीस हजार रुपये खर्च करून तयार करवावा असें मुंबई या रे स्मारकाच्या कमेटीनें ठरविलें आहे.

ओर्कि स्था यांत इंग्रजी ९ वी व मराठी ६ वी इयत्ता पास झालेल्या लोकांस उमेदवारींत घेऊं नयेत असें ठरल्याचें ऐकतों.

तुर्कस्थानच्या सुलतानाच्या २४ मुख्य बायका आहेत, या शिवाय २९० नायकांचा जनानखाना आहे तो निराळाच.

पंजाब इलाख्यांत फिरोजपूर प्रांतात टोळानीं फार नाश केल्याचें समजतें

नग्रा येथें पटकीचा आजार उद्भवला आहे.

पार्लमेंटचे मेंबर मि. एस. की पुढल्या महि यात हिंदुस्थानात येणार आहेत.

आस्ट्रियामध्यें एक ढोंगी मांत्रिकानें ज्यू लोकांच्या स्मशानांतून थडगी फोडून नवीनच पुरलेली दोन लहान मुलांचीं प्रेतें, रसायन सिद्धीसाठीं पळवून नेल्याबद्दल पांच महिन्याची कैद झाली. नकुल

आपल्या हिंदुस्थानांत अफू, गांजा. भांग माजू वगैरे अमली पदार्थ विकण्याचीं दुकानें २०४२४ आहेत यांची वांटणी खालीं दिल्या प्रमाणें :-- मुंबईइलाखा १२९१ मद्रास इलाखा ११७२ बंगालइलाखा ९६२१ नार्थवेस्ट प्राव्हिन्सेस आणि औद ४२६२ पंजाब २९९६ ब्रम्हा ३० सेंटल प्राव्हिन्सस २४१६ असाम १३३८ बरार ६०४. पु. वै.

चालू सालांत हिंदुस्थानच्या लष्करा करितां ३०,००० रायफल बंदुका नव्या पुरविण्यांत येतील

ता. १ आगष्ट १८९२ रोजीं लंडन शहरी जी सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा होईल त्याच्या अगोदर येणाऱ्या १ एप्रीलला म्हणजे १ एप्रिल १८९२ ला एकवीस वर्षांवर आणि तेवीस वर्षांचे आंत उमेदवारांचें वय पाहिजे. अभ्यासांत जो फेरफार केला आहे त्याचा ही यादी प्रसिद्ध झाली आहे त्या वरून अभ्यास ज्यास्त वाढविले आहेत व ही परीक्षा पूर्वी पेक्षां अधिक कठिण होईल असें दिसतें

वर्तमानपत्र वाचणाऱ्या प्रत्येकानें असें समजावें कीं हें पत्र सर्वांस आवडण्यासाठीं आहे. आपणास आवडेल असेंच नेहमीं यांत असेल असें नाहीं. सु. प.

√ हिंदुस्थान सरकारच्या मनांत मुलीच्या मताप्रमाणें निवाडे करण्याची पद्धत बंद करावयाची आहे असें बाहेर आलें आहे. कारण मुलीचा कल नेहमीं अपराध्यांस सोडून देण्याचा असतो. इंग्लंडांत ही पद्धत सोईची की वाटावी व ती येथें अशीं तिच्याची कशी भासतें हा मोठा महत्वाचा विषय होणार आहे

अमेरिकेंत एका आगगाडीवर एक चोरांची टोळी चढून त्यांनीं ती लुटली. आगगाडी चालू व्हावयाच्या वेळीं ते स्टेशनच्या फलाट मैच्या दुसऱ्या बाजूनें डब्यांच्या कड्या धरून चढून राहिले होते व गाडी चालू होतांच डब्यांतून शिरून उतारूंस लुटून पुढील स्टेशना जवळ गाडी जावयाच्या पूर्वी ब्रेकवरील मनुष्याला मारून ब्रेक दाबून गाडीचा वेग कमी केल्यावर उड्या टाकून रानात निघून गेले. शिकस्त आहे अमेरिकेंतील चोरांची सुद्धां!

## अकोले बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | १००।≡ |
| ” १९ दिवसाच्या मुदतीची | | १००= |
| सुवर्ण.... २० | रुपे | १०८ |
| आळशी खंडीस ८४ | उडीद | ९१ |
| गहू काटे ६० | बाशी | ६७॥ |
| जवारी नवी ४४ | चणे | ६५ |
| सर्की ४ | माठ | ४≡ |
| तूप ९।= | तेल | ४॥।= |

सट्याचे भाव.

| | | |
|---|---|---|
| जवारी बसंत संवत | १९४७ | ४४ |
| गहू वैशाखशुद्ध | १९४७ | ९८ |
| आळशी चैत्रशुद्ध | १९४७ | ७८॥। |
| रुई फाल्गुन शु. | १९४७ | ५६॥= |
| सर्की वै. नव साळाची | १९४७ | ४ |

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# K. B. Rele & Co.'s most efficacious long-tried Remedies

## के. बी. रेळे कंपनीचीं जगप्रसिद्ध, अनुभवशीर औषधें.

जरूर वाचा. **अगत्याची सूचना.** लक्षपूर्वक वाचा.

आह्मीं आमचीं खालील औषधें करण्यांत उत्तम विद्वानांची मदत घेतली आहे, व चांगल्या चांगल्या नवीन व जुन्या ग्रंथांच्या आधारें तीं सर्व औषधें तयार केलीं आहेत, व त्यांत जीं जीं औषधें वा आहेत तीं फार नवीं, ताजीं, व महाग अशीं असल्यामुळें खालीं लिहिलेल्या सर्व रोगांवर लिहिल्याप्रमाणें गुण येतो असें आमच्या अनुभवास आजपर्यंत आलें आहे, व त्या औषधांच्या गुणांविषयीं आज पुष्कळ द आह्मांस मिळाले आहेत, त्यांपैकीं स्थलसंकोचामुळें फार थोडे दाखले खालीं दिले आहेत ते कृपा करून वाचावे, व डॉक्टरगिरीच्या कामांत अत्यंत उच्च पदवी धारण करणारे नामांकित डॉक्टरांचीं आमच्या औषधांविषयीं मतें आहेत तीं वाचावीं. परम्याचें, चप्याचें, व धुपणीचें औषधांविषयीं, आणखी पुष्कळ दाखले आह्मांजवळ आहेत, ते येथें दिले नाहींत, कारण ते येथें देण्यास आह्मांस प्रशस्त वाटलें नाहीं. वैद्य विद्वान असला व औषध कितीही चांगलें असलें तरी त्या वैद्याचे सर्व रोगी बरे होत नाहींत व तें औषध सर्वांस सारखें लागू पडत नाहीं ह्याचा अनुभव आपणा सर्वांस आहे. असें असतें तर आजपर्यंत मोठेमोठे काळाच्या सपाट्यांत सांपडले नसते. आमचीं औषधें सर्व रोग्यांस लागू पडतील व शंभरांत शंभर रोगी बरे होतील असें आमचें ह्मणणें मुळींच नाहीं. आह्मांस आजपर्यंतच्या अनुभवानें आशा आहे कीं शंभरांत पंच्याहत्तरांस गुण यावा. ज्या कोणांस आमच्या औषधांच्या गुणांविषयीं खात्री करून घेणें असेल त्यांनीं, ज्यांनीं आमचीं औषधें घेतलीं असतील त्यांस विचारलें असतां खात्री होईल. ज्यांची खात्री झाली आहे आह्मांस दाखले दिले आहेत त्यांपैकीं कांहीं दाखले आह्मीं खालीं दिले आहेत, ते कृपाकरून वाचावे. आह्मीं आमचीं औषधें व त्यांच्या बनावटीचे फॉरम्युले महान विद्वान डॉक्टरांस दाखविले व त्यां त्यांनीं दिलेलीं मतें खालीं सादर केलीं आहेत. पुणें येथील प्रदर्शन औषधांच्या गुणावगुणांविषयीं सर्टिफिकीटें देतें किंवा नाहीं, हें आह्मांस ठाऊक नसल्यामुळें तेथें आह्मीं आमचीं औषधें पाठविलीं नाहींत. व औषधांचें काम करणारे वैद्य ह्यांस मेहरबानी करून जर आमच्या औषधांचे गुणावगुणांविषयीं पाहणें असेल तर त्यांनीं आह्मांस लिहिलें असतां प्रत्येक औषधांची एक बाटली आह्मी त्यांस फुकट पाठवून पोष्टखर्च मात्र त्यांस द्यावा लागेल. औषधांचा गुण ज्यांनीं घेतला आहे त्यांची साक्ष तीच कायती खरी खात्री. आणि प्रत्यक्ष तोंडोतोंडी साक्ष घेतली असतां खरें काय तें समजून येईल. आमचीं औषधें गां खपत असल्यामुळें प्रत्येक गांवांत तोंडोतोंड साक्ष देणारा एक तरी मनुष्य मिळेल. ह्याचें नांव खरी खात्री. अधिक खात्री ती काय पाहिजे. आमचीं औषधें ज्यांस घेणें असतील त्यांनीं तीं आमच्या नांवाचीं व चींच आहेत ह्याची नीट चौकशी करून घ्यावी. **ज्यांस ह्या औषधांपासून गुण येतील त्यांनीं कृपा करून औषधांच्या गुणाविषयीं दाखले पाठवावे.**

**औषधें फुकट देण्यांत येतील.** दर आदितवारीं सकाळीं ७ वाजल्यापासून ९ वाजेपर्यंत खालीं लिहिल्यापैकीं एका वेळीं एक औषध आमच्या दुकानांत कोणी मागण्यास आले असतां त्यांस फुकट दे येईल. तीं औषधें येणेंप्रमाणें:—खोकल्याचें, तापाचें, अजीर्ण अतिसाराचें, गजकर्णाचें, आणि जखमेचें मलम. येणारानें कृपा करून आपल्याबरोबर औषध घेण्याकरितां बाटली आणावी.

---

### वीर्यवर्धक, बलवर्धक, धातुपौष्टिक, व वीर्यस्तंभक गोळ्या.

वीर्याची वृद्धि होण्यास शरीरशास्त्राच्या योगानें शरीरांत काय काय फेरफार झाले पाहिजेत ह्यांकडे पूर्ण लक्ष देऊन औषधाची योग्य योजना केली पाहिजे. आह्मीं (फिजीऑलॉजिकल् ॲक्शन्स्) गुण ज्या ज्या औषधांमध्यें आहेत तीं तीं औषधें वापरलीं आहेत, व त्यांचे फॉरम्युले अत्यंत विद्वान व उंच पदवी धारण करणारे डॉक्टरांस दाखविले आहेत, व त्यांचे ( Certificates ) दाखले खालीं दिले आहेत. अलिकडे ह्या रोगांवर पुष्कळ ओषधें पहाण्यांत येतात व त्या औषधांनीं कसे काय गुण येतात हें घेणारांसच माहित असतील. आह्मीं आमच्या गोळ्यांत अलिकडे नवीन डामिआना ( Damiana ) हें एक औषध अधिक घातलें आहे, त्यामुळें शब्दशः जसा गुण यावा तसा येतो, आणि ह्याबद्दल आह्मांस पुष्कळ मनुष्यांकडून पुष्कळ दाखले आले आहेत. त्यांतून कांहीं खालीं दिले आहेत.

ह्या गोळ्या घेतल्याच्या योगानें रक्त चांगलें चालतें व वाढतें व धातु पातळ झाली असेल व स्वप्नावस्थेंत अथवा लघवीबरोबर जात असेल ती घट्ट होऊन जाण्याची बंद होते. ह्यानें पुरुषत्व नष्ट झालेलें पुनः येतें व बलात्कारें धातुपात केल्यानें आलेली शिथिलता व मुखावर व शरीरावर आलेला फिकेपणा जाऊन मनुष्य सदृढ होतो. ह्यानें मज्जा-तंतूंस व स्नायूंस बळकटी येऊन स्मरणशक्ति वाढते, ह्यानें स्त्रियांचा वांझपणा व निर्बलता दूर होते, व मनुष्य सदृढ होतो. ह्या गोळ्यांनीं हजारों मनुष्यांस अनुभव आला आहे, व त्यांचे दाखले आमच्याजवळ आहेत. ह्या अगदीं खात्रीलायक व भरंवशाच्या गोळ्या आहेत. अतिशयोक्तीनें आह्मीं कांहीं लिहिलें नाहीं, हें अनुभवांतीं समजून येईल. ४८ गोळ्यांच्या बाटलीस **किंमत एक रुपया.** एका बाटलीपासून ३ बाटल्यांपर्यंत वं ख. **सहा आणे.**

### पूं परम्यावर अतिवस्ताद ४८ तासांत गुण येणारें औषध.

अलिकडे परम्यावर पुष्कळ औषधें निघालीं आहेत. व त्यांपैकीं कोणतें औषध घ्यावें ह्याचा घेणारास मोठा विचार पडतो. आमचें औषध पुष्कळ वर्षें अनुभव घेऊन इतकें गुणी आणि चांगलें केलें आहे कीं घेणारांस १००रां पैकीं ९९ वांस गुण येतो असा आह्मांस अनुभव आला आहे. ह्या औषधांत पारा वगैरे अपायकारक पदार्थ नसल्या-मुळें हें अत्यंत निर्धोक आहे. हें औषध एकदां किंवा दोनदां घेतल्यानें लघवीची तिडीक, जळजळ, लघवी थेंबथेंब होणें बंद होऊन परमा व धातु जाणें त्वरित बंद होते. हें घेण्यास फार चांगलें आहे. ह्यानें सर्व जातींचे नवे व जुने परमे बरे होतात. आजपर्यंत आह्मीं हजारों बाटल्या विकल्या व त्यांनीं हजारों नवे व जुने परमे बरे झाले, आणि त्यांचे दाखले आमच्या जवळ आहेत. हें औषध फारच खात्रीचें आहे. एक बाटलीनेंच नवा परमा बरा होतो. जुना व हट्टी परमा असल्यास एक दोन बाटल्या घेऊन पिचकारीचें औषध मारावें लागतें. **किंमत एक रुपया.** ब. ख. **सहा आणे.**

### पूं परम्यावर २४ तासांत हटकून गुण येणारें पिचकारीचें औषध.

ह्या औषधाच्या एक दोन पिचकाऱ्या मारल्या असतां नवा परमा त्वरित बरा होतो, व जुना असल्यास ह्याच्याबरोबर पिण्याच्याही औषधाचा उपयोग केल्यानें जुना व हट्टी प[illegible]मा नाहींसा होतो. परम्यांत रक्त पडतें

### धुपणीचें पिण्याचें औषध.

ह्या औषधानें शेंकडों स्त्रिया बऱ्या झाल्याचा अनुभव आह्मांस आला आहे. ह्यानें पांढरी, तांबडी, पिंवळी व आंड्याच्या गाऱ्यासारखी जाड व चिकट धुपणी व स्राव हीं सर्व बंद होऊन लघवी पाण्या-सारखी स्वच्छ होते, व हा हट्टी रोग बरा होऊन भूक लागते, तोंडास रुचि येते, अन्न पचतें, ह्यानें कंबर दुखते ती बंद होते, आंगांत शक्ति येते, रक्त वाढतें, रोगानें आलेली जरा दूर होते. धुपणी हट्टी व फार दिवसांची असल्यास ह्याच रोगावर आमच्या पिचकारीच्या औषधाचा ह्या औषधाबरोबर उपयोग केला असतां त्वरित गुण येतो. **किंमत एक रुपया.** बं. ख. **सहा आणे.**

### धुपणीवर पिचकारीचें खात्रीपूर्वक गुण येणारें औषध.

ह्याचा धुपणीवर प्यावयाच्या औषधाबरोबर उपयोग केल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं असें क्वचितच. ह्यानें सर्व प्रकारची आणि कोण-त्याही जातीची नवी आणि कितीही जुनी हट्टी धुपणी व स्राव हटकून बरा होतो. **किंमत आठ आणे.** वं. ख. **सहा आणे.**

### सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या जखमा, चट्टे, चांदी इत्यादि माठविणारें मलम.

चट्टे, चांदी, अचूक बरीं करण्याकरितां आह्मीं पुष्कळ वर्षें अनुभव घेऊन दोन जातींचीं दोन मलमें तयार केलीं आहेत. ह्या दोन्ही जातीच्या मलमाच्या डब्या एकीकडे एकाच बाक्सांत करून आह्मीं विकतों. एक जातीचें मलम कांहीं दिवस लावून गुण न आला तर दुसऱ्या जातीचें मलम लावावें. असें केल्यानें हजारों भयंकर चप्यानें पीडित लोक बरे झाले आहेत असा आह्मांस अनुभव आला आहे. हें फार भरंवशाचें औषध आहे कारण ह्या दोन औषधांशिवाय ह्या रोगावर दुसरें चांगलें औषध क्वचितच असेल असें आह्मांस वाटतें. ह्या दोन्ही डब्यांच्या बाक्साची **किंमत आठ आणे.** दोन बाक्सांपर्यंत बं. ख. **सहा आणे.**

### ५० वर्षें अनुभव घेतलेलें खोकल्यावर अचूक औषध.

हें औषध घेतल्यावर कफ सुटा पडतो. पडसें, दमा, खोकला, क्षयाचा खोकला, डांग्या खोकला, घशांत गुदगुली होऊन येणारा खोकला, वगैरे हीं सर्व अचूक बरीं होतात. हें स्वादिष्ट असून फार गुणकारी आहे. ह्यापासून पुष्कळ लोकांस गुण येऊन नवे, हट्टी, जुने व आशा सोडलेले खोकले बरे झाले आहेत. फुफ्फुससंबंधीं सर्व रोगांवर हें औषध फार उत्तम आहे. ह्यानें गळ्याची व छातीची आग, दाह, व जळजळ होणें बंद होते. **किंमत बारा आणे.** बं. ख. **सहा आणे.**

### हिंवतापावर रामबाण औषध.

आमच्या तापाच्या औषधांत आरसनीकसारखा विषारी पदार्थ मुळींच नसल्यामुळें हें अगदीं निर्धोक आहे. ह्यानें बहुतकरून बारा तासांतच हिंव-ताप नाहींसा होतो असें आमच्या अनुभवास आलें आहे. ह्या औषधानें व आमच्या घाम आणणाऱ्या औषधानें परवां आलेल्या तापाच्या (Influenza) सातींत मुंबईतील व इतर गांवांतील हजारों मनुष्यांस गुण आला आहे. व ज्यांस गुण आला आहे तीं मनुष्यें आमचीं तापाचीं औषधें वारंवार मागवितात. हें औषध **जंगल** किंवा **म्यालिरिअल** नांवाचा ताप, हिंव-ताप, चोरताप, बाळंतपणाचा ताप, चातुर्थीकताप, पाळीचा ताप, व अंतर-ताप ह्या सर्वांवर केवळ अमृततुल्य आहे. कधीं कधीं हें औषध एकदांच घेऊन आमच्या गिऱ्हाईकांस गुण आला असें आमच्या अनुभवास आलें आहे. ह्या औषधानें कोठा साफ होऊन भूक लागते, तोंडास रुचि

तापांत आमच्या एका बाटलीनें पांचसहा असामींचा ताप गेला असें अ अनुभवास आलें आहे. **किंमत बारा आणे.** बं. ख. **सहा**

### अजीर्ण, अतिसार, संग्रहणी, अग्निमांद्य ह्यांवर अगदीं खात्रीचें औषध.

हें औषध घेतल्यानें पोट दुखणें, पोटांत गडगडणें, झाड्यास होणें, आंव पडणें, रक्त पडणें, उमास येणें, भूक न लागणें, वायूनें पोट लघवीला साफ न होणें, पोटांत पेटके येणें, हातपाय कृश होणें, ढेंकर येणें, हीं सर्व बरीं होऊन भूक लागते, परसाकडेला सुवे व पोटांतील वायु तुटतो, खाल्लेलें अन्न पचतें व मनुष्य सदृढ होत **किंमत बारा आणे.** बं. ख. **सहा आणे.**

### सर्टिफिकिटा.

ह्या औषधांच्या गुणांविषयीं ज्या अनेक सर्टिफिकिटा मिळाल्या आहेत कांहीं विद्वान् व नामांकित डाक्टरांच्या व इतरांच्या सर्टिफिकिटांचा सारां दिला आहे:—

१.—डाक्टर वि॰ वि॰ गोखले, एम्. ए., एम्. डी., मुंबई युनिव्हरसिटी यांचें सर्टिफिकेट ( इंग्रजीचें भाषांतर ):—

"**के॰ बी॰ रेळे** यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पा (वरील) नऊ औषधें मीं लक्षपूर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणका निर्धोक आहेत.

(सही) **डाक्टर वि॰ वि॰ गोखले,** एम्. ए., एम्

२.—डाक्टर मोरेश्वर गोपाळ देशमुख, बि. ए., बि. एस् सी., एम् मुंबई युनिव्हरसिटीचे फेलो, जस्टिस ऑफ धी पीस, व मुंबई सरकारचे अ केमिकल अनालायझर, यांचें सर्टिफिकेट ( इंग्रजीचें भाषांतर ):—

"मिस्तर **के॰ बी॰ रेळे** ह्यांनीं हल्लीं जीं आपलीं वर लिहिलेलीं नऊ विक्रीकरितां प्रसिद्ध केलीं आहेत त्यांचे **फॉरम्युले** कृपा करून त्यांनीं म विले. ज्या फॉरम्युल्याप्रमाणें हीं औषधें ते बनावितात ते फॉरम्युले चांगल्या डाक्टरांच्या वापरण्यांत येत असतात. मि॰ रेळे हे आपल्या औषधांत शुद्ध उपयोग करितात. अशा रीतीनें बनावलेलीं औषधें बहुधा गुणकारी झाल जेत असें मला वाटतें. मि॰ रेळे यांचे **कॉड लिव्हर ऑईलचें इम** बाजारांत जीं इमलशनें मिळतात त्यांसारिखें उपयोगी असून चांगलें आहे **अर्धोअर्ध स्वच्छ कॉड लिव्हर ऑईल** आहे व हायपोफॉस्फे लाईम, सोडा व पोट्याश हीं द्रव्यें आहेत.

(सही) **डाक्टर मो॰ गो॰ देशमुख,** एम्

३.—डाक्टर के. आर. विकाजी, एल्. एम्. (मुंबई), एम्. डी. ( मुंबई युनिव्हरसिटीचे फेलो, मुंबई सरकारचे माजी असिस्टन्ट केमिकल अना यांचें सर्टिफिकेट ( इंग्रजीचें भाषांतर ):—

"हल्लीं सर्व रोगांवर तयार केलेलीं रामबाण औषधें आणि जरीबुट्टे प्राबल्य फार वाढलें आहे. ह्या औषधांवर भोळे लोक विश्वास ठेवून औष आश्रय देतात, व आपले पैसे व्यर्थ घालवितात. व कधीं कधीं त्या औष त्यांच्या जिवांस अपकारही होतात. अशा प्रकारच्या वाढत चाललेल्या खंडण, ज्या औषधांत कांहीं गुप्त नसून ज्यांचे गुण सर्वांस माहीत आ प्रकारचीं औषधें बाजारांत आणून केलें पाहिजे.

"**औषधें करण्याच्या ह्या कामांत तुमचा प्रामाणिक उद्योग आहे, व अशा कामास सर्वस्वी आश्रय व उत्तेजन देणें आहे.** तुमच्या लोकप्रिय औषधांचे व त्यांच्या बनावटीचे फॉरम्युले मला दाखविले ते मीं पाहिले. लोकांस सध्यां स्वस्त औषधांची गरज अ **तुमच्या औषधांनीं** दूर होईल. ह्या विद्यासूत्रानुसारी औषधक्रिया क शतकामध्यें सर्व जरीबुट्ट्या व रामबाण आणि **गुप्त औषधांचा मोड** त्यांच्या जागीं सर्वमान्य ज्यांचे गुण आहेत अशा औषधांचा उपयोग व्ह माझें मत आहे.

(सही) **डाक्टर के॰ आर॰ विकाजी,** एम्.

४-५—के. बी. रेळे आणि कंपनी यांस लिहावयास आह्मांस आनंद वा तुह्मीं आमच्या जवळ तुमच्या औषधांपैकीं कांहीं औषधें तपासण्याकरितां प होतीं तीं आह्मीं तपासून पाहिलीं व आमच्याकडे येणाऱ्या कांहीं रोग्यांस पाहिलीं तेव्हां आह्मांस असें कळून आलें कीं तीं औषधें फार गुणी आहेत

## कॉड लिव्हर ऑईलचें अत्यंत गुणकारी व रुचिकर इमलशन (दूध.)

लशन घेण्याचा मुख्य हेतु कॉड लिव्हर ऑईल घेण्याचा असतो. तर शनमध्यें किती कॉड लिव्हर ऑईल आहे हें घेणारानें जरूर पहावें, कारण अर्ध कॉड लिव्हर ऑईल शास्त्ररीत्या मिळविणें फार कठीण आहे. या इमलशनमध्यें **अर्धोअर्ध कॉड लिव्हर ऑईल** आहे अशी आह्मी देतों व हें चौकशीअंतीं कळूनही येईल.

ील **इमलशन** वापरल्यानें क्षय, हट्टी जुनाट खोकला, पांडुरोग, त्वचेचे रोग, ता, वाईट झालेलें रक्त, हीं सर्व दूर होऊन शरीर निःसंशय पुष्ट होतें. मुलांच्या ायांत लुलेपणा असतो त्यावर हें फारच गुणकारी आहे. **कॉड लिव्हर** ल यास जो शिसारी बसण्यासारिखा वास येतो तो ह्यांत अगदीं नसून हें त फार स्वादिष्ट झालें आहे. मुलांस व स्त्रियांस यापासून मुळींच शिसारी येत हें पाण्याबरोबर एकजीव मिळून जातें. क्षयादि रोग बरे करण्यावर जगमान्य **पोफॉसफेट ऑफ लाईम, सोडा व पोटयाश** ह्यांसीं शास्त्ररीत्या **लिव्हर ऑईल** मिळवून एकजीव केलें आहे. हें **इमलशन** घेतल्यानें निश्चयात्मक पुष्ट होतो, छाती रुंद होते, मुखावर लाली व तेजी येते, आणि सर्व वरित नाहींसे होतात. नाजूक व कृश मुलें व स्त्रिया व मनुष्यें यांस हें फारच आहे. हें **इमलशन** वापरण्यापूर्वी वापरणारानें आपलें वजन करावें आणि ...ा तें घेतल्यावर पुन्हा वजन करून पहावें, ह्मणजे त्याचें वजन पूर्वीपेक्षां आहे असें दिसून येईल. **कॉड लिव्हर ऑईल** जर जिरलें तर रक्त व वाढवितें. तें जिरावें व रुचिकर लागावें व त्यापासून वर लिहिलेले गुण यावे ह्मणून आम्हीं त्यांत वरील जगमान्य औषधें घालून त्यांचें **इमलशन** आहे. तें दुधासारखें रुचिकर आहे. एक बाटली सोळा दिवस पुरते. औंसांचे बाटलीस **किंमत एक रुपया.** बं. ख. **चौदा आणे.** पुढील बाटलीस बं. ख. **चार आणे.**

### आयओडाइज्ड सार्सापरिला.

सार्सापरिला आह्मीं बरेच दिवस अनेक रोग्यांस देऊन त्याचा पूर्ण अनुभव आहे. हा वापरल्यापासून उपदंशजन्य विकार व त्यापासून होणारे तादि भयंकर रोग, गरमीपासून शरीरावर होणारे वाईट परिणाम, ह्मणजे वर चट्टे पडणें, तोंडास–ताळूस–भोंकें पडणें, व घशांत व्रण पडणें, सर्वांगाचे सांधे हातांपायांस कळा लागणें, संधिवात, गंडमाळा, हातांपायांची व मस्त- आग होणें, सर्वांगास कंड सुटणें, अंगावर गळवें येणें, खरूज, नायटे, गजकर्ण, गावर फोड येणें, हातापायांस काळे डाग पडणें, सूज येणें, व कळा लागणें, हटकून बरे होतात. परम्याचा विकार फार दिवस असल्यामुळें व कित्येक कारणांनीं कंबर दुखते ती ह्यानें फारच लवकर बरी होते. रसायनें व पारा सेवन केल्यानें होणारे फार वाईट रोग, जसें सांधे दुखणें इ० बरे होतात. न्य **सार्सापरिला व पोट्याश आयओडाईन** ह्यांचे गुण जितके तितके थोडेच. उपदंश अथवा गरमीनें पिडलेले अथवा ज्यांचें रक्त गर- ाजारानें खराब झालें असेल त्यांचें रक्त निःसंशय स्वच्छ होऊन त्याची ाते आणि मनुष्य सदृढ होतो. ह्यांत पारा मुळींच नाहीं. एक बाटली वस पुरते. **किंमत एक रुपया. बं. ख. सहा आणे.**

### दंतमंजन.

ल दंतमंजनाचा उपयोग केल्यापासून दांत स्वच्छ होतात इतकेंच नाहीं परंतु लागलेली कीड, दांतांतून व दाढेंतून रक्त वाहणें, दांत झडणें, हलके होणें, बरीं होऊन तोंडास येणारी दुर्गंधीही नाहींसी होते. हें थोड्या किंमतीचें किती मौल्यवान आहे हें अनुभवावरून कळेल. **किंमत चार आणे. सहा आणे.**

### हैपोफॉसफेट ऑफ लाईमचें कांपौंड सीरप.

औषध क्षयरोगावर फार उपयोगी आहे. हें औषध कांहीं दिवस घेतल्यानें ढतें, खोकला कमी होतो, व मनुष्य निरोगी होऊन सदृढ होतो. जगमान्य पायरोफॉसफीट, सोडीअम हैपोफॉसफीट, क्विनीन हैपोफॉसफीट, स्ट्रिक्नाईन सफीट, म्यांगनीझ हैपोफॉसफाट, हीं द्रव्यें ह्या औषधांत असल्यामुळें हें क्षयरोगावर अमृततुल्य झालें आहे. ह्या वरील सर्व औषधांचा एकीकडे झाल्यामुळें हें औषध हाडांस, स्नायूंस, मज्जातंतूंस बळकटी देण्यास कधींच टत नाहीं. हें औषध घेतल्यापासून कफ दिवसानुदिवस कमी होत जातो; वनशक्ति वाढते; आंगांत रक्त येतें; खोकला, दमा, जीर्णज्वर, संग्रहणी, ता, हीं सर्व नाहींशी होऊन मनुष्य सदृढ होतो. हें अगदीं निर्धोक असून गुणकारी आहे. ह्या औषधांत काय काय पदार्थ आहेत तें इंग्रजी फॉर- त बाटलीवर दिले आहेत. **किंमत एक रुपया. बं. ख. चौदा आणे.** प्रत्येक बाटलीस बं. ख. **चार आणे.** एक बाटली सुमारें एक महिना पुरते.

### नायटे, गजकर्ण, इसब, ह्यांवर खात्रीचें मलम.

लम एक दोनच दिवस लावल्यानें वरील हट्टी रोग बरे होतात. हें मलम रोगांवर फार उत्तम असून फारच खात्रीचें आणि स्वस्त आहे. ह्या ्या एका डबीनें मनुष्य रोगमुक्त होतो. हें मलम बिनधोक असून फार आहे. ह्या मलमानें आग होत नाहीं, व कातडी नरम होऊन स्वच्छ ह्या मलमानें हजारों मनुष्यांस गुण आला आहे. **किंमत तीन आणे.** एका डबीपासून चार डब्यांपर्यंत **सहा आणे.**

### वाऱ्याचें आणि संधिवाताचें तेल.

तेलाच्या मर्दनानें हातापायांच्या सांध्यांची सूज, त्यांचें दुखणें अथवा हाता- कळा येणें, छाती फुटणें अथवा दुखणें, शरीरांतून सणका येणें, हीं सर्व त्वरित ऊन मनुष्य हुशार होतो. **किंमत चार आणे.** बं. ख. एका बाटलीपासून टल्यांपर्यंत **सहा आणे.**

### जगमान्य हायपोफॉसफेट ऑफ लाईमचें सरबत.

सरबत आम्हीं एका प्रख्यात इंग्रजी फॉरम्युल्याच्या आधारानें तयार ाहे. हें सरबत खोकल्यावर, क्षयावर आणि अशक्त प्रकृतीवर फारच उपयुक्त ह्या सरबताच्या योगानें फुप्फुसादि आणि छातीसंबंधी इतर रोग बरे होऊन सदृढ होतो. हायपोफॉसफेट ऑफ लाईमचे गुण सर्व लोकांस माहीत अस- विशेष लिहिण्याची येथें जरूरी नाहीं. जगप्रख्यात वैद्यांनीं हें क्षयावर मानलें आहे. हें सरबत घेतल्यानें क्षयादी रोग बरे होऊन मनुष्य सदृढ होतो. मुलांस हें फार उपयोगी आहे. **किंमत बारा आणे. बं. ख. चौदा आणे.** प्रत्येक बाटलीस बं. ख. **चार आणे.** एक बाटली सुमारें एक महिना पुरते.

### शौच्यास साफ होणाऱ्या गोळ्या.

गोळ्या फारच निर्धोक आहेत. ह्याच्या योगानें अन्न चांगलें पचतें, भूक पोट फुगत नाहीं, वाईट ढेंकर येत नाहींत, शौच्यास साफ होतें, असें झालें प्रकृती दुरुस्त राहते व सदृढ होते. ह्या गोळ्या ज्या पदार्थांच्या केल्या ते पदार्थ बाटलीवर दिले आहेत, ते पहावे. ह्या गोळ्या मुख्यत्वेंकरून दररोज साफ होण्याकरितां केल्या आहेत. २० गोळ्यांच्या बाटलीस **पांच आणे.** बं. ख. एका बाटलीपासून तीन बाटल्यांपर्यंत **सहा आणे.**

### क्लोरोडाईन. (Chlorodyne, Ph. Ph.)

(*Formulæ.*)

| | | | |
|---|---|---|---|
| Tincture Opii | ... 1 drachm. | Tincture of Capsicum | 24 minims. |
| Chloroform ... | ... 48 minims. | Oil of Peppermint, English ... | ... 3 minims. |
| Rectified Ether | ... 32 minims. | Hydrochloric Acid, Pure ... | ... 4 minims. |
| Rectified Spirit | ... 32 minims. | Powdered Tragacanth | 2 grains. |
| Dilute Hydrocyanic Acid ... | ... 32 minims. | Treacle, dark green | 3 drachms. |
| Tincture of Indian Hemp ... | ... 32 minims. | Distilled Water to | 1 ounce. |

Usual dose 5 to 20 minims. For cholera, &c., 15 to 30 minims with a little water.

हें औषध पटकीचे जुलाब बंदकरण्यावर फारच वस्ताद आहे. ह्यानें जुलाब बंद होऊन पोटांतील दुखणें बंद होतें. हें औषध एकदोनदां घेतलें असतां जुलाब त्वरित बंद करतें. जेव्हां गांवांत पटकी उद्भवते तेव्हां गांवांतील प्रत्येक मनुष्याजवळ हें औषध असावें. खेड्यापाड्यांत अशा प्रकारचीं औषधें मिळण्याचा संभव नसतो ह्मणून सर्वांनीं अशा प्रकारच्या औषधाचा संग्रह करावा व सर्वांस ह्याचा संग्रह करतां यावा ह्मणून ह्याची किंमत थोडकी ठेविली आहे. ह्या औषधाचा फॉर- म्युला वर दिला आहे. ह्या औषधानें पटकीचे जुलाब बंद होतात इतकेंच नाहीं परंतु ह्यानें सर्व प्रकारचे जुलाब व पोटांतदुखणें बंद होतें.

ज्यांस ह्या औषधाविषयी खात्री करून घेणें असेल त्यानें वरील दिलेला फॉर- म्युला आपआपल्या डाक्टरांस दाखवा ह्मणजे वरील औषधांच्या गुणांविषयीं खात्री होईल. हें औषध सर्वमान्य व जगप्रसिद्ध असल्यामुळें त्याविषयीं अधिक लिहिले नाहीं. **किंमत** अर्धा औंसाच्या बाटलीस **सहा आणे** बं. ख. एका बाटलीपासून चार बाटल्यांपर्यंत **सहा आणे.**

### स्वेदक अथवा घाम आणणारें औषध.

हें औषध घेतल्यानें आंगाला घाम येतो, आणि घाम आल्यामुळें ज्वर नाहींसा होतो. ह्मणून हें औषध सर्व प्रकारच्या ज्वरावर अत्यंत गुणकारी आहे. फार ताप आंगांत असल्यामुळें जेथें क्विनीनचा उपयोग करितां येत नाहीं, तेथें ह्या औषधापासून उत्तम गुण येतो. ह्या औषधाच्या सेवनानें हात पाय दुखणें, डोकें दुखणें, हाडें फुटणें, निद्राभंग, बेआराम हीं सर्व बरीं होऊन झोंप लागते, आंगास घाम येतो, व ज्वर जाऊन तोंडास रुचि येते व अन्न खाण्याची वासना होते. ह्या औषधांत अफू व दुसरे विषारी पदार्थ बिलकूल नाहींत व ह्यांत क्विनीनही नाहीं; परंतु अत्यंत निर्धोक पदार्थांचं केलें आहे. **किंमत आठ आणे बं. ख. सहा आणे.**

## दुसऱ्या सर्टिफिकिटा.

लिहावयास कारण कीं, तुमच्या खोकल्याच्या, तापाच्या आणि हगवणीच्या औषधांपासून मला गुण आला आहे. हीं औषधें फारच चांगलीं आहेत.

(सही) **खिमचंद रावजी बेलानी**, इंजिनीयर, एल. सी. ई.
पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट, मुंबई.

———

आयतीं तयार औषधें घेण्याचा मला स्वभावतः त्रास आहे, असें असतांही मी तुमचें खोकल्याचें, तापाचें औषध व कांपौंड सिरप हीं औषधें वापरलीं. जेव्हां मीं तीं तपासून व वापरून पाहिलीं तेव्हां माझ्या अनुभवास असें आलें कीं, तुमचीं औषधें फार गुणी असून स्वस्त आहेत. तुमच्या ह्या उद्योगास आश्रय मिळावा व यश यावें असें मीं इच्छितो. तुमचा चांगलें औषध करून विकण्याचा प्रामाणिक उद्योग स्तुतीस पात्र आहे.

(सही) **डी. बी. वैद्य, एल. सी. ई.** ओव्हरसीयर.
पब्लिक वर्क्स डिपार्टमेन्ट, मुंबई.

———

आपल्या तापाच्या, खोकल्याच्या आणि हगवणीच्या औषधांपासून उत्तम गुण येतो असें माझ्या अनुभवास आलें आहे. हीं औषधें फार गुणकारी आहेत.

(सही) **शामराव एम. रेळे**, वकील, हैकोर्ट,
मुंबई.

———

तुमचा आयओडाईज्ड सार्सापरिला आणि गजकर्णाचे मलमानें फार अद्भुत रीतीनें गुण आला. मला माझ्या मित्रमंडळीस तुमच्या औषधांची शिफारस कर- ण्यास आनंद वाटतो.

(सही) **शाळिग्राम जगन्नाथ**, सुपरवायझर,
पी. डब्ल्यू. डी., मुंबई.

———

तुमच्या धातुपौष्टिक गोळ्या मला फार गुणी पडल्या हें आपणास कळविण्यास मला आनंद वाटतो.

(सही) **नंदाराम भिवराव दांडेकर,**
सिटी पोस्टल इन्स्पेक्टर, मुंबई.

———

मी तुमचीं खालील औषधें माझ्या कुटुंबांत वापरलीं; तीं फार निर्धोक आहेत, व जाहिरातींत लिहिल्याप्रमाणें गुणी आहेत. तीं येणेंप्रमाणें:—कॉलेरा मिक्श्चर, तापाचें औषध, गजकर्णाचें मलम, धातुपौष्टिक गोळ्या, घाम आणणारें औषध, आणि शौच्यास साफ होणाऱ्या गोळ्या.

(सही) **राघोबा बाळकृष्ण,**
गव्हरमेंन्ट पेनशनर, गिरगांव, मुंबई.

———

मी व माझ्या कुटुंबांतील मनुष्यांनीं तुमच्या कॉड लिव्हर ऑईलच्या इमलश- नच्या बाटल्या पुष्कळ वापरल्या, त्यावरून मी खात्रीनें सांगतों कीं तें फार स्वादिष्ट असून फार गुणी आहे. हें स्कॉटच्या इमलशनसारखें असून त्याच्यापेक्षां स्वस्त आहे, ह्मणून लोकांस घेण्यास अडचण पडत नाहीं. मेहरबानी करून दुसऱ्या सहा बाटल्या पाठवून द्या.

(सही) **पेरोजशाह एम्. दलाल,**
मुंबई ब्यांक.

———

तुमचें कॉड लिव्हर ऑईलचें इमलशन फार गुणकारी आहे व घेण्यास चांगलें आहे. ह्याच्या योगानें माझी प्रकृती सदृढ होऊन माझें वजन वाढलें आहे. मीं पुष्कळ प्रकारचीं इमलशनें वापरलीं व त्यांपासून मला तुमच्या इमलशनसारखा गुण आला नाहीं.

(सही) **शेट बेचरदास मुरलीधर,**
खेतवाडी, मुंबई.

———

तुमच्या धातुपौष्टिक गोळ्या आणि तापाचें औषध हीं फार उत्तम आहेत.

(सही) **पी. गणपतराव**, आकौंटन्ट.
कावरडा, मध्यप्रांत,

———

आपल्या औषधांपैकीं नंबर१च्या वीर्यवर्धक गोळ्या आम्हीं आणविल्या त्यांचा गुण वाटतो, करितां त्यांच्या आणखी १० बाटल्या जरूर पाठवाव्या.

(सही) **हणमंत गणेश चिटणीस,**
पो. जमादार संस्थान कागल.

———

तुमच्या धातुपौष्टिक गोळ्यांनीं मला चांगला गुण आला. कृपा करून दुसरी एक बाटली पाठवून द्या.

(सही) **महादेव गोविंद**, स्टेशन मास्तर,
कात्रज.

———

तुमच्या बारा आण्याची संग्रहणी आणि अतिसार ह्यांवरच्या बाटलीनें दोन मुलें काळरूपी संग्रहणीच्या मुखांत पडलेलीं व ज्यांचे हातपाय सुजले होते अशीं बरीं झालीं व बाकी शेष राहिलेल्या औषधानें एक साठ वर्षांच्या म्हातारी जीस संग्रहणी नेऊं पाहत होती ती ही ह्या औषधानें बरी झाली. मी हें औषध घेण्याची शिफारस माझ्या मित्रांस करीन.

(सही) **सयाना हनमाया**, असिस्टंट हेड सिग्नलर,
रायचूर.

———

आपणास लिहिण्यास फारच आनंद वाटतो कीं तुमच्या धातुपौष्टिक गोळ्यांपासून माझी प्रकृती बरी आहे व मला माझें काम करण्यास तरतरीही अधिक आली आहे. याजवरून पाहतां आपले औषधाची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे.

(सही) **एन. के. पाटकी,**
मुक्काम मेहकर, बुलठाणा.

———

मी तुमचें गजकर्णाचें मलम कांहीं दिवस वापरलें. त्याच्या योगानें मला पुष्कळ दिवसांचें व हट्टी गजकर्ण होतें तें बरें झालें. मला ह्यापासून गोवा पॉवडरपेक्षां फारच चांगला गुण आला.

(सही) **के. नरसिंह आयंगार,**
म्हैसूर.

———

मी आपलें गजकर्णाचें मलम, शौच्यास साफ होणाऱ्या गोळ्या, व दंतमंजन वापरलें. हीं औषधें फारच उत्तम आहेत, ह्यांत संशय नाहीं. गोळ्या केवळ हॉलो- वेच्या सारख्या गुणी आहेत. तुमच्या दंतमंजनानें मला चांगला गुण आला.

(सही) **पांडुरंग शंकरजी**, ड्राफ्टमन,
चीफ इंजिनीअर्स ऑफिस, जी. आय. पी. रेलवे, मुंबई.

———

आपलें मलम फार उत्तम आहे यांत संशय नाहीं.

(सही) **रामचंद्र बंडोबा दाढे,**
लोकलबोर्ड क्लार्क,
मेढा.

———

मला लिहिण्यास आनंद वाटतो कीं तुमच्या धातुपौष्टिक गोळ्यांनीं माझी प्रकृती दिवसानुदिवस सुधारत चालली आहे, ह्मणून दुसऱ्या दोन बाटल्या पाठवून द्याव्या.

(सही) **दत्तात्रय एस. निरोखेकर,**
शुक्रवार पेठ, सातारा.

———

आपण पाठविलेल्या धातुपौष्टिक गोळ्या फारच चांगल्या आहेत.

(सही) **बसाप्पा कौसळी व गुरसी दया वारकार**, व्यापारी,
हुबळी.

———

तुमच्या कांपौंड सीरपपासून मला फार बरें वाटतें. आणखी तीन बाटल्या कॉड लिव्हरच्या इमलशनच्या पाठवा व एक बाटली कांपौंड सीरपची पाठवा.

(सही) **देविदास रामराव बासिंमकर**, क्लार्क डिस्ट्रिक्टबोर्ड,
उमरावती.

———

तुमच्या हगवणीच्या व तापाच्या औषधांपासून पुष्कळ वेळां त्वरित गुण आला आहे. (सही) **नाना भाईजी,**
होर, कानराय आणि ब्राऊन, वकील, यांचे कारभारी.

———

तुमचीं ताप, खोकला, आणि हगवण यांवरील औषधें फार गुणकारी आहेत.

(सही) **केखुरु रुस्तमजी**, व्यापारी,
कोट, मुंबई.

———

तुमच्या औषधांचीं माझ्या मित्रमंडळीजवळ शिफारस करण्यास मला फारच आनंद वाटतो, कारण तुमच्या औषधानें चांगला गुण येतो. मीं तुमचीं खोकला व ताप ह्यांवरील औषधें स्वतः घेतलीं होतीं त्यापासून मला फार त्वरित गुण आला. तुमच्या कंपनीस चहुंकडून चांगला आश्रय मिळावा अशी माझी इच्छा आहे.

(सही) **बाळकृष्ण आनंदराव खळे,**
असिस्टट शिरस्तेदार,
हैकोर्ट, मुंबई.

### बाहेरगांवचे गिऱ्हाईकांस सूचना.

अधिक बाटल्या मागविणें असल्यास रेलवेद्वारें मागवाव्या. हांशील कमी पडतें. रेलवेमार्फत मागविणें असल्यास किंमतींचे पैसे अगाऊ पाठवावे, तेणेंकरून रेलवे रसीट व्ह्याल्यूपेयेबलनें पाठविण्याचा आणि मनीआर्डरचा खर्च मागविणारांच्या माथीं पडत नाहीं. पैसे पाठविणें झाल्यास मनीआर्डर अथवा एका रुपयास एक आण्याप्रमाणें वर्तावळ्यासुद्धां अर्ध्या आण्याच्या टिकीटा पाठवाव्या. १० रुपयांवर औषधें मागविल्यास शेंकडा २५ रुपये कमिशन देण्यांत येईल. पत्राचे उत्तरां- करितां टिकीट न पाठविल्यास अगर नांव, पत्ता, रेलवेस्टेशन, पोष्टआफिस, इंग्रजींत अगर मराठींत स्पष्ट न लिहिल्यास उत्तर अगर औषधें पाठविलीं जाणार नाहींत. नाटपेड पत्रें पाठवूं नये. **अनुपानाचा कागद बाटलीसोबत असतो.** सर्व पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

हीं औषधें आमच्या जुबिली मेडिकल हॉलमध्यें, मुंबईंत सर्व इंग्रजी औषधें विकणारांकडे आणि खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मिळतील.

**मुंबईंत.**—एफ. एस. मादनची कंपनी, नथु मुलजी इ०. **पुणें**—जगद्धितेच्छु आफिस, शनिवार पेठ; हीराणा इरापा, कोतवाल चावडी. **बडोदें**—गणपतराव भाई मंगळे, रावपुऱ्यांत बाकर अल्लीच्या वाड्याजवळ. **नासिक**—नासिकवृत्त आफिस. **हुबळी**—रामचंद्र देवजी जाधव.

**के. बी. रेळे. आणि कंपनी,**
**जुबिली मेडिकल हॉल,**
**कावसजी पाटेलच्या तळ्याजवळ,**
**गिरगांव पोष्ट, मुंबई.**

आमच्या दुसऱ्या: औषधांविषयीं आमचें दुसरें ह्यांडबिल पहा.

सहामाही ३ " ३ "
सालअखेर " ७ " १०
किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस ........०१

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy...............................4as

Advertisemehts
Belo;v 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXIV | AKOLA MONDAY SEPTEMBER 15 1890 | NO36

वर्ष २४ | अकोला सोमवार तारीख १५ माहे सप्टेंबर सन १८९० इ० | अंक ३६

वामन गोपाळ यांचा अनेक औषधे मिश्रित

### सार्सापारिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असुन खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंडे सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झालें असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फारफरसाच्या

### गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदू ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा


### कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गीतमराव केशव, मुंबई.

### सचित्रक्याटलाग



आर. डा. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें टिकिट पाठविल्यास मिळेल.

श्री.

### ज्ञानसंग्रह.

उपयुक्त विषयांचे मासिक पुस्तक

## DNYANA SANGRAHA.

### A MONTHLY MAGAZINE

ज्ञानसंग्रह नांवाचें मासिक पुस्तक सोळा वर्षांपूर्वी आपल्या या वऱ्हाड प्रांतांत निघत होतें. त्याचे २७ अंक प्रसिद्ध झाले आणि पुढें तें कांहीं विशेष अडचणीचे कारणा मुळें प्रकाशकांस बंद करावें लागलें, हें त्या पुस्तकाचे आश्रयदात्यांस माहीत आहे सदर्हू मासिक पुस्तकाचें चालकत्व येथील शाळा खात्यांतील कांहीं प्रसिद्ध विद्वान गृहस्थांकडे होतें. हे पुस्तक थोडेंच दिवसांत सर्व महाराष्ट्र देशांत चांगलें प्रसिद्धीस आलें असल्यामुळें अल्पकाळांत तें बंद पडलें या बद्दल पुष्कळ मराठी भाषेच्या उत्कर्षेच्छु सद्गृहस्थांस फार वाईट वाटलें हें पुस्तक पुन्हां सुरू करावें अशा विषयीं आज पर्यंत दोन तीन वेळा कांहीं गृहस्थांनीं खटपट केली परंतु त्यांचे ते प्रयत्न फलद्रुप झाले नाहींत हल्लीं पुन्हां या गोष्टी विषयीं वाटाघाट होऊन या पुस्तकाचे पूर्वीचे कांहीं लेखांनीं व पुणें, मुंबई, नागपूर वगैरे ठिकाणचे मराठी भाषेचे कित्येक विख्यात लेखकांनीं सदर्हू "ज्ञानसंग्रह" पुस्तकाचें पुनरुज्जीवन केल्यास लेखनद्वारा उदार आश्रय देण्याचें अश्वासन दिलें आहे. करितां आह्मी "ज्ञानसंग्रह" हें पुस्तक ता० १५ माहे नवेंबर सन १८९० पासून पुन्हां सुरूं करण्याचें योजिलें आहे.

आपल्या या वऱ्हाड प्रांतांत सरकारी शाळाखातें स्थापन होऊन आज २५ वर्षे झालीं. इतकें थोडे काळांत नागपूर, मुंबई वगैरे ठिकाणीं पन्नास वर्षांत अधुनिक विद्येचा प्रसार झाला असेल त्याहून हा अधिक या प्रांतांत झाला ही गोष्ट निर्विवाद आहे. अशी स्पृहणीय स्थिती या प्रांताची असतां लोकांना ज्ञानवृद्धीस साधनीभूत असें एखादें तरी मराठी भाषेंत मासिक पुस्तक येथें असणें हें अत्यवश्य आहे. ही उणीव अलिकडे बरींच वर्षे लोकांस वाटूं लागली आहे. व ती पुरी करण्याचें काम आह्मी पत्करीत आहों. या कृत्यास लोकाश्रय चांगला मिळण्याची आशा आहे. आतां ही गोष्ट बरेंच अंशी आमचे श्रमावर अवलंबून आहे हें आह्मी पक्कें समजून आहों व तें काम आह्मी सर्वांस मान्य होईल अशा रीतीनें करण्याचें कबूल करितों.

ज्ञानसंग्रहाचें पूर्वीचें पुस्तक ज्या सांच्याचें होतें त्याच सांच्याचें आतां हो निघेल. पण पूर्वीं वीस पृष्टें होतीं तीं आतां आम्ही चोवीस पृष्टें करणार आहों. व लोकाश्रय चांगला मिळाला ह्मणजे ३२ पर्यंत पृष्ठें वाढविण्याचा आमचा विचार आहे. पृष्टें जरी २४ केली आहेत तरी किंमत पूर्वीचीच ठेवली आहे. कागद पूर्वीप्रमाणें उत्तम घातला जाऊन पुस्तकाची छपाई ही पूर्ववत सुरेख राहील. पुस्तकाचे अंक वेळेवर नियमानें निघतील पुस्तकांत येणारे विषय पूर्वीप्रमाणेंच राहतील. तें येणें प्रमाणें.— ( १ ) शास्त्रीय विषय— अर्थशास्त्र पदार्थ विज्ञान, तर्कशास्त्र इत्यादि; ( २ ) पुस्तक परीक्षा; ( ३ ) मनोरंजक काल्पिक कथा; ( ४ ) देशांचे व विख्यात पुरुषांचें वर्णन; ( ५ ) लोकसुधारणा व नीति; ( ६ ) काव्य नाटकादि ग्रंथाचीं भाषांतरें; ( ७ ) कविता; ( ८ ) किरकोळ-शिक्षण पद्धति, उपयुक्त माहिती वगैरे.

पुस्तकाची किंमत.

| | |
|---|---|
| आगाऊ वर्षाची........................ | रुपये ३ |
| मागाहून "........................" | ४ |
| फुटकळ अंकास........................ | ०४ आणे |

टपाल हशील वेगळें पडणार नाहीं.

या पुस्तकाचे संबंधानें पत्रव्यवहार ठेवणें तो ज्ञानसंग्रहाचे म्यानेजर यांचे नांवानें खालीं लिहिलेले पत्यावर ठेवावा.

नागपूर व वऱ्हाड प्रांतांतील लोकांकरितां "उमरावती येथें प्रमोदसिंधु छापखाना" इतर ठिकाणचे लोकांकरितां पुणें येथें बुधवार पेठेंत श्री० ढमढेरे यांचा वाडा.

ज्या गृहस्थांचो या पुस्तकाचे वर्गणीदार होण्याची इच्छा असेल त्यांना ता० १५ आक्टोबर १८९० चें आंत वरील पत्यावर कळवावें. पुस्तकाचा अंक मिळाल्यापासून एक महिन्याचे आंत वर्गणी पाठवावी.

हें पुस्तक लोकहिताकरितां अनेक गृहस्थांचे साहाय्यानें प्रसिद्ध होणार आहे तर विद्वान गृहस्थांनीं वर लिहिलेले विषयांवर निबंध पाठवावे अशी त्यांस विनंती आहे.

यशवंत गोविंद केसकर.
ज्ञानसंग्रह व्यवस्थापक मंडळीचे
सेक्रेटरी.

### जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येत कीं अकोले म्यु० कमिटीचे हद्दींतील कंट्रोल लावण्याचा मक्ता १८९०-९१ ता० २० सप्टेंबर सन १८९० इसवी रोजीं हरास होणार आहे ज्या लोकांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु तारखेस टौनहालांत सकाळीं ७॥ वाजतां हजर व्हावे कळावें ता० ३०-८-९० इ०

V. K. Desai
Secretary A. M. C.

### जाहिरात.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावे ह्मणन त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८६३ चा आक्ट २७ कलम ३ प्रमाणें कि. क्लास नंबर १५ मि. नंबर ४ १८९०.

विद्यमान स्पे. अ. कमिशनर साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव लक्ष्मण बापाचें नांव नारायण तेली राहणार उंबरी ता० अकोला जिल्हा अकोला

यांस मयत भागाई मर्द लक्ष्मण राहणार उंबरी तालुके अकोला जि० अकोला यांचे कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावे ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहु मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचें कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारे कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० २३ माहे सप्टेंबर सन १८९० इसवो रोजीं सदरहु अर्जीची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपलें हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २ माहे सप्टेंबर सन १८९० इ०

M. Yashinkhan
सि. जज्य

### पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

कुरणखेड ता० ९–९–९०

रामराम वि० वि० आपल्या जगमान्य सुंदरपत्रीं खालील च्यारओळीस आश्रय द्याल अशी आशा बाळगून खालील मजकूर विवेचन करितो.

ता० ६-९-९० इ० रोजीं येथें मे० विठूजी नारायण तहसीलदार साहेब यांची स्वारी आली होती. त्यास आमचे येथील ज्ञानोत्तेजक लायब्ररींतील वर्गणीदार लोकांनीं साहेब बाहादुरांस पानसुपारी करितां पाचारण केल्या वरून आसाहेब लायब्ररींत पानसुपारीस आले. त्यांचे समागमे गांवातील संभावीत लोक पुष्कळ होते. मंडळीस अत्तर गुलाब व पानसुपारी झाली नंतर आसाहेबानीं ज्ञा० ला० सीस उपयुक्त पुस्तकें घेण्याकरितां एक रुपया इनाम दिला आणि ही लायब्ररी चिरायू होवो अशा वि० उत्तेजनपर भाषण करून मंडळीस बोध केला. कळावे.

आपला एक
( क्ष )

## जाहिरात

सर्व लोकांस कळविलें जातें कीं वऱ्हाड पैकीं जिल्हे वणी व वाशीम येथील पडीत जमिनीची मोजणी होऊन हल्लीं पडणारे बांद दगडाचा मक्ता सन १८९०।९१ सालचा देण्याचा आहे त्यास खालीं लिहिलेले दोन प्रकार आहेत यास्तव या दोन्ही प्रकारचे खुणाबद्दल कोणते दरांनीं घेण्याची इच्छा आहे असे विषयीं अर्ज तारीख १ माहे आक्टोबर सन १८९० इ० चे आंत सर्वे सेटलमेन्ट साहेब बाहादुर प्रांत वऱ्हाड आफीस यवतमाळ येथें हजर होईल असे रीतीनें पाठवावे अगर योग्य जमानतदारासह आमचे हुजूर स्वतः निशीं हजर व्हावे म्हणजे मक्ता देण्याची तजवीज लायकी पाहून केली जाईल मोजणीचे काम तारीख १०।१०।९० इ० पासून सुरू होईल. कळावें. तारीख १२ माहे सप्टेंबर सन १८९० इसवी.

खुणाचा प्रकार खालीं लिहिल्या प्रमाणें:—

पहिल्या प्रकारची खूण.
८ हात तळची लांबी.
४ हात तळची रुंदी.
॥ हात वरची रुंदी.
२। हात उंची.
दुसऱ्या प्रकारची खूण.
६॥ हात तळची लांबी.
३। हात तळची रुंदी.
॥ हात वरची रुंदी.
२ हात उंची.

ह्या शिवाय दगडाची खूण. १॥ हाता पासून २ हाता पर्यंत लांब

R. D. Hare.
सर्वे सेटलमेन्ट आफिसर
प्रांत वऱ्हाड.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १ शके १८१२

## वऱ्हाडचे जमीदार लोकांची सभा

वऱ्हाडांत जमीदार लोकांची सभा झाली तेव्हां पासून त्या संबंधानें आजपर्यंत काय चळवळ सुरू आहे हें समजत नाहीं. देशमुख देशपांडे लोकांचे हक्क या प्रांतात मोगलाई पासून आहेत या लोकांचे वाडवडीलांनीं ठिकठिकाणीं मोठे परिश्रम करून वतनदारी संपादन केलेली आहे. मुलकी अधिकाऱ्यांस सरकारी धाऱ्या संबंधानें जे अधीकार आहेत व ज्या प्रकारची कारवाई ते आज करीत आहेत तशीच कारवाई देशमुख देशपांडे करीत होते यांची वतनदारी मोगलाई अमलांत चालू होती तशीच पुढें चालविण्या विषयीं इंग्रज सरकारनीं इनकार केला पण वतनदारी पुस्त दरपुस्त चालण्याची असल्यामुळें व त्यांचे नोकरीची सरकारास जरूर राहिली नसल्यामुळें त्यांस पेनशनदाखल रकम सालचे साल सरकारी वायदा जमाझाल्यावर नक्त नेमणुकी सारखी सरकारी खजिन्यांतून मिळावी असा ठराव होऊन त्यांस त्याप्रमाणें आजपर्यंत सालोसाल रकमा मिळतात. त्यांस मोगलाई अमलांत सालोसाल सरकारी सारा कमजास्त जमाहोईल तशा मानानें पैसा मिळत असे परंतु नवीन ठरावा प्रमाणें त्यांस त्या मानानें पैसा नमिळतां एका सालची रक्कम सरकारी जमेची मुकर धरून त्याजवर ५ रुपये शेंकडा प्रमाणें मिळत आहे त्या संबंधानें जमीदार लोकांचा तकरार अशी आहे कीं सालोसालेच रकमेवर आम्हांस रकम मिळणें असून सरकारनें ती कमी करून रकम मुकरर करून टाकली ही एक तकरार. दुसरी तकरार अशी कीं देशमुख देशपांडे लोकांस इनाम जमीनी वगैरे होत्या त्याही त्यांचे वतनदारी संबंधानेंच होत्या त्याही इंग्रज सरकारचे अमलांत त्यांनकडे कांहीं दिवस मात्र चालल्या पुढें सर्व जमिनी खालसा करण्यांत आल्या. तसेंच अबकारीचे संबंधानें ही सरकारी जमेवर देशमुख देशपांडे यांचा हक्क असे तोही या सरकारचे अंमलांत नाहींसा झाला. अशा बऱ्याच तकरारी आहेत. या तकरारीचा निकाल आज पर्यंत जसा व्हावा तसा मुळींच झाला नाहीं. व या संबंधानें खरोखर जशी खटपट व्हावयास पाहिजे होती तशी झाली नाहीं. या तकरारी कितपत वास्तविक आहेत. व यांपैकीं सरकारनी कोणत्याकडे लक्ष देणें जरूर आहे अगर रास्त आहे त्यासंबंधानें विचार आम्हीं निराळे वेळेस करूं; परंतु आज आम्हांस एवढाच विचार करणें आहे कीं जमीदार मंडळींनीं जी सभा नुकतीच स्थापन केली आहे त्यासंबंधानें काय काय गोष्टी करणें अवश्य आहे.

आपले प्रसिद्ध जमीदार रा. रा. गोपाळराव अडगांवकर यांनीं या कामांत बरीच खटपट केली व आज देशमुख देशपांडे मंडळीस जे कांहीं मिळत आहे तें बरेंच अंशानीं तरी त्यांचेच श्रमाचे आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचे मृत्युमुळें जमीदार मंडळीस कोणी असावा तसा पुढारी राहिला नाहीं. जमीदार मंडळींत आज वतनदार संभावित लोक पुष्कळ आहेत परंतु अडगांवकर देशपांडे यांचे सारखा डोक्यावर भार घेऊन काम करणारे विरळाच. असो त्यानंतर या कामासंबंधानें खटपट झटली ह्मणजे आजच आहे. मध्यंतरी निरनिराळें जमीदार लोकांनीं आपापले इनामा संबंधीं अर्ज वगैरे करून कित्येकांस यश ही मिळालें परंतु सर्व जमिदार लोकांचे संबंधानें खटपट झाली नाहीं. आतां हें काम मोठ्या श्रमाचे व पैशाचे आहे; ज्या घराण्यांत या गोष्टीची उठाठेव झाली होती त्याच घराण्यांत त्यांचेच चिरंजीव ही या कामांत उद्युक्त आहेतच व इतर जमीदार मंडळीची ही या कामास अनुकूलता आहेच व म्हणूनच आजपर्यंत हे असेंच भिजत पडलेले काम कांहीं तरी फळास येईल असें वाटूं लागले आहे. ही सभा झाल्यामुळें आजपर्यंत जमीदार लोकांचे बळ निरनिराळें ठिकाणी वाटलेले होते ते एकत्र झाले आहे व असलीं कामें एक जुटीनें फार चांगली होतात असा साधारण नियम असल्यामुळें या कामाची उभारणी बरीच चांगली होईल अशी आशा दिसत आहे.

सभेचे संबंधानें एक सेक्रेटरी पगारी असावा, त्याचा पगार माफक असावा म्हणजे सुमारें १०० रुपये दरमाहा असला म्हणजे बस आहे शिवाय एक कारकून व एक शिपाइ इतकी मंडळी तुर्त सभेस बस आहे. या सेक्रेटरीनीं नेहमीचा पत्रव्यवहार वगैरे ठेवणें व साधारण सभेचे सर्व मामुल वहीवाटी प्रमाणें काम चालविणें हीं कामें करावीत विशेष कामासाठीं अर्ज लिहीविणें अगर विशेष सल्ला पैदा करणें अगर विशेष माहीती मिळविणे या बदल सभेनें वेळोवेळ पैसा खर्च करण्याचे मनांत बाळगले पाहिजे; या बद्दल पैसा खर्चणें ते म्यानिजींग कमेटी मुकर करून त्यांचे सल्यानें खर्चले जावेत मोठ मोठे पगारी सेक्रेटरी एकदम ठेवणे कांहीं जरूर नाहीं. कारण सभेचा खर्च फारच झाल्यास जमेदार मंडळींची नाउमेद होईल व या कामास तर कांहीं वर्षें लागणार तेव्हां कित्येक वर्षें पर्यंत मोठ मोठ्या पगाचे सेक्रेटरी आजच ठेवले तर निभाव लागणार नाहीं. अर्थात असल्या महत्वाचे कामास पैसे थोडे कमजास्ती लागले तरी हे लावण्यास मंडळीनीं तयार असले पाहिजे परंतु एकदम फार मोठा खर्चाचा बोजा न बसतां क्रमाक्रमानें बसल्यास कोणास हा जड वाटणार नाहीं आतां या सेक्रेटरीचे कामीं योजना ज्या मनुष्याची व्हावयाची तो मनुष्य होतां होईतोपर्यंत देशमुख देशपांडे यापैकीं असेल तर बरा अर्थात त्यांस इंग्रजी वगैरे येत असलेंच पाहिजे. असा मनुष्य देशमुख देशपांडे मंडळींत मिळणार नाहीं असें नाहीं. व त्यांचेपैकीं अशा योग्यतेचा मनुष्य त्यांनीं आपले कामीं आणावा हे हा त्यास फारच भूषण होणार आहे. या प्रमाणें सेक्रेटरीचे कामावर चांगले माणसाची योजना करून सभेनें आपलें काम जारी करावे अशी आमची सभेस सूचना आहे या सभेचें काम पगारी सेक्रेटरी असल्याशिवाय कधींही चांगले जोरानें चालणार नाहीं. आजपर्यंत वऱ्हाडांत ज्या कांहीं निरनिराळ्या संस्था आहेत त्यांचे मानानें पाहिले तर पगारी माणसाखेरीज व्यवस्था होणें ती चांगली होत नाहीं असा अनुभव आहे सभेचे संबंधानें आमचे वेळोवेळ जें मत आहे ते आम्हीं पत्रद्वारा सरकारांस व इतर लोकांस जाहीर करीत जाऊं. मात्र सभेनें आपलें काम तावडतोब सुरूं करावें व आम्हास वेळोवेळ सभेंत काय चाललें आहे हें कळवीत असावे.

---

कोणत्याही पूर्वापार चालत आलेल्या रूढींत फेरफार करणें फार कठीण आहे. ही गोष्ट केवळ हिंदुस्थानलाच लागू आहे असें नाहीं पूर्वीच्या इतिहासा वरून पाहतां इंग्लंडसारख्या देशांत सुद्धां अशाच अडचणी आल्या व कित्येक वेळतर लोकांचे आपसांतले आपसांत युद्ध प्रसंग सुद्धा झाले आहेत असें प्रकार म्हणजे केवळ इष्ट रूढी बदलण्यांच्या वेळेस घडतात व अनिष्ट रूढी बदलण्याच्या वेळेंत घडत नाहींत असें नाहीं. दोन्हीला ही हरकत एकच. कोणत्याही गोष्टींत बदल करणें म्हणजे मोठा बाऊ वाटतो. सर्व लोकांनी अमुक एक चाल वाईट आहे असे वाटत असतं, त्या पासून अनिष्ट परिणाम नेहमीं ते अनुभवीत असतात, तरि तींत सुधारणा करण्यास मात्र ते धजत नाहींत. नेहमीं अशा प्रकारच्या सुधारणा विद्वान किंवा जनसमूहातील प्रमुख अथवा राजे यांच्या हातून होत असतात. आमच्या मध्यें अलिकडे पुष्कळ चाली कांहीं आपमतलबी लोकांनीं घुसडून दिल्या आहेत. खरोखर पाहिलें असतां धर्म पुस्तकांत त्यांना कांहींच आधार नाहीं. तरि त्या इतक्या ठाम बनून गेल्या आहेत कीं मोठ्या मोठ्या विद्वानां सुद्धांना त्यांत हात घालण्यास कठीण पडतें आपल्या हिंदुलोकांत केशवपना सारखी दुसरी वाईट रूढी कोणचीही नाहीं. व ती फार अनिष्ट आहे ती लवकर बंद झाली पाहिजे असें प्रत्येक मनुष्याला त्यांत शूरपर्वे करून प्रत्येक विद्वान मनुष्याला वाटत आहे. व त्या प्रमाणें विद्वान लोक व इतर पुढारी म्हणविणारे लोक नेहमीं व्याख्यानें देतात परंतु प्रसंग आलाकीं लागलीच सर्व कळवळा एकीकडे ठेवून मोठ्या निर्दयतेनें आपल्या नातलगाला खंडुजीच्या कचाट्यांत देतात. खरोखर पाहिलें असतां ही चाल इतकी वाईट आहे कीं खंडुजी सारख्या लोकांना सुद्धा द्रव येऊन त्यांनीं आपल्या जातींत हें कठोर व निर्दयपणाचें कृत्य न करण्याबद्दल विचार केला आहे. तरी इतक्यांनींही चाल बंद होईल असें आह्मांला वाटत नाहीं. त्यांच्या कृत्यास यश येण्यास आपण मदत दिली पाहिजे ह्मणजे दोन्ही बाजूनीं सारखा प्रयत्न चालू झाल्यास यश येण्याचा संभव आहे. त्यांच्याच कटावर अवलंबून राहून चालू झटलें तर त्या लोकांचा निग्रह फार दिवस टिकेल असें नाहीं कारण त्यांत पैशाचा बराच संबंध आहे पैशाचा मोह किती आहे हें कांहीं नवीन सांगणें नकों. त्यांत मग न्हाव्या सारख्या अशीक्षित जातीच्या लोकांवर त्याचा परिणाम लोकर होणार नाहीं असें मानण्यास फार थोडी कारणें आहेत. विद्वान लोकांनीं ह्या कामांत पाऊल पुढें टाकल्या शिवाय ही चाल बंद होणार नाहीं. धर्माचाच जर अटकाव असेल तर तो श्रीशंकराचार्यांपासून दूर सहज करतां येईल. परंतु तसा कांहीं प्रतिबंध नाहीं असें आम्हाला खास वाटतें. केशवपन करण्याचें मुख्य कारण एक तर स्त्री विधवा आहे व दुसरे तिचा पति वियोगामुळें सर्व उदासीनता उत्पन्न होऊन तिनें सर्व गोष्टीचा त्याग केला आहे असें दर्शीत करावें एवढ्याच करितां ही चाल सुरू झाली असावी. परंतु केशवपन न करितां सुद्धां ह्या दोन्ही गोष्टी दाखवितां येतील. केश व इतर अलंकार हें स्त्रीला लग्न होण्यापूर्वीं सुद्धां असतात अमुक एक पुरुषाशीं संबंध झाला आहे ह्मणून कांहीं स्त्री केश लावीत नाहीं किंवा अलंकार वगैरे घालीत नाहीं. लग्न झाल्यामुळें काय ते एक मंगळसूत्र जास्त मिळतें. तेवढें काढून टाकावें व ती विधवा आहे असें दाखविण्या करितां कूंकूं लावूं नये ह्मणजे झालें केश काढले व अलंकार न घातले ह्मणजे स्त्रीची उदासीनतां व खेंर दुःख दिसून येतें असा समज असणें फार विचित्र आहे. ज्या स्त्रीला खरोखरच पतिवियोगानें दुःख झाले आहे तें अलंकारांत घातल्यानें किंवा केश ठेविल्यानें कमी व्हावयाचे ना-

हीं किंवा काढल्यानें जास्त व्हावयाचें नाहीं. मानसीक विचार ह्या अशा उपरोधिक गोष्टींनीं प्रगट होत नाहींत ह्या शिवाय दुसरें एक तिला विद्रुप करण्याचें कित्येक लोकांच्या मतें असें आहे कीं तिला विद्रुप केलें म्हणजे ती कोणाच्या प्रेम पाशास पात्र होणार नाहीं परंतु या बद्दल एक आमच्या मध्यें म्हण आहे तिचा विचार केला असतां ह्या म्हणण्यात किती अर्थ आहे हें सहज कळेल "इषकलगा बेंडकीसें तो पद्मीन क्या माल है ?" तर मग अशा उगीच क्लिष्ट कल्पना घेऊन उगीच एखाद्या चांगल्या सुधारणेस अटकाव न करणें हें बरें.

---

श्रीमंत गायकवाड सरकारच्या राज्यांत महरोगानें त्रस्त झालेल्या लोकांच्या उपजीवनार्थ आज कित्येक वर्षांपासून १६००० रुपयांच्या वसूलाचा मुलूख तोडून दिला आहे व अनुसया नांवांच्या गांवांत त्याच्यां रहाण्याचो व्यवस्था केली आहे. मुंबईतील चळवळीच्या अगोदरच श्रीमंत सयाजी राव महाराजानीं त्याच ठिकाणीं चाळीस हजार रुपये खर्च करून एक भव्य इमारत बांधिली आहे व त्यांत शंभर रोगी रहातील अशी व्यवस्था केली आहे. ह्या कृत्यास लोकांची मदत मुळींच नाहीं. अशा प्रकारची निरपेक्ष बुद्धीनें व प्रजेच्या सहाया शिवाय कितीशीं कामें आमच्या सरकारानें केली आहेत बरें? आपले मुळींच हित नसतां निवळ प्रजेच्या कल्याणार्थ जर आमचे सरकार आपल्या पिशवीचें तोंड खुलें करण्यास नाकबूल आहे तर आम्हीं त्याचे पोवाडे गावें असें सांगणें निवळ वेडेपण होय.


# The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 15, 1890.


## OVERWEENING CONCEIT AN EVIL.

The overweening conceit which the greater part of men have of their own abilities is an ancient evil remarked by moralists and philosophers of all ages. This absurd presumption in their own abilities has been less taken notice of. It is however universal. There is no man living who when in tolerable health and spirits has not some share of it. The chance of gain is by every man more or less overvalued and the chance of loss is equally undervalued and by scarce any man valued more than it is worth. The universal success of lotteries furnishes an example of how the chance of gain is overvalued. A perfectly fair lottery is impossible. In order that the undertaker may make anything by it the whole gain cannot compensate the whole loss. The vain hope of gaining some of the great prizes is the sole cause of the demand for tickets. Even soberest people scarce look upon it as a folly to pay a small sum for the chance of gaining ten or twenty thousand pounds though they know that even that small sum is perhaps 20 or 30 per cent more than the chance is worth. In order to have a better chance for some of the great prizes, some people purchase several tickets and others small shares in a still greater number. Adventure upon all the tickets in the lottery and you lose for certain. The greater the number of your tickets the nearer you come to this certainty. For there is not a more certain proposition in Mathematics than that the more tickets you adventure upon the more likely you are to be a loser.

That the chance of loss is frequently undervalued and scarcely overvalued more than it is worth, we may learn from the very moderate profit of insurers. In order to make insurance either from fire or sea— risk a trade at all, the common premium must be sufficient to compensate the common losses, to pay the expense of management, and to afford such a profit as might have been drawn from an equal capital employed in any common trade. The person who pays no more than this, evidently pays no more than the real value of the risk or lowest price at which he can reasonably expect to insure it. But though many people have made a little money by insurance, very few have made a great fortune; and from this consideration alone it seems evident enough that the ordinary balance of profit and loss is not more advantageous in this, than in other common trades by which so many make fortunes. Moderate, however, as the premium of the insurance commonly is, many people despise the risk to care to pay it. Taking the whole kingdom on an average nineteen houses in twenty or rather perhaps ninetynine in hundred, are not insured from fire Sea-risk is more alarming to the greater part of people. Is not the proportion of ships insured to those not insured much greater? Many sail however at all reasons and even in time of war, without any insurance. This may sometimes perhaps be done without any imprudence. When a great company, or even a great merchant has twenty or thirty ships at sea, they may, as it were, insure one another. The premium upon them all, more than compensate such losses as they are likely to meet with in the common course of chance. The neglect of insurance upon shipping, however, in the same manner as upon houses, is, in most cases, the effect of no such nice calculation but of mere thoughtless rashness and presumptuous contempt of the risk run.

The contempt of the risk & presumptuous hope of success, are in no period of life more active than at the age at which young people choose their professions. How little the fear of misfortune is then capable of balancing the hope of good luck, appears still more evidently in the readiness of the common people to enlist as soldiers, or to go to sea, than in the eagerness of those of better fashion to enter into what are called the liberal professions.

What a common soldier may lose is obvious enough. Still romantic hopes alone are the price of his blood. The lottery of the sea is not altogether so disadvantageous as that of the army. The great admiral is less the object of public admiration than the great general, and the highest success in maritime service promises a less brilliant fortune than equal success in the land. The same degree of difference runs through all the inferior ranks of preferment in the ranks of a soldier and a sailor—The dangers of a life of adventures instead of disheartening young people, seem frequently to recommend a trade because the chances for reputation & gain appear dazzling— Bankcruptcies are most certain in the most hazardous trades; most hazardous trades that of a smuggler for instance are likewise the most profitable when the adventures succeed. So the presumptuous hope of success seems to act upon all occasions and to entice adventurers into those hazardous trades. To the tendency of overweening conceit all are more or less subject.

---

## SOME REFLECTIONS ON REPRESENTATIVE GOVERNMENT.

(Communicated.)

(Continued from our 30th issue.)

The striving character, *e. g.* of the English and of the Americans, is the foundation of the best hopes for the improvement of mankind and is to be condemned only in so far as it lets value on low and material objects. Even material prosperity prepares the way for spiritual improvement. Passiveness in subject is admired by a monarch or the few who govern the many. But we must remember that men are not really men as long as they are merely submissive and subject to the will of others. Under such circumstances, the virtues of self-help and self improvement have no scope. But a man, when he has a voice in the administration, when he can, if he likes dissent and exert himself to get altered the established laws of society, when he starts from even ground and is entitled to all the privileges of full citizenship feels quite differently. It is a great discouragement for an individual to be left out of the constitution, to be obliged to plead from outside the doors before the arbiters of his destiny not admitted to consultation within.

Also we must take into account the practical discipline which the character obtains when a man is occasionally called upon to perform some social function. There is a preponderence of self interest in the daily routine of mankind. Satisfaction of their wants is their ordinary business in life. There is little that gives them largeness of views. There are no opportunities of improvement in the shape of good access to good books or superior men. Calling on him to do something for the public removes all these inconveniences. Public duty makes him an educated man compels him to take a larger and more impartial view of things e. g. Calling on people to sit in a jury or to serve in Parish offices introduces them to a variety of elevated considerations. He is brought in contact with minds of a superior order. He is naturally led to take more interest in general affairs of the society. Where such school of public spirit does not exist people are selfish and absorbed in their own affairs. Their neighbours when not their allies and associates in some common work become rivals. There is no patriotism and the highest aspiration of the law giver is only to make men like a flock of sheep innocently nibbling grass side by side.

From these considerations it is evident that only a popular government can satisfy the exigencies of the social state, that in which all people take some part however small and the final goal of governments should be to admit all into the sovereign power of the state. But as the admission of all people, in a state exceeding in extent a single city, to sovereign power is impossible it follows that representative govt. is the ideal type of a perfect govt.

Representative Govt. being recognised as the best polity, a people will be better suited to it in proportion to their degree of general improvement. As they range lower and lower in development that form will be less and less suitable to them. Let us see at what point in the discending scale it becomes altogether inadmissible. It is plain that representative govt. is unsuitable where any form of govt. is unsuitable owing to the absence of the three conditions of its subsistence. Willingness of the people, ability to preserve, and ability to make it achieve its best results. Willingness of a people to accept representative govt. becomes a practical question only when the ruling govt. is willing to confer it as a boon. The qualities that make representative govt. impossible are generally the indifference of the people or their inability to understand its processes and requirements. When the people do not take a general interest in their affairs, when there is no strong public opinion, electors will abuse their privileges. The few who will take interest in the govt. are the sole masters when the public at large is indifferant and they will use it chiefly for their private interests or for that of their friends and adherents. These are cases where representative govt. will not continue for a long time. There are others in which it may continue but other forms of govt. are preferable such a case, for instance, is when the people are in a state of nature and have to learn the first lesson in civilization viz of obedience. Representative assemblies drawn from such people will reflect only their turbulence and insubordination. They require a despot or an inspired prophet to discipline them in to habits of civilized life. Another case, the contrary of this, is when the people are too submissive and prostrate unaccustomed to self govt. If they were given the right to elect their rulers they will only choose their tyrants to govern them. There are instances of such passive people gradually manucipated from local tyranny by the aid of a central authority. The French people were slaves of the feudal lords. But through the help of the king of France they freed themselves from the yoke of their local despots. So these people required a monarch to make them free.

(To be continued.)

---

## वऱ्हाड.

मे० कामिशनर सा०ची स्वारी चिखलदऱ्यास गेली.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. इ०हे इलिचपूराहून येऊन मोर्शीकडे गेले आहेत. तेथून एकदोन दिवसांत परत येऊन ते मुर्तिजापूर व कारंजाकडे जातील.

बडणेरा मिलचे म्यानिजर यांच्यावर त्याच मील मधील इंजिनियर मि० गाडफ्रे यांनीं मारहाण केल्याबद्दल फिर्याद केली आहे. हा मुकद्दमा बडनेरा कोर्टातून येथें रा० रा० वामन रावजी बापट यांचे कोर्टांत वर्ग झाला आहे. प्रासिक्युशन तर्फे मि० लीच व रा० रा० रंगनाथ नरसिंव्ह मुधोळकर आणि डिफेन्स तर्फे मि० कांगो व रा० रा० गणपत रावजी खापर्डे हे वकील आहेत. या खटल्याकडे बऱ्याच लोकांचें लक्ष लागलें आहे. प्रासिक्युशनचें काम संपलें. इं० पि० को० क० ३५५ प्रमाणें अरोपिवर चार्ज ठेविला आहे. डिफेन्सचें काम आज पासून सुरू आहे.

---

### नोटिसीचें उत्तर.

रा० रा० नारायण बजाजी मुक्काम अकोले यास. तुम्ही नोटीस दिली ती पावली नोटीसींत लिहिलेला मजकूर सर्व खोटसाळपणाचा आहे कारितां तुमचा हक्क नसतां विनाकारण आम्हांस नोटीस दिली यामुळें नोटिसीचें उत्तर देणें भाग झालें करितां या नोटिसाचे खर्चीबद्दलचे रुपये आठदिवसांचे आंत द्यावे न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल ता० १४-९-९० इ०

( सही ) बाळाजी लक्ष्मण गुजराथी
राहणार अकोलें दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार

पारीस येथें बिनधुराचा उपयोग करून पाहिला परंतु केलेला प्रयत्न व्हावा तसा झाला नाहीं असें निदर्शनास आलें.

मोंबासा पासून व्हिक्टोरिया न्यांझा पर्यंत रेलवेचा रस्ता करावयाचा आहे त्याचे काम ता० २७ आगष्ट पासून सुरू झालें.

कसायास शिक्षा.—ग्वाल्हेर येथे एका कसायानें गाय मारली त्या बद्दल त्या सरकारानें त्यास चारवर्षे सक्त मजूरीची शिक्षा दिली.

मुंबई--बडोदा--आणि सेंट्रल इंडिया रेलवे कंपनीस एरंडेल आणि जवसाचें तेल अतिशय लागतें ते विलायतेहून आणणें फार महाग पडतें सबब त्या कंपनीनें दोन्ही प्रकारचें तेल हिंदुस्थानांत काढण्या साठीं साबरमती नदीच्या कांठीं तेलाच्या गिरण्या स्थापण्याचा निश्चय केला आहे.

खोट्या चवल्या पावल्या चालविण्याचा व्यापार एक पोरगा लाहोरास कित्येक दिवस करीत होता शेवट तो पोलिसास सांपडून त्यावर खटला झाला. शाबिती झाल्या मुळें त्यास दोनवर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली.

टिनीव्हेली शुगर रिफायनिंग कंपनी या नांवाची एक कंपनी निघून विलायतेस रजिस्टर झाली आहे प्रत्येक शेअर १० पौंडांचा असून कंपनीचें भांडवल २९००० पौंड असणार आहे. ऊस लावावयाचा, त्या पासून साखर तयार करावयाची हा ह्या कंपनीचा मुख्य उद्देश आहे. शु० सू०

विद्याखात्याचा ठरावः लोकलबोर्ड आणि म्युनिसिपालिट्या यांच्या ताब्यांतील शाळांतले शिक्षक हे सरकारी नोकर आहेत सबब राष्ट्रीय सभा व इतर अशाच जातीच्या पोलिटिकल सभांत त्यांनीं शिरूं नये व त्यांस मदत करूं नये असें विद्याखात्यांतील अधिकाऱ्यानें ठरविलें आहे, असें मुंबईच्या एज्युकेशनल रेकर्डकर्त्यास समजलें आहे.

गेल्याचे मागील सोमवारीं बेळगांव येथें एका मळ्यांत एका बेरडाची बायको दुसऱ्या एका बेरडा बरोबर जारकर्म करीत असतां नवऱ्यानें पकडली आणि लगेच त्या उभयतांस नग्न स्थितींतच जशाचीं तशीं कांच्यानें आवळून पोलिसापुढें आणली. हा गुन्हा पोलिसच्या अधिकारांतील नसल्यामुळें त्यांणीं त्यास माजिस्ट्रेटकडे जाण्यास सांगितलें. दि० बं०

मुंबईच्या मलबारी शेटजींनी विलायतेस जाऊन मोठी गमत उडवून दिली आहे. या शेटजींनी बालविवाहाबद्दल तेथील टाइम्स पत्रांत एक लेख प्रसिद्ध केल्यामुळें मोठी गडबड उडवून दिली आहे. या संबंधानें विचार करण्याकरतां एक कमेटी नेमण्यांत आली असून त्यांत मानी सेक्रेटरी, गव्हरनर जनरल, गव्हरनर, उत्तम कायदे बाज वैद्यराज, पाद्री. आणि राष्ट्रीयसभेचे पुढारी आहेत या प्रकरणांत जो एक अती क्रूर इंग्लिश कायदा घुसवून दिला आहे तो काढून टाकावा असें या कमेटीचें ह्मणणें आहे आह्मांस या सर्व प्रकरणाबद्दल मोठें हसूं येतें. उद्या युरोपियन लोकांत नाच खेळतात काडी मोडण्याचे खटले होतात, घोड्या एवढ्या प्या पोरी होतात असें जर आमच्यांतील नामांकित रानडे, नूलकर प्रभृति मंडळी म्हणूं लागली तर त्यांस वरील कमेटी वजन देईल काय? जर देणार नाहीं तर या परदेशस्थ व आमच्या घरगुती चाली रीतीबद्दल अगदीं मुर्ख असणाऱ्या कमेटीचे हें मत राणी सरकार खात्रीनें कबूल करणार नाहीं आणि मग यांच्या फजीतीस पारावार नाहीं!! उंदराला हे लोखडाचे खेळ पाहिजेत कशाला? आमचे सुधारक मात्र वरील बातमी ऐकून 'जितंजितं' असें ओरडू लागतील पण घागरींत सर्प नसून देवाची मूर्ती आहे हें त्यास कोठें माहिती आहे.

अलीकडे बंगाल्यांत एक प्रकारचा जुगार सुरू झाला आहे. छोटा नागपूर प्रांतांत सोन्याच्या खाणी सांपडण्याचा संभव आहे असें कल्पनेनें ठरल्यामुळें त्या प्रांतांत तें सोनें शोधून काढण्यासाठीं एकवार एक कंपन्या स्थापन होत आहेत. या कंपन्यांच्या मागांची किंमत १। पट १॥ पट वाढत आहे. एका कंपनीच्या भागाची किंमत दुपटीपर्यंत वाढली आहे. दररोज नव्या नव्या कंपन्या स्थापन होत आहेत. आतां या कंपनी पैकीं कोणत्या कंपनीचें नशीब उघडतें पहावें. कांहीं वर्षांपूर्वीं मुंबईस जो शेअरबाजार झाला होता त्याचाच हा नमुना असावा. मुंबईस जो पावसाच्या सट्याचा जुगार चालूं होता तो मुंबई सरकारानें कायद्यानें बंद केला व हा वरील बंगाली जुगारही कायद्यानें बंद झाला पाहिजे. आज जो हा जुगार चालू आहे त्यांत कित्येक लक्षाधिपति होईल व कित्येक धुळीला मिळतील. सध्यां कंपन्यांच्या व्यवस्थापकांस चैन करावयास मिळत आहे एवढें मात्र खरें. विलायतेस ही सुमारें एक शतकापूर्वी 'साऊ थसी बबल' नावाची अशीच एक कंपनी निघाली होती व तिनें कित्येकांस धुळीस मिळविलें एकदम श्रीमंत होण्याचा हा मार्ग चांगला नाहीं.

नेटीव घोडेस्वारांस नवे घोडे व इतर सामान देण्याविषयीं विचार करण्यासाठीं सिमल्यास लवकरच एक कमेटी बसणार आहे.

विलायतेस एक खटला चालूं असतां एक जुरर पुरावा चालू असतां निजला व तो कांहीं वेळानें उठला तो बराच पुरावा त्यानें ऐकला नव्हतां पुढें त्या ज्यूरीनें पुरावा पुरा ऐकला नाहीं. त्याबद्दल तो ज्युरी मत देऊं शकेल काय असा एक प्रश्न पुढें आला व त्यावरून जज्जानें त्या जुरिस डिसमिस करून खटला पुन्हा पहिल्यापासून सुरूं करण्यांत आला. नशीब बिचाऱ्या आरोपीचे.

मि. ग्रीनवूड नावाचा एक गोरा मनुष्य म्हणतो कीं, आज जी स्थिती आहे तीच प्रसिद्ध फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं होती आणि म्हणून या शतकाच्या शेवटीं म्हणजे आणखी दहा वर्षांनी युरोपांत जंगी राज्यक्रांति होण्याचा संभव आहे. विलायतच्या पार्लमेंटच्या निवडीच्या वेळी निवड नीट न होतां तेथील सर्व पक्षांत मोठा घोटाळा उडून राहील. विलायतची स्थिती अशी होईलः— समाजांत गोंधळ, प्रजेवर जो एक प्रकारचा राजाचा दाब तो नाहींसा होईल, चोरांच्या मोठमोठाल्या सभा होऊन ते उघड व निरंतर चोऱ्या करूं लागतील. निरनिराळ्या पक्षाच्या लोकांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहणार नाहीं, पार्लमेंटाची किंमत मुळींच राहणार नाहीं तें नेबळें बनेल आणि प्रत्येक मुत्सद्दी जास्त जास्त पैसे खाण्याचा प्रयत्न करील आणि मग असें होतां होतां प्रधान मंडळांत गप्पा गोंधळ उडेल व नंतर त्याचा परिणाम मोठाले दंगे होतील." हा ग्रीनवुड साहेबाची मुक्ताफळे खरीं न ठरोत।

ब्रह्म देशांतील एका डेप्युटी कमिशनरवर २७,००० रुपये गिळकृत केल्याबद्दल आरोप आला असून त्याची चवकशी रंगून येथें चालू आहे त्या प्रांतांत ठिकठिकाणीं ज्या पोलीस चौक्या बसविल्या आहेत त्यांच्या खर्चाबद्दल तेथील लोकांपासून जो कर घेण्यांत येत असे तो सरकार जमा न करतां ही स्वारी 'आप्पायस्स्वावा' करीत असे. आमच्या दक्षिणेंतील कमिशनर मि. क्राफर्ड यांचे हे धाकटे बंधूच ह्मणावयाचे!

एका अमेरिकन होई नावाच्या मनुष्यानें छापण्याचें एक नवें यंत्र तयार केलें असून या यंत्राच्या वेगानें एका तासांत २०,००० प्रती निघतात. छापून निघतात इतकेंच नाहीं तर घडी घालून कापून नीट तयार करून ठेवण्यांत येतात. या यंत्रांत आणखी अशी ही एक युक्ती आहे कीं कागदाच्या दोन्ही बाजू एकदम छापतां येतात. हे यत्र विलायतच्या एका आठवड्यानें निघणाऱ्या पत्रानें विकत घेतलें आहे व याच्या प्रती दर आठवड्यांस ६,००,००० प्रती निघतात!! विलायतेस किंमत कमी करण्याची चढाओढ लागली आहे व आमच्या इकडे बाजारच्या भाजी प्रमाणें पत्राच्या किंमती झाल्या आहेत. असो सदर्हु यंत्र इकडे एखादा कारखानदार आणतो कीं काय पाहूं या.

पंजाबांतील प्रसिद्ध पोलिसुपरिंटेंडेंट मि. वारबर्टन याणी ट्रिब्यून पत्रावर बेअब्रुची फिर्याद केली व ती ता. ९ सिनहू पासून सुरू झाली. या दिवशीं ट्रिब्यून पत्रानें केलेले तीन आरोप सांगण्यांत आले हा खटला डे. कमिशनर मि. केनेडी यांच्यापुढें चालु आहे ते तीन आरोप थोडक्यांत असे आहेतः--गुन्हेगारांच्या निशाण्या घेतेवेळीं मि. वारबर्टन याणी पुरुष व स्त्रिया यांची इजत घेतली; मि. वारबर्टनने जुलमाने ७०,००० रुपये सावकारांपासून कर्जाऊ काढले आणि तिसरा मि. वारबर्टन हा प्रसिद्ध वारबर्टनचा मुलगा नसून त्याची आई क. वारबर्टन जवळ ठेवलेली राख होती हे तिन्ही अटि असून आजपर्यंत ७०० म्हाताऱ्या लोकांची तपासणी केली पण त्यापैकीं एकाही मनुष्याची इजत घेतली नाहीं फक्त एका बलदेवदास नावाच्या इसमानें फिर्याद केली होती तिचा निकाल अपसांत झाला. दुसऱ्या आरोपाबद्दल मि. वारबर्टनचें ह्मणणें असें आहे कीं, मी दोघा सावकारापासून फक्त ४००० रुपये कर्ज काढले आहेत पण ते त्यांच्यापासून जुलमानें घेतले नाहींत. तिसरा आरोप खोटा आहे व तो आरोपी कबूल करतात. या दिवशीं मि. वारबर्टनची कच्ची चवकशी पुरी झाली नाहीं. मि. आलबीन टर्नर व इतर नेटिव ब्यारिष्टर हे आरोपी तर्फे असून मेसर्स ग्रेडवरी, कार, स्टोकन व सिक्लेग्ह वगैरे फिर्यादी तर्फे आहेत. या कज्जाचा काय निकाल होतो पहावें.

लिव्हरपूल येथें ता. ४ सिनहूरोजीं व्यापारी लोकांची एक सभा भरली होती त्यावळीं मजुरास दररोज आठ तास काम करण्यास पडावें असा पार्लमेंटानें कायदा करावा असें ठरलें.

"हिंदुस्थानची सुधारणा ढेंगा टाकून मोठ्या जोरानें चालली आहे व रेल्वे जास्त होण्याचा उपाय चालू आहे" असें हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी लार्ड क्रास याणी एका जेवणावळींत बोलून दाखविलें भोजनभाऊच तो! ठा० अ०

लेडी डफरीन फंडाच्या आश्रयानें तयार झालेल्या दोन डाक्टरणी इंग्लंडाहून यावयाच्या आहेत.

एका युरोपीयन स्त्रीनें दिल्ली येथें नुकतीच मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली.

गव्हर्नर जनरल साहेबांची प्रकृती जो तापानें बिघडली होती ती आतां बरीच सुधारत चालली आहे परंतु अद्याप घर सोडण्यासारखी झाली नाही.

रावलपिंडी येथें एक फार उपयोगाची गोष्ट घडत आहे. तेथील एका सरकारी हपीसांतील एक एतद्देशीय ख्रिश्चिअन नुकतांच वारला; त्याच्या शिकलेल्या बायकोनें आपल्यास निर्वाहास दुसरें साधन नसल्यामुळें आपणाला आपल्या नवऱ्याची जागा द्यावी असा अर्ज तेथच्या मुख्य अधिकाऱ्याकडे केला आहे. आणि असें ह्मणतात कीं तिला ती जागा फार करून मिळेल. असें झाल्यास शिकलेल्या स्त्रियांस अशा सोईच्या जागा मिळूं लागल्यानें त्यांचा फारच फायदा होणार आहे.

भावलपूर येथें हिंदु स्त्री पुरुषानीं मोहरमच्या सणांत जाऊं नये अशी दवंडी पिटविली होती असें कळतें.

हैद्राबाद रेलवेंत एका युरोपियनानें एका युरोपियन लेडीच्या डब्यांत शिरून तिच्या बरोबर धिंगामस्ती केल्या बदलची बातमी आली होती. आतां असें कळतें कीं त्या दोघांनीं एका ट्रेननें पुष्कळ प्रवास केला होता. मग ही आपुकमापुक तर नसेल ना?

सुमारें पंधरा दिवसाच्यापूर्वीं कऱ्हाड तालुक्यांतील अंतवडी गावांतील मारुतीस देवी आल्या होत्या. तेथील लोकांनीं देवीची पाखडणी वगैरे केल्यावरून त्या गेल्या असें चित्रगुप्तावरून कळतें.

मद्रासच्या एका वर्तमान पत्रावरून असें समजतें कीं मिस लिलिमन नांवाच्या स्त्रीला कोचीन येथील पोस्ट मास्तर जनरलच्या हापिसांत कारकुनाची जागा मिळाली. सु० प०

## अकोले बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००।– |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | १००॰= |
| सुवर्ण.... | १९॥ | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ८३॥ | उडीद | ५५ |
| गहू काठे | ६० | बनशी | ६७॥ |
| जवारी नवी | ४२ | चणे | ६० |
| सर्की | ४ | माठ | ४०= |
| तूप | ८॥ | तेल | ४॥।– |

सट्याचे भाव.

| | | |
|---|---|---|
| जवारी वसंत संवत | १९४७ | ४३। |
| गहू वैशाखशुद्ध | १९४७ | ५७। |
| आळशी चैत्रशुद्ध | १९४७ | ७८॥ |
| रुई फाल्गुन शु. | १९४७ | ५६।= |
| सर्की वै. नव साळाची | १९४७ | ३॥।= |

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ३ " " ८८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास..............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस .........०१

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOLXXIV — AKOLA MONDAY SEPTEMBER 22 1890 — NO37

वर्ष २४ — अकोला सोमवार तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८९० इ० — अंक ३७

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

## सार्सापारिला

हा सार्सापारिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, नसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

चापसून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्बडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदु ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकारितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गीतमराव केशव, मुंबई.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस व चंदुलाल देवलाल जात कोळी राहणार खामगांव यांस या जाहिरातीनें असें कळविलें जातें कीं जुमलाबाई नवजे रामचंद यानीं तुह्मास इतकें दिवस जनरल मुखत्यार नेमले होते परंतु कांहीं कारणावरून तुमचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे हे सर्व लोकांस व तुह्मांस कळावे ह्मणून दिली जाहिरात ता. १७ माहे सप्टेंबर सन १८९० इ० कळावें

( सही )
जुमलाबाई नवजे रामचंद राहणार खामगांव निशाणी खुद्द हातची असे.

नोटीस

नोटीस खुशाल वल्लद दवलत महाले जात कुणबी राहणार अटाळी ता० खामगांव यांस नोटीस देणार निंबाजी वल्लद चहादाजी जात कुणबी राहणार अटाळी ता० खामगांव नोटिशीनें असें कळवितो कीं तुमचा आमचा देण्याघेण्याचा व्यवहार अदमासें आज तीन चार वर्षे होता. अदमासें पंधरावीस दिवसांपूर्वीं तुमचा देण्याघेण्याचा सर्व हिशोब करून आह्मी तुमचे सर्व रुपये कवडीन कवडी आदा केले व माझे पुर्ने सर्व तुम्ही मजला दिले व रीतीप्रमाणें चुकती पावती देण्याचे कबूल करून आजपर्यंत दिली नाहीं यावरून मनांत अंदेषा उत्पन्न होतो याजकरितां नोटिशीनें असें कळवितों कीं सदरील मी तुमचें सर्व देणें दिलें व पुर्ने घेतले त्यातारख पुढें तुम्ही मजला देण्याघेण्याचें संबधानें विचारलें किंवा कांहीं तकरार वगैरे काढाल अगर तुम्ही मजशीं देववेव कराल तर त्याबद्दलचा कोणतेही प्रकारचा जबाबदार मी नाहीं. नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत चुकती पावती द्यावी. न द्याल तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावे ता. १६ माहे सप्टेंबर सन १८९० इ०

( सही )
निंबाजी वल्लद चहादाजी राहणार अटाळी निशाणी खुद्द हातची असे.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ८ शके १८१२

## ठकबाजीची कमाल

अलौकिक चातुर्य, असाधारण शौर्य इत्यादि चांगल्या गुणांवरती एखाद्या देशाचें भाग्य उदयास येतें खरें. परंतु ह्याच गुणांचा वाईट कामाकडे उपयोग केला असतां बरेंच घोटाळे उत्पन्न होतात व कधींकधीं तर मोठमोठाले अनर्थकारक परिणाम घडून येतात आमच्या सरकारास जर खरी किंमत कळली असती तर तंव्यामिलासारख्या महाप्रतापी व अत्यंत चपल मनुष्याच्याहातून ह्या स्वास्थ्यप्रिय देशांत सुद्धां मोठीं सत्कृत्यें घडलीं असतीं व बंडखोर तंव्या ह्या ऐवजीं अविक भूषणावह नावानें त्याची किर्ती कदाचित आपणास ऐकावयास मिळाली असती व त्याचप्रमाणें डावरे ह्या अडनांवाचा उच्चार कला असतां एका प्रकारचा मनांत जो तिरस्कार उत्पन्न होतो तो त्या कुळानें आपल्या अलौकिकचातुर्याचा व्यय बनावट नोटा अथवा कागद करण्याकडे जर केला नसतां तर कधीं ही झाला नसतां इतकेंच नाहींतर सत्कृत्याकडे जर त्यानीं आपल्या बुद्धीचा ओघ वळविला असतां तर कित्येक पाश्चात्त शोधकांप्रमाणें ह्याचे ही जगावर अनंत उपकार झाले असते व अजरामर कीर्त ही राहिली असती. परंतु हें व्हावें कसे !! आमचें दैव जसें आह्मांस अनकूळ आहे त्याप्रमाणें कर्मचेंही आमच्यावर पूर्ण वक्रदृष्टी कायम आहे. अभाग्याच्या हातातील सोन्याची माति होते ती हीच. असो.

पुण्यांतील बनावट नोटा करणाऱ्या डावऱ्याचे नांव बुजत चाललें होतें व लोकांस त्या नावाचा विसर पडला होता परंतु त्या कुळातील एका कुलदीपकानें खोटीं टपालाची तिकीटें चालवून तें नांव पुन्हा एकदा लोकांच्यापुढें आणलें आहे. त्याला मुंबईच्या पोलिसानें परवां पकडलें ती हकीगत मोठी मोजची आहे. पोष्टाच्या तिकिटांत कांहीं बनावट तिकिटें असतील असें कोणाच्या स्वमोंही आले नाहीं परंतु कांहीं दिवसांमागें विलायतेतील स्टांप कलेक्टरच्या पाहण्यांत एक हिंदुस्थानांतून गेलेलें बनावट तिकीट आलें व त्यानें लागलेंच ती गोष्ट पोलिसच्या कानावर घातली व तेव्हांपासून मुंबईच्या पोलिसचा गुप्त तपास सुरूं झाला. शोधा अंती एका पोरतुगीज मनुष्याजवळ त्यांस एक पोस्टाचे बनावट तिकिट सांपडलें व ज्या वेंडराकडून त्यानें तिकिट घेतलें होतें त्याचा पत्ता लागल्यावर त्यास त्याच्या सासऱ्याच्या घरी ठाण्यास पकडलें. त्यानें गिरगावांत राहणाऱ्या खंडु सखाराम नावाच्या इसमाकडून तिकिटाचा पुरवठा होतो ह्मणून सांगितलें. ह्या मनुष्याच्या घरीं पोलिसानें वेश पालटून प्रवेश केला व खंडुस पकडलें. हाच खंडु प्रसिद्ध डावरे कुळांतील एक आहे व ह्याच्यापाचपासीं बनावट तिकिटांचा सुगावा लागला. झाडा घेत असतां त्याच्या पागोट्यांत एक किल्ली सापडली. त्या किल्लीनें खोली उघडून त्या खोलींत शोध चारकाईनें धुंडाळींत असतां एक रुपयावाली दोनशें तिकिटें व तीं करण्याचें सर्व सामान ह्या जिनसा सांपडल्या आपण सांपडलों असें लक्षांत येऊन सुद्धां ह्या मनुष्याचें वर्तन अगदीं बेपरवाईचे होतें भायखळ्यावर त्यास आणल्यावर त्यानें तीं तिकिटें करण्याची कृती करून दाखविली ह्या कृत्याला लागणारी हत्यारें अवढबोबढ जरी आहेत. तरी खऱ्या टिकिटांच्यावर वरताण अशीं तिकीटें ह्या हत्यारांपासून काढण्याची रीती ह्या मनुष्यास साधली आहे व ह्यांच्यातील चुका म्यागनीफाईंग ग्लासाखेरीज [ ज्या कांचेतून कितीही लहान वस्तु असली तर फार मोठी दिसते. ] दिसत नाहींत ह्या मनुष्याजवळ एका ठोकळ्यांत बसवलेला तिकिटाचा एक दगडी छाप आहे त्यास प्रथम तो चिंचें सारखा एक पदार्थ चोळतो व नंतर त्याच्यावर एक कागद ठेवितो व छाप ठांसून व सारखा वठावा म्हणून त्यांच्या वरून शिप घासतो व त्या छापावरून काढून घेतो व एका भोंके पाडलेल्या चौकोनी तांब्याच्या तुकड्यावर ठेवतो व वाटरमार्क घातल्यावर ते तिकिट तयार होतें व खऱ्या तिकीटांपेक्षां हो त्याच्यांत अधिक सुबकपणा दिसतो.

ह्या मनुष्याची चौकशी ह्या महिन्याच्या तेवीस तारखेस होणार आहे. किती लोकांना यानें फसविलें असेल ह्याचा अंदाज लागत नाहीं निदान सात महिन्या पासून तरी हे कृत्य करण्यास त्यानें प्रारंभ केला असावा असा अजमास आहे. १८८८ च्या नोव्हेंबर महिन्यांत जर्मनीतील एक पत्रात अशा बनावट तिकिटांसंबंधी कांहीं हकीगत आली आहे त्यावरून दोन वर्षां पूर्वीं पासून ह्या मनुष्याचा अशी तिकीटें बनविण्याचा कारखाना सुरुं असावा असें वाटतें. तो पत्रकार म्हणतो कीं त्या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यांत लंडनहून त्यांच्याकडे पांच रुपयांची मुंबईच्या छापाची तिकीटें आलीं होतीं व त्या बद्दल सुमारें ६ पौंड तो तिकीट वाला मागत होता, विलायतेहून पुरवठा येण्यास उशीर लागला म्हणून मुबई सरकारास मुंबईतच हीं तिकिटें काढावीं लागलीं म्हणून नेहमींच्या तिकिटांत व ह्यांत थोडा फरक दिसतो आहे अशीही त्यानें थाप मारली परंतु त्या पत्रकारास तीं खरी न वाटून त्यानें मुंबईस व कलकत्यास ह्या संबधानें लिहिलें व इकडून ही अशा प्रकारची तिकिटें येथें छापली नाहींत म्हणून उत्तर गेलें. ह्या गोष्टीकडे नावें तसें लक्ष त्यावेळेस गेलें नाहीं, परंतु आतां मात्र हा सर्व प्रकार उघडकीस आला आहे. ह्याबद्दल मुंबईचे हुषार पोलीस खरोखर स्तुतीस पात्र आहेत.

## मि० महादेव यशवंत डोळे एम. ए. एल. सी. इ.

ज्या गृहस्थाचें थोडेंसें वृत्तनिवेदन करण्याचें आज आम्हीं योजिलें आहे त्यांचा व आमच्या इकडील वाचकांचा आम्हांस प्रथमतः थोडा परिचय करून दिला पाहिजे असें वाटल्या वरून आम्हाजवळ हल्लीं मजकुराची इतकी गर्दी झाली असतांही आम्हा मोठ्या संतोषानें ही कामगिरि बजावण्याचें योजिलें आहे डेक्कन कालेजमधून प्रतिवर्षी जे विद्यार्थी पदव्या घेऊन बाहेर पडतात त्यांत पांच सहां बदल सर्वांस विशेष गौरव वाटत असतो व त्या पांच सहा श्रेष्ट व समान गुणांच्या विद्यार्थ्यांतून प्रतिपांचपांच सहासहा वर्षांच्या मुदतींतून एकेक अतिश्रेष्ट विद्यार्थी गणला जातो. तशा अतिश्रेष्टां पैकीं रा. रा. महादेव यशवंत डोळे हे होत. सन १८७५ सालीं धुळें हायस्कूल मधून यांची प्रवेश परीक्षा पसार झाली त्यावेळीं यांचे वय सतरा वर्षांचें होतें. हे धुळ्यास १८७३ मध्यें चवथ्या म्हणजे इकडील आठव्या ईयत्तेंत येऊन बसले थोड्याच अवधींत आपश अभ्यास पुरा करून ते डेक्कन कालेज मध्यें गेले. लहानपणीं हे फार अशक्त होते व ज्यांनीं यास त्या वेळच्या स्थितींत पाहिलें आहे ते यांस त्या मानानें ते हल्लीं दिसतात असें होतील असें कोणासच वाटलें नसेल ह्यांची चपलता त्या वेळीं विलक्षण असें धांवपळ करण्यांत व नेहमीं धांदलींत काळ घालविण्यास यांना सर्व शहर पुरेसें होत नसे. मि० काणे यांनीं यांच्या गुणांची व बुद्धिमत्तेची तेहांच विशेष तारीफ केली होती. त्यांच्या शिक्षक वर्गाची ही त्यांनीं इतकीच प्रीति संपादन केली होती हें सांगणें अवश्य नाहीं.

यांचा स्वभाव फारशांत व अतिमित भाषण करणारा आहे. हा वास्तविक विरोध गुणच म्हटला तरी चालेल. यांची १८७९ सालीं बी. ए. ची परिक्षा उतरली व पुढें लवकरच कालेजमध्यें फेलोशिप मिळाली १८८१ सालीं यांना इंग्रजी, इतिहास, गणित, पदार्थ विज्ञान इतके विषय शिकवावे लागले. प्रत्येकविषय त्यांनीं इतका सुरेख शिकविला कीं त्याच वेळीं त्यांची प्रो० आपट्यांचे मागील रत्नांत गणणा झाली वर सांगितलेंच आहे कीं या रत्नमालिकेंत पांच पांच सहा सहा वर्षांनीं एकेक रत्नच कायतें गोंवलें जातें त्या प्रमाणें प्रो० वामन शिवराम आपट्यांच्या मागील निवडलेलें रत्न डोळे हेच होत. यांच्या मित भाषणा वरून त्यांना त्या वेळींच ऍडिसन हें नांव मिळालें.

इंग्रजी विद्येच्या संस्कारानें आम्ही सुधारलों असें म्हणविणारे आज आपणांस हजारों विद्वान सांपडतील—परंतु वचन भंग, असत्य भाषण, दुसऱ्यावर केलेल्या अल्प उपकाराचें मोठें निदर्शन, मिथ्याडौल, इत्यादि हजारों दुर्गुणांचा त्यांच्या मध्यें पूर्ण विकास नजरेस पडतो तसेच परोत्कर्षासहिष्णुत्व, आपल्या बरोबरीच्यांचा मत्सर व दुसरा आपश योग्यतेचा मानला जातो असें वाटल्यास त्याचा मोठ्या खुबीनें पाडाव करण्याची इच्छा थोडी फार आपणां सर्वां मध्यें अंशतः तरी आढल्या वांचून रहात नाहीं. डिकार्टें नामक तत्ववेत्यानें असें म्हटलें आहे कीं जे भाग्यवान आपणांत नसलेल्या योग्यतेचा आव घालीत नाहींत ते लाखांत तरी दोन सांपडतील किंवा नाहीं याची वानवाच आहे. आह्मांस तरी हा लेख अक्षरशः खरा गटतो. लांब कशास हवें आपल्या वऱ्हाडांतच एतद्देशीय यामध्यें फक्त दोनच गृहस्थ आपणास वरील सर्व दुर्गुणा पासून मुक्त असें अढळतील. एकतर सर्व वऱ्हाडच्या एका मोठ्या खात्याची धुरी आपणावर घेऊन बसलेले पूज्य व सन्माननीय गृहस्थ निर्दिष्ट न करतां आपल्या नजरेपुढें येणारे आहेत व दुसऱ्या बद्दलचा मोठेपणा पुढें मागें आम्ही पत्रांत वर्णन केल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु जरा अधिकार प्राप्त झाल्याबरोबर दीड वीट स्वर्ग उरून दुसऱ्याची पायमल्ली करणारे, दुसऱ्याच्या गुणावर औदासिन्य दाखविणारे फार तर काय परंतु एतद्देशीय लोकांचा तिरस्कार करणारे असेच पंडीत भारी सांपडतील. हें ही खरें आहे कीं अशीं माणसें आपल्या नजरेस पडतात ह्मणूनच आपणास वरील गुणांच्या लोकांची महत्वन्यता वाटते. वर परंपरेनें निर्दिष्ट केलेल्या दोन व्यक्ती प्रमाणेंच जर सर्व लोक होतील तर हल्लीं जें पूर्णपणाचें आमचे परिमाण आहे तें आह्मांस बदलावें लागले व जी हल्लीं काल्पनीक ईयत्ता पूर्णपणास आह्मी दिलेली आहे तिचा दर्जा आणखी जास्त वाढेल व तो असाच उत्तरोत्तर वाढणें हेंच भावी सुधारणेचे सूचक होय. देशाभिमानी मुत्सद्यास तरी देशस्थितीचा कस घेण्याचा हाच निकषग्राव होय. परंतु या विचारांनीं विषयांतर फार होईल सबब येथेंच आपण मूळ विषयापासून बहकतां कामा नये.

मि० डोळे यांची फेलोशिपची मुदत भरल्यावर सर्वांस त्यांच्या वियोगाबद्दल दुःख हो झालें व यांसच पुन्हा नेमावें ह्मणून सर्व विद्यार्थ्यांनीं अधिकाऱ्यांस अर्ज ही सह्या घेऊन तयार करण्याचें योजलें होतें पण कांहीं कारणांमुळें तसा प्रकार झाला नाहीं. नंतर सन १८८३ मध्यें एम. ए. ची परीक्षा घेऊन मि० डोळे हें पुण्याच्या कालेज आफसायन्समध्यें पठण करूं लागेल. प्रथम परीक्षेंत ते फर्स्ट क्लासांत आले व पुढील वर्षीं ऐनवेळीं नवज्वरासारख्या भावनेनें अत्यावस्थ असतां इतर हितचिंतकांच्या मर्जीविरुद्ध बरेच विषय पुरें नसतां एल, सी. इ. स गेले. अर्थातच दुसऱ्या क्लासांत पसार हो झाले पण हें फार वावगेंच झालें येथून जरा दैवदुर्विपाकासच आरंभ झाला असें ह्मटले तरी चालेल.

एल. सी. ईचा निकाल एकंदर प्रतिकूळच होऊन स्वस्थ बसले असतां सन १८८७ मध्यें त्यांची नेमणूक पुणें हायस्कुलमध्यें ८० रुपयांवर झाली नंतर त्याच वर्षीं नागपूरला त्यांस नॉर्मल स्कूलचे सुपरिंटेंडेंट नेमलें. तेथें मनरो साहेबाच्या ह्मोटिंगबादशाहींत बाह्य टापटिपेचा विशेष जय असल्यामुळें जरी मनरो साहेबांची यांजवर पूर्ण कृपा आहे तरी त्या जागेचा पगार वाढवून शिक्षण कामांतील अध्ययनामध्यें पसार झालेल्या एका मि० स्पेन्स नामक स्काच देशी याची नेमणूक करून मि० डोळे यांची एका वीट येण्यासारख्या हिंदु लोकांवर अम्मल गाजवणाऱ्या, वचनभंगांत युरोपियन लोकांच्या वर्तनक्रमाविरुद्ध आचरण करणाऱ्या क्षुद्रगोरकायस्थ इन्स्पेक्टर आफ स्कूलसच्या हाताखालीं जबलपुरास सारख्या पगारावर व त्याच अधिकारावर बदली केली आहे. जातां जातां दहाबारा दिवसां पूर्वी डोळे येथें मि० देवभानकर यांच्या घरी उतरले होते. मि० देवभानकरांनीं यांच्या परिचयाचा लाभ आम्हांस घडविला नाहीं ही खेदाची गोष्ट आहे.

या प्रसंगी एक गोष्ट लिहिणें जरूर वाटतें- डायाजीनीज हा एके समयीं भरदिवसां हातांत मशाल घेऊन चव्हाठ्याच्या रस्त्यावर वेड्या प्रमाणें कांहीं शोध करूं लागला केव्हां लोकांनीं त्यास त्याचा हेतु विचारल्यावरून त्यानें सांगितलें कीं तो मनुष्य शोधीत होता. इतकें ह्मणून तो निघून गेल्यावर अनेक तत्ववेत्यांनीं मनुष्याचा अर्थ केला. कोणी ह्मणत त्यास प्रामाणीक मनुष्य हवा होता. कोणी म्हणेत परोपकारी हवा होता. एका तत्ववेत्यानें सांगितले कीं आंबट चिंच यांतील आंबट हें विशेषण ज्या प्रमाणें शद्वविक्याचे असून अर्थपुष्टीस निरर्थक आहे त्याचप्रमाणें "प्रामाणिक" मनुष्य अगर निस्पृह" गृहस्थ अगर "परोपकारी" गृहस्थ, हीं गृहस्थाची विशेषणें होत मनुष्य याचा अर्थ गृहस्थ व त्या अर्थानें हें सर्व व आणखी जेवढे म्हणून सद्गुण आहेत हें त्याच्या ठायीं आहेत असेंच विधान केलें पाहिजे. मि० डोळे हे डायाजिनीजच्या व्याख्येंतील एक मोठें जोरदार व अक्षरशः गृहस्थ आहेत इतकें आमच्या वाचकांस सुचविलें म्हणजे पुरें आहे. डायाजिनीज याचा मनुष्य शद्वाचा गार्भितार्थ शेवटच्या तत्ववेत्याच्या अर्थास अनुगुण होता हें सांगण्याची आम्हांस अवश्यकता दिसत नाहीं.

मुंबई व मध्यप्रांतांतील विद्याखातीं विद्वान गैरकायस्थांच्या हाताखालीं आहेत खरीं पण तेथील अधिकाऱ्यांनीं सर्व सूत्रें आपल्या अक्षरशून्य कारकुनांवर सोंपविलेली असल्यामुळें मि. डोळ्यांसारखे गृहस्थ त्यांतून आपलें पाय तरी काढतात अगर एकाच जागीं कुचंबत बसतात. बी. ए. सारख्या विद्वानांस मास्तरांच्या क्लासांत पाठविण्याच्या कामीं जी परवा नुकतीच चीफ कमिशनर साहेबांनीं इस्लाप कालेजाच्या इमारतीच्या सुरुवातीच्या वेळी तारीफ केली त्यावरून त्यांच्या स्वकर्मदक्षते बदल आपण भुलून जातां कामा नये. त्यांची काम करण्याची शैली निरळ सुस्तीचा व आळसाची आहे.

या सर्व हकीकतीवरून मि० डोळे यांची सांप्रतची स्थितीही बरीच आहे असें म्हणावें लागते. परंतु आम्हांस असें समजलें आहे कीं त्यांना लवकरच ए० अ० क० ची जागा मिळणार आहे. असें झाल्यानें योग्य जागीं योग्य मनुष्य नेमल्याची आम्ही चीफ कमिशनरची तारीफ करून मि. डोळे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करूं.

---

मागेकळविल्या प्रमाणें ता० १३ रोजीं येथून राष्ट्रीय सभेचें कामाकरितां बाळापूरास मंडळी गेली होती नेहमीच्या क्रमा प्रमाणें प्रथम तालुक्यातील मुख्य गांवीं ह्मणजे, पातूर वाडेगांव, व्याळ, सस्ती, निमकर्द, पारस वगैरे ठिकाणीं प्रथम पोटसभा भरवून सर्व तालुक्याची सभा ता० १४ माहे सप्टेंबर रोजीं बाळापूरास भरावी असें ठरलें होतें. त्या प्रमाणें तालुक्यातील बहुतेक गांवहून बाळापूरास रविवारीं बरीच मंडळी आली होती एकंदर बाहेर गांवची व त्या गावांतील मिळून सुमारें ७००।८०० वर समाज जमला होता. समाजाकरितां भरपटांगणांत दोन मोठे [illegible] दिले होते. व सर्वांच्या बसण्या करितां उत्तम बिच्छाईत करून अध्यक्ष, व इतर कांहीं मंडळी करिता इंग्रजी रिवाजा प्रमाणें टेबल खुर्च्यांची सोयकेली होती. सभेचें अध्यक्षस्थान तेथील प्रसिद्ध साहु पोपट लालशेट यांनीं स्वीकारलें व त्यांच्या वतीनें प्रथम गोविंद विश्वनाथ देशपांडे यांनीं भाषण करून सभेचा उद्देश व तिची अवश्यकता थोडक्यांत कळविली. त्यानंतर रा. रा. पांडुरंग बापूजी यांनीं सभाजनाला समजेल अशा भाषेत व त्यांच्या नेहमीच्या प्रचारांतील उदहरणांनीं सभेची अवश्यकता सुमारें अर्धा तासावर भाषण करून कळविली. त्यानंतर सर्वांनी आमचें राष्ट्रीय सभेस अनुमोदन आहे असें मोठ्या आनंदानें व उत्सुकतेनें कळविलें. त्या नंतर रा. रा. शंकरगोविंद, व्यंकटराव मुधोळकर, हरीभाऊ अनवीकर, यशवंतराव हुंडीवाले वगैरे मंडळीच्या सूचनेवरून सुमारें ८० मंडळी जिल्ह्याचें सभेस पाठवावें असें ठरलें व १४ गृहस्थाची एक तालुका कमेटी या तालुक्याचें काम करण्याकरिता नेमण्यांत आली. अखेरीस रावसाहेब देवराव विनायक यांचें या सभेसी सरकारचा कसा संबंध आहे, सरकारि नोकरानीं तिच्याशी कसें वर्तन ठेविलें पाहिजे, तें त्यावरून लोकांचो गैर समज होण्याचा किती संभव आहे वगैरे बदल लोकांची चांगली समज घालून दिली. नंतर येथील सावकार मंडळींनीं देशहितार्थ झटणाऱ्या मंडळीचा, पानसुपारी, हार गजरे अतर वगैरे समयाचित गोष्टींनीं यथासांग आदर करून सभा विसर्जन झाली.

ह्या मंडळीच्या फिरण्यानें व खटपटीनें केवळ राष्ट्रीय सभेचेच मुखत्यार निवडले जातात व तिचाच उद्देश कळविला जातो असें नाहीं. तर हल्लीचे सरकार आजपर्यंत झालेल्या सरकारापेक्षां किती न्यायी आहे ते लोक कल्याणार्थ किती झिजत आहे व अतोनात पैसा खर्च करित आहे. लोकांचे त्या संबंधानें किती गैर समज आहेत व त्या पासून लोकांचें किती नुकसान होत आहे ह्या बद्दल ही मंडळी फार सुरेख रीतीनें समज घालून देतात व खरोखर आहे कीं अशा प्रकारचा क्रम जर कांहीं दिवस चालू राहिला तर शाळाखातें, | देविडाक्टरखातें | व वैद्यकी खातें ह्या संबंधानें जो लोकांचा गैर समज आहे व जी अनास्था आहे ती बरेच अंशी दुर होऊन सरकारचा हेतू सिद्धीस जाणार आहे या शिवाय ह्या मंडळीच्या फिरण्या पासून व त्यांचे त्या लोकांशीं जें वर्तन असतें त्या पासून आपलीं कामें जबरी वाचून व गांवातील मुख्यत्वे पाटीलपांडे यांच्या मदती वाचून करण्याचा एक मोठा धडा या लोकांस मिळणार आहे. तसेंच सभा म्हणजे केवळ पैसे उकळण्याचा मार्ग नसून आपल्या हिताहिताचा विचार करण्याचा एक मार्ग आहे व त्या बद्दल आपण झटलें पाहिजे अशा बद्दल त्यांची बरीच खात्री होत चालली आहे ह्या एकंदर कारणा वरून ही सभा सरकारच्या विरुद्ध आहे असें म्हणावें तरी कसें.!

The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 22, 1890.

## THE FORMAL READING OF THE INDIAN BUDGET IN PARLIAMENT.

The Budget of one of the greatest Empires in the world was read as usual in almost empty House. This year at least we had expected improved state of things so far as the discussion of the subject was concerned. But our poor country is so unfortunate that even the financial condition seems quite indifferent to the responsible members of the August House. When Sir John Gorst rose to read the Indian Budget, there were only 17 members present in the Parliament. Can any thing more disappointing and discouraging be ever imagined? Is the weal and woe of more than 250 millions of Her Majesty's subjects a matter of supreme and lordly indifference to men in Parliament- What strikes us as a painful surprise is that not a single ex-minister of the Liberal Party graced the occasion of the Indian Budget discussion by his presence. We have said above that this year at least we had expected a better treatment for the Indian Budget at the hands of the Parliament. Because our Congress delegates had evoked a considerable amount of sympathy and support among the English public, and many Liberals and Conservatives too had shown some interest to Indian affairs. But when matters come to real test, we are enabled to see how and what little one year's campaign has achieved. What serious and anxious discussion should have taken place in the almost empty house, should be rather imagined than described. Sir John Gorst, the under Secretary of State for India, who introduced the budget, made a poor speech, though his party papers tried to praise him not a little for his oratorical efforts. The manner in which he treated the important subject was indeed shallow and unsatisfactory, which showed that Sir John had anticipated what sort of audience he would get to address. He was also probably aware that the budget would not meet with any serious criticism, as no member liked Indian affairs. In this view, however, Sir John Gorst was not completely right. There was our member for India— Mr. Bradlaugh; and as long as that honorable gentleman is in Parliament he is sure to do justice to India and India's dumb millions as far as lies in his individual power. And this time too Mr. Bradlaugh did his self-imposed duty in a manner that certainly calls for genuine expressions of gratitude from the Indians. Mr. Bradlaugh discussed the budget in a truly masterly way, and some of his remarks showed the keen interest he took in Indian affairs. It is a habit with Mr. Bradlaugh that he brings to the discussion of any subject careful study and earnestness & seriousness which look like a force which an opponent can hardly mistake or ignore. Contract the convincinig and earnest speech and manner of discussion of Mr. Bradlaugh with tame speech and indifferent manner of discussion of Sir John Gorst, and you will know how to admire and appreciate the invaluable services of the member for India. To make the Indian budget discussion of any real use to this country, its introduction at an early date in the Parliament is absolutely necessary. This complaint of ours is not a new one. It has been made from year to year and for so many years, that it would appear almost superfluous to repeat it any more. But strangely and sadly the fact remains that we cannot be sure of being near accomplishing our object. We would therefore urge that our people should try to induce Parliament to have Indian budget discussed in the early part of the sessions.

## OUR SOCIAL AND RELIGIOUS REFORM.

It is more than 6 years since the interesting controversy on the dual subject of Infant Marriage and enforced widowhood was set on foot by Mr. Bahiramji M. Malbari editor of the "Indian spectator" and during the interval it has been very fully and warmly discussed by persons of various schools. Men of long experience holding different views have suggested to Government various remedies for a satisfactory solution of the question.

Mr. Y. N. Ranade of the Bombay Presidency has lately added some fuel to it by publishing a letter in the Bombay dailies anent our social reforms which drew out an able writting from the pen of the Hon. K. T. Telang who has been recently raised to the Bench Mr. Ranade's letter has a direct bearing upon the improvement of our social status. After a careful perusal of the letter it will be found that Mr. Telang is not at all justified in maintaining that because we are unable to improve our society we are unfit to move in matters political; we think Mr. Telang views the question from his own stand point of view regardless of the surrounding circumstances which ought to help in forming correct opinion. It is certainly tantamount to saying that so long as our social matters don't take any reforming character we must not take part in political movements. Does it stand to reason that our inability to move in one direction should bar our onward progress in another? Mr. Ranade has been charged with trifling with important matters such as the education of women, the elevation of their status and the improvement of their material condition. It will be seen from a minute examination of his letter that he is not deadly against these reforms but that he is an advocate of moderate reforms. It does not follow from this that he is opposed to each and every reform that is good and ultimately beneficial. Though we do not approve of some of the conclusions of Mr. Ranade we cordially concur in his view that the "Home charges" are directly connected with every progress of ours in matters political as well as social. We are inclined to say that Mr. Telang is wrong in saying that social and political reforms must go hand in hand. Now a days our social matters have assumed a different aspect. Every cool-headed person will think that the introduction of such reforms are not practicable all of a sudden. They must be initiated to the people opposing them step by step. It is acknowledged on all hands that individual opinion is slow to change and it is also acknowledged that much more is slow to change the opinion of the public. There cannot be two opinions, we believe that every innovation is received with much reluctance. Instances in point are not far to seek. It might be in the recollection of our readers that when the right of returning members to municipalities was granted a very few people thought it to be a good boon. Secondly the construction of railways and telegraphs was supposed to be the greatest impediment to our trade and commerce Thirdly the Congress movement, when started was looked upon as a source of misery and dissatisfaction. These facts, we are of opinion, clearly bear out that what we urge is justifiable.

(To be continued.)

## PLEADERS EXAMINATION.

September 1890.

Time allowed three hours

Contract and Torts.

1 The Bombay Chamber of Commerce want Government to pass an Act placing Railway consignment receipts on the same footing as bills of lading. What is the difference between the two documents in law, how would the alteration affect the liabilities of Railway Companies and the powers of consignors and consignees in dealing with the property during transit?

15 Marks

2 What are the sections of the Indian Contract Act dealing with ratification? Quote them or give their purport.

10 Marks

3 What is a sale in "market overt?" Is the law as laid down in the Contract Act the same as English law in regard to the effect of such sale in passing title in property?

10 Marks

4 "Partnership is the relation which subsists between persons who have agreed to combine their property labor or skill in some business and to share the profits thereof between them.' Criticize this definition showing to what extent it is accurate and comprehensive. What is the real test of partnership?

15 Marks

5 What is a *tort*. What ingredients does it contain. How is it distinguished from (1) a crime, and (2) a mere breach of contract. Into what classes are torts divided?

10 Marks

6 Describe and distinguish the principal kinds of torts to the person and personal rights? 10 Marks

7 What is the difference between *penal* and *liquidated* damages. How are they distinguished in English law. What does the Contract Act say on the subject?

10 Marks

8 On what principle are damages assessed. How have damages been classified. What is the law in regard to *remoteness of damage* and *contributory negligence?*

10 Marks

9 What is a common carrier. What are his duties and liabilities and what are his rights? 10 Marks.

पोंच-आपले पत्राचा स्थल संकोच्यास्तव पुढील खेपेस विचार करूं.

## बऱ्हाड

मे. कर्नल मेकंझी ज्युडि० कमि० हे दोन महिन्यांच्या रजेवर जाणार. त्यांच्या जागीं मे. आबर्ड सा. यांस, व सेशन जज्याच्या जागीं मे. इलियट सा. यांस नेमणार असें समजतें.

मि. इलीयट साहेब डे. क. यांस आफिसियटिंग सव्हिल आणि सेशन्स जज्ज नेमले.

मे. क्यापटन वार्न हेस्टिंग्ज यांस खानेसुमारीचे सुपरिंटेन्डन्ट नेमल्यावरून त्यांच्या जागीं मे. क. गनथार्प यांस नेमलें. व उमरावती पो. सु. चे जागीं मि. कुड यांसनेमलें.

गेल्या वकिलीच्या परिक्षेंत आकरा असामी पास झाले अशी बोलवा आहे.

मागील आठवड्यात कुमार श्री हरभानजी अ. क. याच्या परिश्रमाने बुलठाण्यास घोडे, उंठ, गाढव वगैरेच्या उत्तम शरयती झाल्या.

मि. गणेश बापुजी यास पहिला वर्ग म्याजिस्ट्रेटचे अधिकार मिळाले आहत

क्यापटन डेव्हीस अ. क. यांस खामगावास नेमले. त्या मुळें मि. एकनाथ मोरेश्वर व मि. दामोदर नानाजी आपआपल्या जागी परत जातील.

## नोटीस.

बलिराम आकाजी राहणार भंडारज ता. दर्यापूर यांस

खाली सही करणार याजकडुन नोटीस देण्यात येतेंकी तुम्हीं आमचे दुकानातून हांड्या १२ भाड्यांनी दर हांडीस रोज ८– प्रमाणें व झुंमर त्याजला रोज ०= प्रमाणें भाडे ठरून दररोज १३ डागाचे ॥।= आणे भाडे कबूल करून काचेचे डाग घेऊन गेले ते जेष्ट शुद्ध ९स नेऊन परत आम्हाला भाद्रपद शुद्ध २ रोजी वापस हांड्या ११ व झुंबर एक येकून बाराडाग आणून दिले त्या दिवशी भाड्याचे रुपये व एक हांडी फोडली तिची किंमत एकदोन दिवसांत देण्याचे कबूल करून त्या प्रमाणें दिलें नाहीं.

७७॥= हांड्या १२ झुंबर १ चे भाडे रुपये

७६०= व हांडीची किंमत १॥एकून ७७॥= दोंन महिने सतावित दिवसाचे भाडे.

॥= व तुमचे हूकूम नाम्यांत तुंम्हीं ॥= ज्यास्त घेतले

७८ ।।

येणेंप्रमाणें रुपये नोटीस पावल्या तारखेपासून च्यार दिवसाचे आत नोटीसीचे खर्चा सहित आमचे दुकानावर आणून देऊन आमचीरशीद ध्यावी या प्रमाणें न केल्यास यांग्ये कोर्टात दावा करून नोटीसिचे खर्चासह रकम घेतली जाईल कळावें. ता० १७.९.९०

(सही) फकरुदीन ईसफअली दस्तुर महमद अली खुद

## नोटीस.

चरंजिव रा० शिवलाल जैसीराम मारवाडी दुकान सावरगांव तालुके जळगांव यांसी खालीं सही करणार याजकडून नोटिसोनें कळविण्यांत येतें कीं, तल्हारे कोर्टांतील वकील विठ्ठल गंगाराम हे मयत झालें असून मी त्याचे कडे कोरे कागदावर असामीच्या नावाने फिर्यादि करण्या करितां कांहीं सह्या करून पाठविल्या होत्या पुढें फिर्याद नकरतां ते तसेंच त्याचे जवळ राहिले हल्लीं सदरह गृहस्थाचे कारकुनाशी सलामसलत करून ते कोरे कागद तुम्हीं घेऊन गेला असें मी ऐकिले आहे हेजर खरें असेलतर मी तुम्हास नोटीशीनें कळवितो कीं माझे नावचा एखादा नाऊ लेख करालं किंवा कांहीं चिट्ठी वगैरे लिहाल तर त्याचा जबाबदार मी होणार नाहीं. व ते कागद आठदिवसांत मजला परत आणून देऊन पावती घ्यावी. कळावे तारीख २१–९–९० इ० (सही)

रामलाल धनजी शेट दुकान सावरगांव.

## जाहिरात

मी रामलाल धनजी मारवाडी दुकान सावरगांव ता० जळगांव सर्व लोकांस कळवितो कीं मी कोरे कागदावर कांहीं भाग वर कोरा सोडून खाली सह्या केलेलें तेल्हारे येथील वकील विठ्ठल गंगाराम यांचे जवळ असलले तेथून शिवलालजीने नेले आहेत असें मी एकितो पंरतु हे खरेच असेल असें नाहीं तथापि सदहू कागदावर कोणी कांहीं मजकूर माझे नावचा लिहूंनये व असा कागद कोणाजवळ आल्यास त्यांनीं मजला खबर द्यावी त्याजला मी १० रुपये इनाम देईन कळावें तारीख २१।९।९० इ० (सही)

रामलाल धनजी शेट दुकान सावरगांव

## वर्तमानसार

निजाम हैदराबादेंत युरोपियन व मुसलमान लोकांच्यामध्यें बऱ्या प्रकारचें दळणवळण आहे असें मि. बद्रुद्दिन तयबजी यांनीं हल्लीं बोलून दाखविलें.

एक बंगाली स्त्री इंग्लंडांत मागील सांत वर्षे सारखी राहिली होती. तिचें मत असें आहे कीं इंग्लिशांची सामाजिक स्थिती चांगली नाहीं. त्यांच्या रहाण्याच्या पद्धतीनें फुकट डामडौल, व्यर्थ गर्व, व चैनीनें वागण्याचा नाद ही वाढतात असें तिचें ह्मणणें आहे.

सु० प०

चमत्कार— इंडिआना प्रांतांत वेलडन नामक शहराजवळ थोडे दिवसांपूर्वीं ग्यासाच्या भडाक्याचा मोठा चमत्कार झाला. त्या प्रांतांतून वाहत जाणारा फ्लाटराक नांवाचा एक ओढा आहे. ह्या ओढ्याजवळच एक मोठी स्मशानभूमी व त्याला लागूनच कूपर नांवाच्या मनुष्याचें एक शेत आहे. ह्या शेतकऱ्याला प्रथम गडगडाटासारखा मोठा अवाज ऐकूं आला व नंतर जमीन थरथरून लगेच भडाका उडाला. त्यानें नदीच्या दोन्ही बाजूची १० एकर जमीन उखळून पडली. जिकडे तिकडे ज्वाळा पसरल्या आणि नदींतील पाणी गरम होऊन तें कारंज्यासारखे १०।१० फूट उंच उडूं लागलें, त्या प्रमाणें पाण्यापासून १०-१५ फूट उंचीवर प्रज्वालित ग्यास पसरला! नदीचा ओघ फिरला व शेजारच्या स्मशानांत पुरलेल्या कित्येक प्रेतांचें अस्थिपंजर वर आले!

गायकवाड महाराजांजवळ जी एक सत्रंजी आहे तेवढी किंमतवान सत्रंजी फारच थोड्यांजवळ असेल, असें एक इंग्रजी पत्र ह्मणतें:- ही तयार करण्यास सुमारें तीन वर्षें लागलीं, व खर्च ४०००० पौंड लागला ही मोत्यांच्या सरांची विणलेली आहे, व हिच्या चाऱ्ही कोपऱ्यावर हिरे आहेत.

कल्याणानजिक अंबरनाथ नांवाच्या गांवामध्यें जमशेटजी खर्सेटजी कल्याणवाला ह्यास गेल्या रविवारीं भयंकर खून करण्यांत आला. हा जमशेटजी सदरहु दिवशीं अंबरनाथ गांवीं आपल्या शेतजमिनीची देखरेख करण्याकरितां एका हिंदु चाकरास बरोबर घेऊन गेला होता. तेथें त्याचा व गावांतील लोकांचा कांहीं तंटा झाला. व त्यावरून त्यांनीं त्या उभयतांस गराडा घालून मरेपर्यंत मार दिला. मयत जमशेटजी ह्यांचा व गांवकऱ्यांचा पुष्कळ वर्षे कांहीं जमिनीच्या संबंधानें तंटा होता असें ह्मणतात. हल्लीं खटला घोड्या गांवकऱ्यांवर चालूं आहे.

दी. बं.

अशिरगड किल्ला

हा किल्ला बऱ्हाणपुराजवळ ईशान्येस १४ मैलावर आहे. हा बांधून एकहजार वर्षे झालीं म्हणतात. असानांवच्या आहिरानें बांधला हा सातपुड्याच्या डोंगरावर आहे. याची उंची ८५० फूट आहे किल्याच्या दरवाज्यावर अवरंगजेबानें दक्षिण हिंदुस्थानांत स्वारी करतांना जिंकल्याचा लेख लिहिला आहे. वरील भागास माऱ्याच्या जागा अवघ्यालायक आहेत. या किल्यावर भुयारवाटा फार आहेत. येथील बहुतेक तोफा इंग्रजसरकारानें पळविल्या, अद्याप पंचरशी गणेश तोफ कायम आहे. हिच्या मागील भागांत गणपतीचें चित्र आहे. ही जरी सन १००९ मध्यें बऱ्हाणपुरांत आरन उमर महंमद यानें ओतली, त्यांस सुमारें ३०० वर्षे होऊन गेलीं. हिची लांबी १४ फूट [illegible] इंच आहे व्यास १ फूट ९ इंच आहे. येथें अश्वत्थाम्याचें स्थान आहे. देवळाच्या दक्षिणेस ७३ फूट लांब व ९० फूट रुंद विहीर आहे. विहिरींत ७ दरवाजे आहेत. त्यांतून किल्याखालीं उतरण्यास रस्ते आहेत. त्यावर पाहारा आहे. किल्यावर जलालुद्दीन अकबरानें एक मशीद बांधली आहे.

—दिवसें दिवस रुप्याचा भाव वाढत आहे.

फ्रान्स आणि इटली यांमध्यें बारावा चंद्र आला आहे.

रशियाचे वडील चिरंजीव हिंदुस्थानची मुषाफरी करण्यासाठीं ता० १३ अक्टोबर रोजीं निघणार. आणी टर्कीच्या सुलतानाचा समाचार घेऊन बरोबर त्यांचे बंधु ग्रयांड ड्यूक ज्यार्ज हे ही देश पाहण्याच्या बुद्धीनें येणार ह्मणतात.

म० मि०

नामदार जस्टिस तेलंग—ता० १० मिनहु पासून मुंबई हायकोर्टाचें नें फौजदारी सेशन सुरू झालें त्याचे जज्ज जस्टिस तेलंग आहेत. जस्टिस नाना भाई हरीदास हे हायकोर्टाचे जज्ज बरींच वर्षे होते, पण फौजदारी सेशनचें काम एकदांही त्यांनीं केलें नव्हतें, आणि आतां जस्टिस तेलंग यांस सेशनची परवानगी मिळाली हें काय गूढ असेल तें रामजाणे. ह्या फौजदारी सेशनांत युरोपियनचा खटला नाहीं म्हणून तर जस्टिस तेलंग यांस सेशनची परवानगी मिळाली नसेलना असा उगीच संशय मनांत येतो जस्टिस तेलंग यानीं पगार युरोपियन जज्ज प्रमाणें द्यावा वगैरे कित्येक अटी कबूल करून घेतल्या नंतर हायकोर्ट जज्जाची जागा पतकरली अशी बातमी पसरली होती ती खरी असल्यास सेशनला बसण्याची एक अट त्यांत कदाचित असेल आणि म्हणूनच सेशनला बसण्याची परवानगी त्यांस मिळाली असावी असें वाटतें खरा प्रकार काय असेल तो राम जाणे.

बायकांचा अर्ज.— हिंदुस्थानांत नवऱ्यानें १३ वर्षे संपल्या शिवाय बायकोशी समागम करूं नये असा एक अर्ज बंगाल्यांतील विद्वान बाया बादशाहिणी कडे करीत आहेत त्या अर्जावर हजारोंहजार सह्या होत आहेत. वजनदार युरोपियन बाया ही त्यावर सह्या करून आपले पूर्ण पाठबळ त्या अर्जास देत आहेत असें समजतें.

शु० सू०

स्त्रीशिक्षणावार मि. ग्लाडस्टन यांचा ही अभिप्राय बरासा नाहीं. आमच्या सुधारकांच्या शाळेंत म्हाताऱ्यानें चार दिवस काढल्यावांचून त्याला शाहाणपण कोठें येणार? शहाणे काय ते सुधारक!

✓स्त्रीप्रतिनिधी— राष्ट्रीय सभे तर्फे इंग्लंडांत व्याख्यान देण्या करितां, व विशेष करून इंग्रज स्त्रियांची मतें, राष्ट्रीय सभेचे मागण्यानां अनुकूळ करून घेण्या करितां, येत्या सालीं कलकत्या कडून कांहीं विद्वान बंगाली स्त्रिया इंग्लडाला जाणार आहेत असें कळते.

धा० बृ०

✓निझामच्या राज्यांतील एका नेटीव पोष्टमास्तर जनरलास लवकरच पेन्शन देणार असून त्याच्या जागीं हुशार युरोपियन नेमण्यात येणार आहे. मुसलमान लोक या कामास अगदींच नालायक आहेत असें निझाम सरकारही म्हणू लागलें!!

पोर्तुगालच्या राणीचा एक रत्न खचित हार शिकंदराबादच्या एका कंपनीनें विकत आणविला आहे. याची किंमत ६ पासून ८ लाख पर्यंत आहे.

मुंबई व कराची येथें ठेवण्याकरतां दोन ठारपेडो विलायतेहून रवाना झाल्या.

तारीख २७ सप्टेंबर पासून विलायतची डांक शुक्रवारीं न जातां शनिवारीं जाईल.

मुंबईचे पोष्टमास्तर सर्वांस कळवितात कीं नेटिव स्टांप वेंडर (तिकिटें वगैरे विकणारे लोक यांजकडून १ रुपया किंमतीची पुष्कळ बनावट तिकिटें लोकांस अलिकडे विकण्यांत आली आहेत असें दिसून आलें आहे सबब सर्व लोकांस अशी सूचना करण्यांत येत आहे कीं एक रुपया किंमतीचीं तिकिटें घेतेवेळीं व ती लखोट्यावर वगैरे चिकटवितेवेळीं फार बारकाईनें तपासीत जावीं. एक रुपया किंमतीची तिकिटें फक्त पोस्ट आफिसांतुनच विकत घ्यावी अशी शिफारस करण्यांत येत आहे.

पारिस येथील एका डाक्टरानें एका मुलावर फारच विलक्षण तऱ्हेचा शस्त्रप्रयोग केला. एक चार वर्षांची मुलगी होती, तीस बोलता चालतां येत नव्हतें एवढेंच नव्हे तर तिचे स्पर्शेंद्रिय व नेत्रेंद्रियही मुळींच जागृत नव्हतीं, या डाक्टरानें या मुलीचें डोक्याचे पाठीमागचें हाड वांकडे असल्याकारणानें हिच्या मेंदुची वृद्धि जशी व्हावयास पाहिजे तशी होत नाहीं. ह्मणून हिच्या बाकीच्या सर्व अवयवास अशी बधिरता आली आहे. या चिकित्सेप्रमाणें त्यानें तें तिचें हाड नीट बसविल्यावर कांहीं दिवसानीं तिच्या सर्व इंद्रियाचे व्यापार सुरू झाले.

सुमारें २-३ महिने झालें, सोलापुरच्या गिरणीच्या एंजिनमध्यें कांहीं बिघाड झाला होता. तो काय झाला हें तेथील इंजिनियरच्या तर लक्षांत येईनाच, पण मुंबईहून फर्स्ट क्लास सर्टिफिकीटचे युरोपियन कन्सल्टिंग इंजिनियर मुद्दाम बोलावून आणले असतां त्यांनींही हात टेकले. अखेर बडोदा मिलचे नेटिव इंजिनियर मि. मोतीचंद भगवानदास जे पूर्वीं या गिरणींत इंजिनियर होते, परंतु विन सर्टिफिकीटचे इंजिनियर ठेऊं नयेत ह्मणून सरकारानें कायदा केल्यामुळें ज्यांस रजा देणें भाग पडलें, त्यांना बोलावल्यावरून ते २ दिवसांची सवड करून उभाउभा आले व लागलीच इंजिन पहिल्या प्रमाणें दुरुस्त करून परत चालते झाले. यावरून मि. मोतीचंद यांना जरी सार्टिफिकीट मिळालेलें नाहीं, तरी ते एंजिनियरिंगच्या कामांत किती हुषार व वाकबगार आहेत हे चांगलें कळून येईल. फर्स्ट क्लास सर्टिफिकिटच्या विद्वान युरोपियन इंजिनियराची सुद्धां जेथें कुंठित झाली तें काम मि. मोतीचंदजींनी सहजासहजीं केलें हें ऐकून वरील इंजिनियरनां आतां काय वाटेल हें सांगावयास नकोच.

ट्रानी नावाच्या दक्षिण इतालि प्रांतांत चोऱ्या, दरोडे, बायकांची इजत घेणाऱ्या ११५ सभा गुपचुप स्थापन झाल्या आहेत.

विलायतच्या सैन्यांत भर घालण्याची तयारी चालली आहे यंदा ३० हजार नवे लोक ठेवण्यांत येणार आहेत पण हा चाकरी करण्यास कोणीच मिळत नाहीं असें तिकडचा पत्रकर्ता ह्मणतो आह्मी इकडे रडतो चाकरीसाठीं आणि तुह्मी तिकडे रडा चाकरी नको ह्मणू!

कलादगी जवळ हिऱ्यांचा शोध:— मि. मोर नांवाचे युरोपियन गृहस्थ कलादगी येथें ६ महिन्यापासून राहिले आहेत. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, कलादगी पासून एक मैलावरील मदापूर गांवांतील पुरातन मारुतीच्या देवालयानजीकच्या पाडाडांत व देवालयाचे आसपास हिरे सांपडतात. वरील युरोपियन ग्रहस्थ सदर डोंगरांत प्रतिदिवशी शोधण्याकरितां जात असतात. त्यांणीं शोधून आणलेले बरेच शुभ्र, तांबडे, अस्मानी, पिवळे वगैरे जातींचे दगड पेटींत मोहरबंद करून ठेवलेले लोकांस दाखविले, परंतु व्हावी तशी परीक्षा झाली नाहीं. सदरील दगड ते विलायतेस पाठविणार आहेत.

फ्रान्सदेशाला ६२० कोटी डालर आज कर्ज असून तें प्रतिवर्षी १० कोटी डॉलर्सनीं वाढते आहे वरील ६२० कोटी डालर एकावर एक ठेऊन यांची एक चळथ केली तर ती अकाशांत १ लाख मैल उंच जाईल व हें सर्व डॉलर प्रत्येक सेकंदला एक ह्या मनानें मोजीत बसलें तर ती सर्व कर्जाची रकम मोजण्यास दोनशें वर्षे लागतील; पृथ्वीच्या पाठीवर फ्रांसदेशाइतकें कर्ज कोणत्याही देशाला नाहीं.

क० त०

अमेरिकेंत— एका स्त्रीस एक चमत्कारिक आकृतीचें मूल झालें आहे. त्याच्या डोक्यास पुढल्या आंगास अशीं दोन तोंडें आहेत ह्या पैकीं एक तोंड रडत असतें तरी दुसरें तोंड खुशाल हंसते. दोन्ही तोंड मिळून घशाची नळी एकच आहे त्या मुलास हात एकच आहे. पण पाय तीन आहेत. दोन पुढचें आंगास आणि तिसरा पाय मागें शेपटी सारखा आहे. हें मूल जिवंत आहे असें ह्मणतात.

न्या० सिं०


## साहेबवॉचातलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल


## अकोलें बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी १००।
" १५ दिवसाच्या मुदतीची १००=
सुवर्ण.... १९॥ रुपें १०८
आळशी खंडीस ८४॥ उडीद ६०
गहूं काठे ६१। बनशी ६७॥
जवारि ४० चणे ६६।
सर्की ४८— मठ ४८=
तुप ९॥ तेल ४८॥।=

सध्याचे भाव

जगरी वसंत संवत १९४७ ४४॥।
गहू वैशाखशुद्ध १९४७ ५८॥।—
आळशी चैत्रशुद्ध १९४७ ७१।
रुई फाल्गुन शु. १९४७ ५७।
सर्की व. नवे सालाची १९४७ ४८=

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ३ " " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस .........०१

Per annum in arrears
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisemehts
Belo w 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXIV AKOLA MONDAY SEPTEMBER 29 1890 NO38

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख २९ माहे सप्टेंबर सन १८९० इ० अंक ३८

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

### सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

### गोळ्या.

ज्यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदू ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा


### कल्प

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला म्हणजे पुरें आहे. याने सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गौतमराव केशव, मुंबई.

### सचित्रकॅटलाग



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

### जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं मी व ऱ्हाडसमाचारचा अंक ६ तारीख १०-२-९० इसवीमध्यें जी तारीख ५-२-९० इसवीची जाहिरात दिली आहे त्यांत सात ७ नोटा गेल्या ह्मणून लिहिलें आहे सात ७ नोटांचेच नंबर दिलें गेलें आहेत त्याठिकाणीं आठ नोटा गेल्या असे पाहिजे होते चुकीनें एका नोटीचा नंबर आजपर्यंत राहून गेला आहे. तो खालीं लिहिले प्रमाणें. $\frac{S}{56}$ ०९६९९ मुंबईची ता० १९-३-८७ रुपये ९० ची सदरहु नंबरची नोट व ता० १०-२-९० इसवीचे अंकांत दिलेल्या नंबरच्या नोटा कोणाचे दृष्टीस पडल्यास मेहरबानगी करून अडकून ठेवून पोलिसचे स्वाधीन करावे व मजला कळवावें अशी विनंती आहे तारीख २६ माहे सप्टेंबर सन १८९० इ०

( सही )
श्रीनिवास रामचंद्र कोर्डे
राहणार अकोलें वऱ्हाड

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य १ शके १८१२

## कानपूर येथील एका कांग्रेसवाल्या वकिलाचा खुनाचा प्रयत्न.

राष्ट्रीय सभेतील मंडळीवर किती जबाबदारी आहे व त्यांनीं हातीं धरलेलें काम किती महत्वाचें व धोक्याचें आहे हें खालीं लिहिलेले हकीकतीवरून कळून येइल. कानपूर येथें पंडित हिरदया नारायण या नांवाचे प्रसिद्ध वकील राहत आहेत ते तेथील माजिस्ट्रेट साहेब मि० राईट यांचे कांग्रेस संबधानें विरुद्ध मत असले संबधानें नेहमीं उघडपणें त्याच्यावर वर्तमान पत्रांतून टिका करीत असत त्यामुळें उभयतांमध्यें वैमनस्य साहजिकच उत्पन्न झालें व ह्या वैमनस्यामुळेंच पंडित साहेबांचा मारेकऱ्याचे हातून खून करण्याबद्दल ठरलें होतें असें तेथील अर्जदारांनीं ह्या प्रकरणा संबधानें जो अर्ज केला आहे त्यावरून समजतें पंडित साहेबाचा खून करावा या हेतूनें मारेकऱ्यांनीं त्यांच्यावर हल्ला केला परंतु सुदैवेकरून त्यांत त्यांची कत्तल उडली नाहीं. तरी सदरहूबद्दल इतला देण्याकरितां व अशा अघोर कृत्याची चौकशी होण्याकरितां तेथील पोलीस सुपरिंटेंडेंट व माजिस्ट्रेट साहेब यांनीं यांत हात घालण्याचें नाकारलें त्यावेळेस तेथील सर्व वकील लोकांनीं सदरहु मुकदमा आपल्या फैलावर घेऊन चौकशी करण्याकरितां त्यांची प्रार्थना केली परंतु माजिस्ट्रेट साहेबांनीं असा हुकूम दिला कीं सदरहु मुकदम्यांत कांहीं तथ्य आहे किंवा नाहीं व गुन्हेगार कोण आहे याची पक्की चवकशी झाल्याशिवाय आह्मी यांत हात घालूं शकत नाहीं येणें प्रमाणें तिकडे व्यवस्था झाल्यामुळें तेथील लोकांनीं सर आकलंड कालविन कडे एक मेमोरियल ( अर्ज ) पाठविला त्यावर त्यांनीं असा जबाब दिला कीं तेथील कोर्टांत योग्य दाद मिळेल. अर्जदार लोकांचें असें ह्मणणें आहे कीं कानपूर येथील पोलिसचा ह्या कृत्यांत संबंध असल्यामुळें व त्यांच्याच ह्मणण्यावरून एका बदमाष मनुष्यानें हें अघोर कृत्य करण्याचें पतकरल्यामुळें तेथील कोर्टांत त्यांना योग्य दाद मिळावयाची नाहीं तर ह्या कामाकरितां एखादें कमिशन नेमिलें जावें परंतु ह्या त्याच्या सर्व ह्मणण्यास नकार मिळाल्यामुळें त्यांना गव्हरमेंट आफ इंडियाकडे जाणें भाग आहे. यावरील हकीकतीवरून कानपूर येथील पोलीस माजिस्ट्रेट व सर आकलंड कालविन साहेब यांचे करणें किती न्यायाचें व इंग्लिश राजनीतीस शोभणारें आहे दिसून येईल. इंग्लिश अमलामध्यें एखाद्या क्षुल्लक मनुष्याची सुद्धां एखादे क्षुल्लक गोष्टीबद्दल देखील वाटेल त्या कोर्टांत दाद लागते परंतु पंडित साहेबासारख्यांची जिवावरच्या प्रकरणांत सुद्धां दाद लागूं नये हें मोठें आश्चर्य आहे!!! माजिस्ट्रेट साहेबांनीं व सुपरिंटेंडेंट साहेबांनीं ह्या प्रकरणांत हात न घालण्याचें जें कारण सांगितलें आहे तें अगदीं क्षुल्लक आहे परंतु खुनासारख्या प्रकरणामध्यें सुद्धां त्या कारणास इतकें महत्व दिलें जावें याचें कारण पंडित साहेब हाजी हाजी करणाऱ्या पैकीं नसून विद्वान व आपल्या कर्तबगारीनें वाढलेले व कांग्रेसवाले आहेत ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. इतिहासवरून आपण नेहमीं वाचतों कीं राजकीय सुधारणा कांहीं सोप्या नाहींत. त्यामध्यें कित्येकांचो प्राणहानी झालीच पाहिजे व तेंच आज आपल्या प्रत्ययास येऊं पाहत आहे. व तसें होणें इष्टही आहे. सुसाध्य वस्तूची किंमत फार थोडी असते. तीच कष्ट साध्य वस्तूची अगदीं त्याच्या उलट असते परंतु एखादी वस्तु मिळण्यास जितके श्रम जास्त लागतात तितकी तिची किंमत जास्त वाढते. अशा प्रकारचे परिणाम होतील असें कांग्रेसची मंडळी जाणून आहे. व केवळ इतक्यावरूनच कांग्रेस बंद होईल किंवा तिचा कोणी पक्ष घेणार नाहीं असें कोणी समजूं नये कांग्रेस संबधानें जसें इतर प्रातांतील कांहीं अंमलदार विरुद्ध आहेत तसेंच आमचे कडे ही नाहींत असें नाहीं व थोड्याच दिवसांनीं त्यांच्या विरुद्धपणाबद्दल उघडपणें आम्हास आमच्या पत्रांत त्यांना जागा द्यावी लागेल व अशा प्रकारची कांहीं उदाहरणें झाल्याशिवाय कित्येक सरकारी नोकर जो आतून आतून आपल्या अधिकाराच्या नात्यानें खटपट करीत आहेत. याचा खरा हेतु काय आहे हें समजणार नाहीं व सेक्रेटरीचा व त्याचप्रमाणें सरकारचा या सभेशीं कोणते प्रकारचा संबंध आहे हें ही समजणार नाहीं.

### अखेरची भेट

यापूर्वीं शेटजीबद्दल आह्मी लिहिलेला लेख बऱ्याच वाचकांस रुचला नाहींसे दिसतें. कारण या खेपेस आह्मांकडे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रीतीनें शेटजींची तरफदारी करणारी टपालांतून व ग्रामस्थ नौकरामार्फत आमच्या लेखाविरुद्ध पत्रें आलीं आहेत प्रतिपक्षांचीं पत्रें न छापतां आमचे मनोगत विचार कळविणें या प्रसंगीं इष्ट आहे असें वाटतें. गेलेवर्षीं आमच्या पारशी बंधूस आमचे साहेबाच्या टिपणामुळें ज्या मिरच्या झोंबल्या होत्या व नंतर त्यांनीं मुंबईस सभा भरून माजि गव्हरनर लार्ड रे यांच्याजवळ जी दाद मागितली त्या गोष्टीचा विसर आमच्या वाचकांस पडला नसेलच. सुमारें एक वर्षांपूर्वीं हिंदूलोकांत रानटी ह्मणण्याच्या कामांत व मुंबईस आपला नष्ट झालेला मान परत मिळविण्याच्या कामांत ज्या पारशी बांधवांनीं हिंदूच्या अंतःकरणांत वाग्बाण मारिले त्यांतच शेटजी ही होते असा पुष्कळांचा ग्रह आहे. हें जर खरें असले तर शेटजीनीं आपलें तनमनधन. ही आमची सामाजिक स्थिती सुधारण्याकरितां इतक्या निःस्सीम परोपकार बुद्धीनें कां अर्पण करावी याचें आम्हांस मोठें गूढ पडलें आहे. शेटजीचा उद्योग घटकाभर स्तुत्य आहे असें जरी धरिलें तरी त्यांच्या प्रेमाबद्दल आह्मांस पूर्ण संशय आहे. निव्वळ उपपदधारी सुधारकांनीं आपला उत्कर्ष होण्याकरितां दुसऱ्याचा उपमर्द करून येथेंच मनगट प्रलाप करून सुधारणचा बोजा आपल्या शिरावर घेणें लहानशा आपल्या नवग्रहांच्या मंडळींत दोन निकराचें संग्राम करावें हें जितकें अश्लाघ्य व उद्यम होय तितकेंच आमच्या शेटजीचें आचरण आह्मांस वाटतें.

मागील लेख आम्ही हातीं घेण्यापूर्वीं ज्याप्रमाणें मृताबद्दल वाईट बोलणें व्यर्थ त्या

प्रमाणेंच समुद्रा पलिकडे गेलेल्या हद्दपार मनुष्याबद्दलही बोलणें भ्रममूलक असें समजून बेताबातानेंच लिहिलें. परंतु सुधारक व दुधारकादि बंधूनी शेटजींचे मूर्तीपूजेचें बंड मोडल्यामुळें सुन्या पडलेल्या देव्हाऱ्यांतून मलबारी शेटजींच्या परोपकार बुद्धीबद्दल इंग्लिश लेदरच्या पादुका मांडून पूजनाचा उपदेश सपाट्यानें व मोठ्या आवेशानें सुरू केल्यामुळें आह्मांस लोकांच्या नेत्रांत थोडेंसें अंजन घालावें लागलें तें जरा झोंबलें असेल परंतु परिणामी सुखकर होऊन दृष्टी साफ करील तर आमचें कर्तव्य आम्हीं बजावलेंसें होईल. मलबारी शेटजींनीं जरी केवळ अवसान घातकीपणाच दाखविला नाहीं तरी प्रसिद्ध होऊं पहाणाऱ्या युनिव्हरसिटी क्युरिक्युलमच्या वादोत्पादकाप्रमाणें मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या व धुरीधरांच्या साहायानें कांहीं दिवस केवढा गिल्ला केला व पुढें किती सामसूम झालें याचा वाचकांनींच विचार करावा. आमची सुधारणा होणें जरूर आहे. परंतु ती धुरीवारण करण्यास ज्या प्रकारचे प्रवर्तक पाहिजेत त्या प्रकारचा आमच्यांत एकही अद्याप झालेला नाहीं. जे आहेत ते स्वार्थ परायण पटू असून मोठ्या आवांत आपला फायदा करून घेण्यांतच दक्ष आहेत. स्वदेश प्रीतीकरतां अगर स्वमनोगत सुधारणेकरतां ज्यांनीं आपलें आयुष्यें अग्नीस आहुत केली व ज्यांचा मनोगत हेतु कांहीं पुढील शतका पर्यंत जरी सिद्धीस गेला नाहीं तरी न खचतां धीरानें व नेटानें लोकमताविरुद्ध झगडा करणारे ते कोणीकडे. व आमचे इंग्रजी विद्येनें बनलेले वेदशास्त्र संपन्न सुधारकाचार्य कोणीकडे. नुकतेंच महिन्यापूर्वीं पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या आनररी सेक्रेटरीच्या नेमणुकीच्या वेळीं अधिकारार्थ व येनकेन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषोभवेत या तत्वानें बंडाळी माजवणाऱ्या गृहस्थासाठीं कोण हमरातुमरी व पोरकटपणा झाला याची ज्यास आठवण असेल ते पुरें जाणत असतील कीं शिक्षकांस ज्याप्रमाणें नीतीची अवश्यकता आहे अगर वैद्यास ज्याप्रमाणें आस्थेची अवश्यकता आहे अगर अधिकारी जनांस ज्या प्रमाणें दयेची अवश्यकता आहे त्याचप्रमाणें सामाजीक स्थिती सुधारकांस स्वनिर्मलतेची जरूरी आहे. अनेक समयीं हेतु स्तुत्य असून उपायांनीं त्यावर कालिमा आलेला आहे. उपाय जर नीट असतील व हेतुनुरूप निकाल होत असेल तर यशप्राप्ती कालवच्छेदें करून होईल तद्वतच स्थिती पुढाऱ्यांच्या संबंधाची आहे.

ज्यावेळीं देशाची सीमा मनांत आणावयाची तेव्हां काल्पनीक सीमा रावणाच्या लंके पासून तों थेट हिमालयाच्या शिखरा पर्यंत ती धरून विशेष व्यक्ति म्हणजे मात्र प्रसंग विशेषीं आपल्या आडदंडपणानें प्रसिद्ध झालेली आपल्याच भोंवतीं प्रकाश पाडून घेणारी आणावयाची आपल्याच जातीचा अभिमान बाळगावयाचा इत्यादि निंद्य मार्गावलंबन करण्याकडे आमची प्रवृत्ति बिलकूल नाहीं. गोमातेच्या रक्षणास आमची पूर्ण जरी नाहीं तरी सांप्रत जों पर्यंत देशांत गायरान बरेंच आहे व चाऱ्याचीं कुरणें लागवडीच्या जमिनीशीं स्पर्धा करीत नाहींत तों वर आमची पूर्ण संमति आहे. परंतु चौकशी अंतीं स्वामी महाराजांची काठेवाडची मोहीम बरीच संभवनीयशी वाटल्या वरून व त्यांनीं जे आमच्या कल्पनेस अनुगुणतें म्हैसूर संस्थानीं आचरण केलें त्या वरून सुधारकांच्या निर्भलते बद्दल जी आम्हास वारंवार शंका उत्पन्न होते तीच दृढ होऊन जाते. शेटजीची देशप्रीति व आस्था या दोहोंसही जों पर्यंत प्रतिकूळ असाच सर्व आधार सांपडतो तों पर्यंत शेटजीच ते, त्यांच्या बद्दल आम्हास संशय कां वाटूनये बरें! बाकी पारशी लोकजर खरोखर आमची कळकळ बाळगतील व आमच्या सर्व सम आणि विषम स्थितींचे भागीदार होतील तर आम्हांस त्यात आनंदच आहे तशांतून आमच्याहून शहाणे म्हणून केवळ आमच्या हिता करतां आमच्या देशावर राज्य करण्याच्या मिषानें आम्हांस नि:सत्व करून टाकणाऱ्या स्वार्थ दृष्टी राजकर्त्या प्रमाणेंच जों पर्यंत शेटजी ही आहेत तों पर्यंत आम्हांस त्यांच्या बद्दल संशय वाटणें रास्त आहे असें कोणासही कबूल केलें पाहिजे.

आम्ही हल्लींच्या वादग्रस्त विषयांवर वारंवर आपलें मत दर्शित केलेंच आहे स्त्रीस्वातंत्र्याची आम्हांसही जरूर वाटते. पण मार्ग मात्र वेगळे आहेत ती दिशाही वेगळीच आहे—इंग्लंडांत शेटजी गेले काय अगर वर आईसलंड बेटांत गेले काय, प्रतिपक्ष्यांना त्यांनी यथेच्छ गाली प्रदान केलें काय अगर त्यांची याहून जास्त संभावना केली काय, सुधारणेचे मार्ग हे नव्हत—एक वैतागलेला वैतागूनच केसरींत लिहितों कीं मी जन्मलों नसतों तर बरें झालें असतें—केसरीच्या एडिटरांच्या ठिकाणीं कितीही जरी आमचा बहुमान असला तरी त्यांनीं वैतागलेल्यास पलिस्तर मारून शुद्धीवर आणलें नाहीं या बद्दल आम्हांस फार दिलगिरी वाटते— प्रेम, धैर्य, आशा, व दृढ निश्चय ह्या सद्गुणांच्या योगानें जें करणें तें झालें पाहिजे सत्याचा अगर सद्गुणाचा जय होण्यास अवलिगते—हल्लीं त्या गुणांना समरांगणांत येऊन हजारों वर्षांच्या लोकमताविरुद्ध विरोधी गुणांबरोबर संग्राम करणें आहे— अखेर जय कोणाचा आहे हें आपणास अनुमित करतां येतेंच आहे--व फार जलद जय होईलतर तो आकस्मिक जय उपयोगीही नाहीं हर्बर्ट स्पेन्सर व जेन आस्टिन आणि मिल वाचणाऱ्या वैतागलेल्यास पुस्तकांच्या कर्त्यांच्या नांवा पलिकडे कांहीं माहित नसावेंसें दिसतें व असेलच तर वैतागलेल्यानें वैतागल्या नंतरही पुस्तकें वाचलीं आसावींत म्हणून यावर त्यांचा कांहींच ग्रह झाला नाहीं—हें विषयांतर आहे- परंतु मुख्य मुद्दा हा कीं शेटजींनीं इंग्लंडची मोहीम कारणें रास्त नव्हती. इंग्लंडांत लोकमत त्यांच्या सारख्या कोत्या माहितीच्या गृहस्थानें करण्या पेक्षां आमची माहिती ज्यास जास्त आहे अशानें केल्यास बरें. पुन्हा शेटजींच्यावर त्यांच्या जातीज्ञ हिंदु लोकांच्या अडाणीपणाबद्दल अत्युक्त कांहीं गुण आहेतच. इतक्या सामुग्रीच्या गृहस्थानें आमची तरफदारी करण्याचें कारण नाहीं. स्वदेशीं चोरी व परदेशी भिक्षा याप्रमाणें शेटजी येथें थकून तिकडे गेले असें ही नाहीं. केवळ स्वहिताकरतां गेलेले असून त्यांत येथल्या प्रमाणेंच तेथेंही थोरपणा मिळेल तर पहावा हाच हेतु. म्हणूनच मोठा धाक वाटतो तो हा कीं आमच्या राजनीतीपणाची हाकाटी एकीकडे व प्रतिनिधिक्षिप्त अधिकाराची व निवडणुकीच्या राजकीय अधिकाराची चळवळ त्याच देशांत एकीकडे एकवार इंग्लंडची थोरवी व एकवार त्याच देशावर हुचमली याप्रमाणें प्रकार आमचे हातून घडणें अयोग्य आहे.

या प्रमाणें विसंवादित आचरण आमचें नसावें. पुण्याचे सुधारक उपपदधारी आहेत खरें व बाहेरील पत्रकर्त्यांचे चालक तसें नाहींत हेंही आम्हांस कबूल आहे परंतु सुधारणेचा धूर नेत्रांत शिरून आतां त्यांचे डोकें बहुतेक फिरून गेलें आहे. यांच्या अचाट विद्वत्तेस व हजारों व्यवसाय करण्याच्या कामाच्या समांतर कुशलतेस जीं दोन तत्वें आह्मांस माहीत आहेत ती त्यांस माहीत नाहींत असें दिसतें. इंग्लंडच्या लोकांच्या मनांत हें पुरें बिंबलेलें आहे कीं मानसिक शक्ती शारिरिक शक्तीवर अवलंबून असते व अगोदर शारिरिक शक्तीचा प्रादुर्भाव झाला पाहिजे तसेंच आधीं सामाजिक सुधारणा व मागाहून राजकीय सुधारणा. हीं तत्वें आमच्या राजकर्त्यांच्या मनांत पूर्ण बिंबलेलीं आहेत. दोन गोष्टींचें बरोबर प्रदर्शन मांडणें व क्षुल्लक गोष्टींत देखील आपल्या देशबांधवांची मनें वळविण्यांत आमचे बंधु समर्थ नसणें व ज्यांना आमचा द्वेष करणें हेंच आंगचें शिक्षण आहे अशा लोकांनीं आमची तरफदारी करणें हें आह्मांस लांछनास्पद आहे. तसेंच हे लोक आमचा अडाणीपणाच जास्त रंगवून अपरोक्ष रीतीनें आमच्या जिवावर आपलीच चैन करितात. एवंच असे पुढारी आम्हास नकोत. व पुन्हा आम्ही आपली लेखणी परदेशस्थ शेटजीबद्दल लिहून विटाळणारही नाहीं. म्हणून च हिंदूचे कैवारी शेटजी यांस आम्ही निरोप देऊन लेख पुरा करतो.

---

अकोल्यास पाण्याचे नळ आणण्याकरितां सव्यावर कर बसवावा ह्मणून पुष्कळ दिवसापासून ठराव झाला होता. परंतु येथील सावकार लोकांनीं सदरहू प्रकारचा कायमाचा कर न बसवितां पाण्याच्या खर्चाकरितां आमचे जवळून रोकड ५०००० पन्नास हजार रुपये घ्या ह्मणुन सुमारें २४ सावकारांच्या सह्याचा अर्ज गेला होता. अर्जांत वरील मागण्याशिवाय आणखीही दोन मागण्या होत्या त्या अशा सावकार लोकांचे वहिखातें सदरहु कर बसवितांना किंवा सव्याचा खरा आकार काढतांना कोणी पाहूं नये कारण त्यामुळें सावकार लोकांचे ऱ्हदगत बाहेर पडून त्यांच्या व्यापारास धोका बसण्याचा संभव आहे. तर सव्याचें उत्पन्न ते जें सांगतील तें खरें मानून कमेटीनें कर बसवावा. दुसरें सव्यावरील कर संवत १९४८ च्या वैशाख शुद्ध १५ पासून बसवावा. ह्या वरील अर्जाचा विचार करण्याकरितां ता० २३ मिनहु रोजीं स्पेशल मिटींग भरली होती. मे. निकोलेट साहेब डें० क० सभेस हजर होते. सदरहु अर्जी पूर्वीं ह्याच सावकार लोकांनीं मे० हेअर साहेब येथें डे० क० असतांना असा करारनामा लिहून दिला होता कीं अकोलें येथील पाण्याचे खर्चाकरितां १२ वर्षेपर्यंत येथील सव्यावर प्रत्येक खंडीस व बोजास अर्ध्या आण्या प्रमाणें कर देऊं. १२ वर्षे झाली ह्मणजे हा कर माफ व्हावा. त्याप्रमाणें ता० २३ रोजीं भरलेल्या सभेंत ५०,००० रुपये उक्त घेण्याचें नाकबूल करून पूर्वींच्या करारप्रमाणें बारा वर्षें पर्यंत अर्ध्या आण्या प्रमाणें कर द्यावा असें ठरले व हा कर वसूल करण्याचे संबंधानें खामगांव मुनिसीपालटीचे जे नियम आहेत तेच येथेंही अमलांत आणावे. ह्मणजे सव्याचा सवदा नोंदण्या करण्या करितां म्युनिसीपालकमेटीनें प्रत्येक सावकाराला आपली छापील बुकें द्यावीत त्यांत प्रत्येक सवदा नोंदला जावा व त्यावरून कराची आकारणी करावी. व सव्यावर करें खालीं लिहिलेल्या मुदती पासून बसवावा.

कपाशी फाल्गून शुद्ध पौर्णिमा पुढें येणारी
जवारी माघ शुद्ध पौर्णिमा.

अळशी व गहू वैशाख शुद्ध पौर्णिमा येणें प्रमाणें ठराव होऊन वर लिहिलेले दिवसापासून पैसे वसूल करावेत ह्मणून ठरलें आहे.

---

कलाकौशल्या कडे आमच्या लोकांचे मन जसें जावे तसें जात नाहीं म्हणून 'हुन्नरोत्तेजक'नें मुंबा पुरीत अवतार घेतला आहे 'देशी व विलायती हुन्नरांची शास्त्रीय रित्या व संप्रयोग संक्षिप्त माहिती व कृति देण्याचा' ह्या मासिक पुस्तकाचा उद्देश आहे. जादू म्हणजे मंत्र सामर्थ्य अशा वेडगळ समजुती दूर होण्यास व एखाद्या खटपटी मनुष्यास ह्या पुस्तकाचा फार चांगला उपयोग होईल. वजनांची प्रमाणें देत असतां औंस, पिंट, ड्राम इ० इंग्रजी नावांचा उपयोग जर पुस्तक कर्ते न करतील तर बरें पुस्तक लहान आहे व त्या मानानें त्याची किंमत ही टपाल हांशीला सकट १ रुपयाच आहे 'म्यानेजर हुन्नरोत्तेजक' दावणी समोर, भायखळा, मुंबई ह्या पत्यावर वर्गणी भरली असतां पुस्तक मिळत जाईल.

---

The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 29, 1890.

ANNUAL REPORT ON THE ADMINISTRATION OF MUNICIPALITIES IN BERAR.

The Commissioner has reviewed as usual the administration of all the Municipal institutions in Bear for the year 1889-90, and the report is published with the order of the Resident in connection therewith. On perusing the entire report and the Resident's order, we are glad to see that our municipalities with the new phase of elective franchise are progressing steadily and satisfactorily. Almost all the officers who have to do with the Municipal administration in one capacity or another, have expressed their approval with the new system result, though we do meet in three or four places in the report with censuring and unsympathetic remarks from one or two officers. The Deputy Commissioner of Akola remarks in a pointed manner about "a want of interest in municipal affairs on the part of the inhabitants generally, or perhaps to a nonappreciation by the majority of the people of the substitution of the elective principle in place of the system of nomination." But we do not find anything so particular on part of our town people

s to ask for the above remarks, nor can we agree in "entertaining a doubt as to whether under such a state of things the best men are secured to the Com mittee." We are aware that there have been mistakes committed by our people but it should also be remembered that this elective system is quite a new thing to us. And, therefore, the wonder is not why the mistakes are committed but why so few mistakes are committed People every-where have shown signs of genuine enthusiasm at the time of the election; and our elected Commissioners have taken an amount of intense interest in the Municipal affairs. This may not satisfy a wild enthusiast, but one of moderate and reasonable hopes and wishes will certainly look upon this as an encouraging result. We will by no means object to 'closer super vision by district officers over our Municipal commissioners' work. And we are sure our commissioners will thankfully receive 'advice and moral influence from the Commissioner and Deputy Commissioners to help these institutions at the present stage of their existence.' But we cannot induce ourselves to believe with the Resident that even at the present stage of their existence our 'Municipal Committees when left to themselves are slow to introduce reforms, & are apt to allow their affairs to drift into confusion.' It is also observed in the order of the Resident that this state of things is not peculiar or exceptional to Berar, but it is also found in other parts of India. As far as we have tried search, we have not been able to find out a single instance of such serious importance in any Indian Province where elective system is introduced, as to support and justify the above remarks in the order. We have also carefully gone over the Commissioner's repot with a view to see if there is any thing in the work ing of the Municipalities or in the conduct of the Municipal Commissioners in Berar, to which we can trace the view of the Local Government. And we have not only found out nothing pointing in that direction, but we see abundant evidence with respect to the progress of our Municipalities, due mainly if not solely, to the new system. This will appear clearly from the salient points from the Report, which we intend to note and review on this occasion

Though the number of Municipalities in Berar is increased by one this year, the old seven Municipalities are the only ones where elective system is introduced and which are at present managed on the plan, and it is with respect to these Municipalities we wish to show how their working has been satisfactory and encouraging. By the bye we may take this opportunity to ex press a hope that our newly established Municipality of Amraoti Camp may be given the right and privilege of election like her elder sisters. At Amraoti Gene ral Committee met 47 times in the year and the average attendence of members at each meeting was 11.5. Akola had 52 meetings of the General Committee, where the attendence of members at each meeting was 6.5. Khamgaon and Shegaon had 55 and 30 meetings, and 6.9 and 7 attendence of members respectively. 25 was the number of meeting at Basim and the attendence was 8 on ave rage at each meeting. Ellichpur though held the fewest meetings, the average attendence of members at each meeting was the largest, it being 16.7. Besides these ordinary and special meetings of the General Committee, numerous meetings of the managing and sub-committees were held during the year under Report. This statement of facts taken from the Commissioner's Report, testifies, in our opinion to the interest taken by our Commissioners in the Municipal affairs. It should also be noticed that our Municipal members have tried, as 'wise fathers of the cities' in their charge, to husband their resources with a view to undertake works of public uti lity and importance without throwing seriously any additional burden on the people— this is certainly a wise and statesman like policy. The gross total income of all the Municipalities in the year 1889-90 was Rs. 2,05,698; while it was Rs. 1,55,905 the previous year, which shows an increase of Rs. 49,793. The expenditure in the year under report amounted to Rs. 1,64,851, as compared with Rs. 1,59,992 for the previous year. The closing balance for this year in the hands of the Municipalities is Rs 1,31,728, a sufficient index of the finan cially good state of the Municipal institutions. The Municipalities contributed to schools and libraries— public education— Rs. 13,398, i. e, 8.1 as compar ed with the total expenditure and 6.5 as compared with their total income. Though this contribution towards pub lic education is not small, still we earnestly wish our Municipalities will see their way to increase this fund of contribution. For it is on education more than on any thing else that the progress and advancement of the people rests. We also suggest that our Mu nicipal Reports will give in future in a detailed manner as much as possible the work of their educational Committees, so that the public may be able to judge from the reports the care taken by our City Fathers not only for our physical improvement but also for our mental improvement.

## OUR SOCIAL RELIGIOUS REFORM.

(Continued from our last issue.)

A few years back it is fresh in our reader's memory, we believe, that the Government of India having invited authoritative opinion on the subject had resorted to the policy of strict noninterference. If Government were to decide the question from their own stand point view a good deal of dissatisfaction and discontentment would have been the consequence. Fears have been entertained in some quarters that state interference in social matters would do much harm instead of doing any good. The prohibition against the second marriage of women has no foundation either in early law or custom, we admit, and we are prepared to say that the change might be due to the meaningless influence on Bramhanical opinion which looked upon this reform as an unpardonable sin. The views of bona-fide supporters of these reforms derive special interest from the fact that they stand pre-eminent among the extremest. We hold that a considera ble change in the social condition of our community must take place before Government would be justified in taking up question in hand and till such time comes state interference is prema ture and open to manifold objections. We make bold to say and it is our firm conviction that it is not within the province of Government to take the initiative in such matters although Govern ment might give some countenance and encouragement to them. Very little good will, in our opinion, result from the direct action of Government in such reform, though our impatient reformers are too much pressing them upon Government. We frankly admit that the evils complained of, must be removed with as little delay as possible. The sooner they are eradicated the better will it be for us. We would only be too thankful to those that will suggest such means, which if adopted, will make us sure of success without incurring risk. It is a fact that the evils sought to be redressed on the true index of the deeply rooted prejudices arising out of the inaccurate and the sound opinion based on incorrect infor mation of the men belonging to the old school reform on social matters. It is not a matter which can be set aright without sound judgment. The question is a serious one and must, in our humble opinion, be looked at from all its bearings. At this advanced state of our society any sane and impartial man would say that such vital questions ought to be discussed by the light of facts and figures. What we wish to urge is this that these evils we should try to remove slowly. Infant marriages are not an Indian institution but were known in Europe during historical peri ods and their disappearance is not due to any active interference on the part of government but to the gradual change in public opinion a fact which furnishes a conclusive answer in evidence that our social grievances are not likely to be redressed depending solely on our western nations especially England. We are perfectly aware of the superiority of the European nations in some matters. But that cannot be taken as the best model for us to copy in all matters. Our social elevation consists in the development of this un[illegible]ated mind. We think that state interference is neither necessary nor advisable. Go vernment may show its passive disap proval of such custom. But so long as the Hindu society is unwilling to abide by the proposed reforms it is un reasonable to call upon Government to move in the matter. Still it is a heal thy sign of the times that the unedu cated natives of India have come to look upon the customs as evils for which a remedy should be sought al though they depricate the tendency of our reformers to rely on state pressure In our opinion Satti and Infanticide were crimes which could be punished but infant marriages cannot be said to be criminal offences and it would be unjust to declare them legally null and void.

From the above it is clear that legis lation in social matters at the present stage of our society is unnecessary.

## PLEADERS EXAMINATION.

September 1890.

Civil Procedure and Limitation.

Time allowed three hours

I What are the special functions of a District Court under the Code of Civil Pro cedure. 10 Marks

II [illegible] and B have a joint cause of action a[illegible]st C. A alone sues C and obtains a decree. C appeals on the ground that B should have been a party to the suit. Under what circumstances should C's objection be entertained. 10 Marks

III In Berar can a defendant be arrested by warrant merely on the grounds that he does not appear at the first hearing. What is the procedure in Berar when a debtor is arrested in execution of a decree for money. How is the evidence of witnesses in Civil cases recorded in Berar. 10 M.

IV Are standing crops moveable or immoveable property under the Code of Civil Procedure. What is the procedure.

1 When a process server finds himself obstructed in delivering immoveable property under a warrant issued in execution of a decree for that property.

2 When a man is ejected from the possession of immoveable property which he claims as his own in execution of such a decree.

10 M

V A obtained a decree against B. B having died A had his widow C placed on the record as the representative of B and proceeded to execute the decree- Subsequently a house was attached as part of the estate of the deceased B. C claimed it as her own right. Her claim was dismissed Should she appeal or bring a suit to establish her right.

10 M.

VI A obtained a decree against B for money. In execution of the decree he attached a house. C claimed the house on the ground that it had been sold to him by B. His claim was rejected on the ground that he had purchased it in order to defraud A. Should C appeal or bring a suit to establish his right. If he appeal within what time must he appeal, and if he sue within what time. Should his suit be instituted.

10 M.

VII A obtained a decree against B. The Decree was obtained when C the son of A was a minor. A having died two years after the decree was obtained C's guardian applied for execution two years after A's death, and four years after the decree was passed. Is the application in time.

M. 10

VIII In Berar in what cases does a special appeal lie, and to what court. Has a small cause court in Berar sole juridiction in small cause court cases arising within the area of its local jurisdiction. Answers to be supported by references to the law.

Marks 10

IX A is the owner of a field of which B is the Khatedar. A asks B to allow his name to be registered and B refuses. Within what time should A sue. If he does not sue within that time, will his right to have his name entered be extin guished. If so why, if not, why not.

M. 10

X A sued B and C and obtained a decree against B only. B appealed. A filed an objection against the part of the decree directing the dismissal of the suit as against C. Can the objection be enter tained, and if so, on what grounds.

M. 10

---

## वऱ्हाड.

मि० धोंडजी पोलीस इं. स्पे. यांनीं येथें एक जुगार खेळण्याचा अखाडा पकडून सत्तावीस असामी आरोपी केले. हा खटला रा. रा. गणेशबापूजी फ० क्ला० मा० यांजकडे चालूं आहे.

---

येथील म्युनसिपालिटीनें गांवांत पाणी आंणण्याकरितां सत्यावर बारा वर्षे कर बसविण्याचा ठराव केला. कपाशीचे प्रत्येक बोजावर व धान्याच्या प्रत्येक खंडीवर अर्धा आणा कर घेणार. हा कर पुढील वैशाखापासून सुरूं होणार.

---

रा० रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर हे कमिशनर आफिसांत डे० क्ला० आफ कोर्टचे जागीं व रा० रा० विठ्ठलराव काळीकर हे स्मा० आ० को० चे क्ला० आ० को० चे जागीं लवकरच रुजूं होतील.

---

## वर्तमानसार.

माजिस्ट्रेट लोक आपली स्वारी असेल तेथें पक्षकारांनीं हजर व्हावें म्हणून समन्स करतात, पण हें वाजवी नसून त्यांनीं समन्स मध्यें आपलें मुक्रर ठिकाण लिहिलें पाहिजे म्हणून हायकोर्टानें ठरविलें आहे.

गोरक्षणाकरितां अत्यंत मेहनत घेणारे श्रीमान स्वामी हे इंग्लंडांत गोरक्षणाचीं व्याख्यानें देण्याकरितां जात आहेत.

पुण्यास पहिल्या एल. एल्. बी. पर्यंतच्या लॉ क्लासाची परवानगी पांच वर्षेंपर्यंत युनिव्हार्सिटीनें दिली.

सदर्न मराठा रेल्वेचें स्टेशन तारीख १ आक्टोबर रोजी पुण्याचे स्टेशनावर येणार असून येथपर्यंत सदरहु रेल्वेनें आपले रूळही आंथरले आहेत असें समजतें. क ० त

बिन बोभाट कर वसूल करण्याची युक्ति— नासिक येथील म्युनिसिपालकमिटीचे चालू साला बद्दलचे घरपट्टीची व सफई पट्टीची निम्मे रक्कम जे कोणी येत्या आक्टोबर महिन्यांत देतील व बाकीची निम्मे रक्कम येत्या डिसेंबर महिन्यांत देतील त्यांस दर रुपयास अर्धा आणा प्रमाणें सूट मिळेल; आणि जे कोणी दोन्ही हप्ते एकदम येत्या आक्टोबर महिन्यांत भरतील त्यांना दर रुपयास पाऊण आण्या प्रमाणें सूट मिळेल अशा बद्दलच्या जाहिराती म्यु. क. चे चेअरमन साहेब यांणी तेथील सर्व घरवाल्यांकडे पाठविल्या आहेत बरी युक्ती.

दीर्घ प्रयत्न—आजपर्यंत शेकडों लोकांनीं उत्तर ध्रुवाजवळ जाण्याचे प्रयत्न केले परंतु तो प्रदेश बर्फानें अगदीं भरून गेल्या मुळें ते सर्व निष्फळ झाले. परंतु आतां असें समजतें कीं दोन फ्रेंच गृहस्थांनीं विमानांत बसून त्या बर्फमय प्रदेशावरून उडून जावयाचें, असा बेत केला आहे. ह्या त्यांच्या प्रवासास सुमारें चारपांच दिवस लागतील असा अनुमास आहे.

श्रीमंत महाराज सयाजीराव गाईकवाड यांनीं अशी इच्छा दर्शीविली आहे कीं बडोदा राज्यांत दर एक सरकारी कागद, सरक्युलर, हुकूम दर एक गांवांत पाठवावा लागतो. आणि त्याचा उपयोग व्हावा तसा होत नाहीं ही हरकत दुर करण्यासाठीं बडोदा राज्याच्या चार प्रांतांत दरएक प्रांताच्या मुख्यशहरीं एकेक छापखाना काढावा, आणि त्यांत असें एक पत्र असावें कीं जे सरकारी ग्याझेट प्रमाणें दर गांवाच्या मुख्य तळाटीस पोंचेल असा छापखाना काढण्यास कोणी खुषी असल्यास त्यास दरसाल अगर दरमहा कांहीं योग्य रक्कम देऊन परवानगी मिळेल फार चांगलें.

मद्रासेस एका बनवण्याच्या संबंधे नेटिव आणि युरोपियनांत जो तंटा उद्भवला होता त्याचा हाय कोर्टानें नेटिवा तर्फे निकाल देऊन डि. जज्जास फारच मोठा दोष दिला.

महत्वाचा ठराव—एक मारवाडी मयत झाला. तो मेल्यावर त्याचाच व्यापार व इस्टेट त्याचे चार मुलाचे ताब्यांत आली. पुढें त्या व्यापारांत एका कुळाकडे कांहीं येणें होतें. त्याजबद्दल त्या चार मुलां पैकीं वडील मुलानें कुटुंबाचा कर्ता या नात्यानें आपले नांवानें कुळाकडून घेण्याचे रुजुखातें करून घेतलें. पुढें तो वडील मुलगा मयत झाला. नंतर त्याचे भावांनीं व मयत मनुष्याचे मुलांनीं कुळावर रुजू खात्यावरून फिर्याद केली त्या कामीं फिर्यादीस सन १८८९ आक्टा प्रमाणें सर्टिफिकिट घेण्याची जरूर आहे कीं नाहीं असा मालेगांव कोर्टांत प्रश्न निघाला त्या वरून असें सर्टिफिकिट घेण्याची जरूर नाहीं असा अभिप्राय देऊन तेथील सबार्डिनेट जज्ज रा. सा. कृष्णाजी परशराम गाडगीळ यांनीं हायकोर्टास रेफरन्स केला त्याचा ता० १४ आगस्ट रोजीं हाय कोर्टानें या कामीं सर्टिफिकिट नको असा सबार्डिनेट जज्जा प्रमाणें ठराव केला. हा ठराव झाल्या पासून सर्टिफिकिटा दाखल हजारों रुपये सरकार जमा होत होते ते या पुढें होणार नाहींत.

पलटणी कुच करीत असतां त्यांचे अन्नाविणे फार हाल होतात, म्हणून थोडक्यांत भूक भागविणारे असें अन्न तयार करण्यांत युरोपांतील मोठे मोठे लोक गुंतले आहेत.

बंगाल्यांतील सर्व नदिया प्रांत हल्लीं पाण्यांत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं सुमारें १०० खेडीं उध्वस्त झालीं आहेत.

इंग्लंडमध्यें आगगाड्या इतक्या जोरानें चालतात कीं, त्याचे योगानें आसपासचे पक्षी मरून पडतात.

रशियन पत्रकर्ते कोणी तरी एक भिकार माणूस आपले पाशीं दरमाहा देऊन ठेवतात व खटला होण्याचा व कैदेंत जाण्याचा वेळ आली म्हणजे त्या माणसास पुढें करतात. रशियांतील नोव्हेस्मे या नांवाच्या प्रसिद्ध पत्राच्या कत्यानें दोनशें पौंड वर्षाचें देऊन एक मनुष्य ठेवला होता व तो थोडे दिवसांपूर्वी चार महिने कैदेंत जाऊन आला. बरी सोय. न्या० सि०

कुशाई सरहद्दीवर पुन्हा हाणाहाणी मारामारी सुरू झाली आहे.

येत्या दिसेंबरांत गोंव्यास जें प्रदर्शन होणार आहे तें नंगी होणार आहे असें म्हणतात.

जी. आय. पी. रेल्वे कंपनीनें विलायतच्या पेढीवर २९, ५०, ००० रुपयांची एक हुंडी काढली आहे. एवढी हुंडी आजपर्यंत निघाली नव्हती असें ह्मणतात.

अमेरिकेच्या खजिनदारानें रूपें खरेदी करण्याचा झपाटा चालविला आहे.

मुंबईस सगळ्या सोई आहेत पण युरोपियन लोकांस राहण्याकरितां हवाशीर बंगले नाहींत यासाठीं हवेच्या जागीं उंच मजली माड्या बांधण्यांत याव्या असें मुंबईच्या एका इंग्रजी पत्राचें ह्मणणें आहे. आणखी काय काय सोई केल्या पाहिजेत?

√शेतकऱ्यावर धारा अतीशय बसल्यामुळें, गोव्याकडील शेतकरी जमिनी सोडून देऊ लागले होते पण इतक्यांत त्या सरकारानें तो कर पुष्कळ कमी केल्यामुळें पुन्हा पूर्वस्थिति येऊं लागली आहे. इंग्रज सरकार या पोर्तुगीज राजाकडे किंचित लक्ष देईल काय?

तिसीनो नांवाच्या इतालीच्या ताब्यांतील प्रांतांत पुन्हा दंगा सुरू झाला आहे.

मृत्यू:— विलायतेहून जाऊन आलेले धारवाड हायस्कूलचे हेडमास्तर मि. महादेव विष्णु काणे, बि. ए यांस गेल्या आठवड्यांत देवाज्ञा झाली यांचे वय फक्त ४६ वर्षांचें होतें व इतक्या तरुण वयांत त्यास मृत्यु मुखीं पडावें लागलें या वरून आमच्या देशाचे अजून दैव उघडलें नाहीं असेंच ह्मणावे लागतें. विलायतेहून आल्या पासून हे आजारीच होते. यांनीं मुंबई युनिव्हर्सिटीला १०,००० रुपये दिले आहेत. सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र त्यास फार प्रिय होतें व त्याचें ज्ञान करून घेण्यासाठीं ते इंग्लंड व अमेरिका देशांत गेले होते आमच्या तरुण व होतकर मनुष्याची अशी राख होणें खरोखर दुःखद आहे यांत संशय नाहीं. ठा० अ०

√गोवा येथील गडबड! १७ खून भयंकर रक्तपात! रविवारीं, गोवें येथें म्युनिसिप्पालिटीतील मेंबरांची निवडणूक झाली व त्या संबंधानें तेथील व्हाइसरायाचें मत विरुद्ध असून लोकपक्ष प्रबल दिसला ह्मणून गव्हरनर जनरलाच्या सांगीवरून तेथील लष्करी लोकांनीं बंदुका सोडून एका घरांत मतदार लोक जमले होते त्या घरावर गोळ्या घातल्या. त्यांत १७ असामी ठार झाले आणि ९० असामीवर लोक जखमी झाले! असा अनर्थ गोव्याच्या व्हाइसरायाचे दुराग्रहामुळें आणि लोकपक्षाशीं त्याणें विरुद्ध मत स्वीकारल्यामुळें झाला! अजून खुलासेवार हकीकतीच्या तारा आल्या नाहींत, परंतु ह्या अन्यायामुळें गोंव्यास मोठी गवबड उडाली आहे! पाहिल्याने म्युनिसिप्पालिटीची निवडणूक झाली होती व तींत लोकपक्ष प्रबळ दिसल्यामुळें व्हाइसरायानीं ती निवडणूक रद्द करून पुनः वर लिहिल्याप्रमाणें दुसऱ्यानें रविवारीं निवडणूक करविली. तरी त्यांत लोकपक्षाचीच सरशी दिसली आणि त्यावरून व्हाइसरायाचें डोकें फिरून त्याणें हा भयंकर अनर्थ लष्करी लोकांकडून मतदार लोकांवर आणिला! तपशीलवार हकीकत समजली नसल्यामुळें ह्या अनर्थप्रसंगाबद्दल काहींच लिहितां येत नाहीं सध्यां गोंव्यास अत्यंत अस्वास्थ्य व अशांति उद्भवली आहे. व त्यामुळें सर्व लोक मोठ्या काळजींत व फिकीरींत आहेत, इतकी गोष्ट मात्र खरी. दोन्ही बाजूच्या बातम्या समजेपर्यंत ह्याबद्दल जास्त कांहीं लिहू नये हेंच बरें!

दांत पाडण्याबद्दल बडे बक्षीस—निजाम सरकारचे दांत दुखत आहेत व ह्मणून त्यांनीं मुंबईच्या मि. ब्राम्ले नांवाच्या एका दंतवैद्यास दोन तीन वेळा हैद्राबादेस बोलावून नेले होतें. तेव्हां त्याणें हुजूरांचे दुखरे दांत उपटून काढून त्यांचे जागीं दुसरे दांत बसविले. आणि त्या कामगिरीबद्दल हुजूरांनीं त्या कुशल दंतवैद्यास ८००० रुपये दिले. ह्या वरून एक इंग्रजी पत्र थट्टेनें ह्मणतें कीं, दांत पाडण्याबद्दल ही नेटिव्ह संस्थानिकांकडून भरपूर बक्षीस मिळतें! आणि यावरून दांत पाडणाराला ह्या देशांत चांगली कमाई आहे असें दिसतें!

√खंबायतास बडा दंगा!— शुक्रवारीं खंबायतास नवीन मोजणीच्या ठरावा प्रमाणें रयतेकडून कर वसूल करण्याचे संबंधानें लोकांत असमाधान उत्पन्न होऊन त्यांणीं नबाब, त्यांचे दिवाण किंवा रसिडेंट यां पैकीं कोणाचें कांहीं एक न ऐकतां एकसारखा दंगा चालविला त्यावरून लष्करी मदत बोलावली त्यांत १३ असामी ठार झाले २० वर जखमी झाले व २०० लोकांस कैद केलें; व्हां दंगा शांत झाला! ज्ञा० च०

दुधांत पाणी घालणें हा अपराध होत नाहीं असें मद्रास हायकोर्टानें नुकतेंच ठरविलें आहे व या अपराधासाठीं नवा कायदा करण्यांत यावा असेंही त्या हायकोर्टानें सरकारास सुचविलें आहे. सरकार काय करतें पहावें.

गिरण्यांतील मजुरांचा विमा:— अमेरिकेंतील कित्येक गिरण्यांत, गिरणीचे व तसेंच तेंतील कारागिरांचे विमे उतरण्याचा प्रघात पडूं लागला आहे. ह्मणजे कारागिर जो पावेतों कारखान्यांत किंवा गिरणींत असतात तापर्यंत त्यांच्या आयुष्याचा विमा उतरण्यांत येतो व कोणताही अपघात झाल्यास त्या मजुराच्या कुटुंबास आयुष्यभर कांहीं पेन्शन मिळतें. व ह्याप्रमाणें गिरणीवाले इन्शुरन्स कंपनीस दरमहा गिरणीच्या व तसेंच आंतील मजुराच्या विम्या दाखल बरीच रक्कम भरीत असतात.

ज्या मजुरांच्या उद्योगानें व श्रमानें देशाची भरभराट होते, त्यांची श्रीमान अमेरिकन लोक ह्या प्रकारें व अशाच दुसऱ्या हर एक प्रकारानें फेड करितात, ह्या बद्दल तेथील बडे लोकांची जेवढी तारिफ करावी तेवढी थोडीच. आहे.

अशा गोष्टीकडे आमचे येथील गिरणीवाले बडे लोक लक्ष देतील तो सुदिनच ह्मणावयाचा. दि० बं०

जर्मनीनें गुलामांचा व्यापार चालू ठेवण्याबद्दल जाहिरनामा लाविला आहे.

झांझिबार येथें गुलामांचा व्यापार अतोनात वाढत चालला आहे.

कॅप्टन लाकॅम्बर हा फ्रेंच मनुष्य आपल्या विमानांतून हवेंत उडाला असतां त्याच्या विमानावर जरमन शिपायांनीं गोळ्या घातल्या ह्मणून मोठी चळवळ झाली होती.

सिमला व मसुरी येथें धरणीकंपाचे धक्के गेल्या सोमवारीं बसल्याचें समजतें.

इंग्लंड व पोर्तुगाल यांजमध्यें झालेला तहनामा लिसबन येथील लोकांस पसंत न पडल्यामुळें तेथील प्रधान मंडळानें राजीनामा दिला. सु प.

## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००= |
| " १९ दिवसाच्या मुदतीची | | | १००= |
| सुवर्ण.... | २० | रुपें | १०९ |
| आळशी खंडीस | ९३॥ | उडीद | ६० |
| गहूं काठे | ६० | बनशी | ६७॥ |
| जवारी | ४० | चणे | ६२॥ |
| सर्की | ४८— | मठ | ४८= |
| तूप | ९॥ | तेल | ४।।।= |

सध्याचे भाव

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | वसंत संवत | १९४७ | ४३॥ |
| गहू | वैशाखशुद्ध | १९४७ | ५८ |
| आळशी | चैत्रशुद्ध | १९४७ | ७९॥ |
| रुई | फाल्गुन शु. | १९४७ | ५७॥= |
| सर्की | व. नवे सालाची | १९४७ | ४८— |

☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.